साप्ताहिक

# माणूस

१७ जुलै ८२ दीड रुपया



# माओने आपल्या कुवतीप्रमाणे पेकींग ते टिंबकटू हा रस्ता शोधला. आपणही दिल्ली ते टिंबकटू हा रस्ता शोधला पाहिजे. नाही तर माओचा चीन तिथे पोचेल. आपण पोचणारच नाही.

एक मुलाखत
चीन दौऱ्यावरून परतलेल्या डॉ. चंद्रशेखर यांची



## गांधीजींचा ग्रामोद्योग, अन्त्योदय, स्वदेशी.. आणि शरद जोशी ....पंजाबात!

## तीन वर्षांची वर्गणी एकदम भरल्यास

'माणूस' साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी रुपये पन्नास आहे. या वर्गणीत दिवाळी अंक वर्गणीदारांना दिला जातो. शिवाय वर्षातून निघणारा एकाद–दुसरा विशेषांकही.

पोस्टाचे दर भरमसाठ वाढले आहेत.

वार्षिक वर्गणीदारांप्रित्यर्थ होणारा टपाल व इतर कार्यालयीन खर्च वाचविण्यासाठी तीन वर्षांची वर्गणी एकदम पाठवून सगळ्यांचाच त्रास थोडा कमी करणे शक्य आहे.

## सप्रेम भेट

आपण आपली वर्गणी संपेपर्यंत वाट न पाहता ३ वर्षांची वर्गणी ३१ जुलै पूर्वी पाठवणार असाल तर एक नवी कोरी करकरीत पुस्तकभेट आपल्याला आम्ही देऊ शकू.

## पटक आणि पटकार

**लेखक : संदीप पाटील । रवी शास्त्री**

**आदित्य प्रकाशन, मुंबई**

**किंमत : तीस रुपये**

**सवलतीची किंमत : पंचवीस रुपये**

ही पुस्तकभेट पाठविण्याचा खर्च मात्र आम्ही करू शकणार नाही !

३ वर्षांची १५० रुपये वर्गणी भरणाऱ्यांनी वरील पुस्तक माणूस कार्यालयातून घेऊन जावे किंवा फक्त टपाल–पाठवणी खर्चाची व्ही. पी. केली जाईल, ती सोडवून घ्यावी.

## आपणास ही पुस्तकभेट नको असल्यास

## आपण सरळ एकशे पंचवीस रुपये पाठवा.

तीन वर्षांची वर्गणी एकदम भरल्यास ही पंचवीस रुपयांची सूट आहे. ही सूट–सवलतही फक्त ३१ जुलैपर्यंत !

**साप्ताहिक माणूस १०२५ सदाशिव, पुणे ३०.**

# माणूस

¤

**वर्ष : बाविसावे**

**अंक : सहावा**

१७ जुलै १९८२

**किंमत : दीड रुपया**

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

**पन्नास रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

**मुखपृष्ठ**

अनंत सालकर

¤


## सप्रेम नमस्कार

¤ शेतकरी संघटनेने दूधभावाचे आंदोलन मागे घेतले. दूधउत्पादकांच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना जनतेस या आंदोलनामुळे आली. दूधउत्पादक सर्वत्र विखुरलेले असल्याने व बहुतेकांवर शासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधींचा प्रभाव असल्याने १०० टक्के यश अपेक्षित नव्हते. तरीही अल्पशिक्षित व मुकी बिचारी कुणीही हाका असे समजल्या जाणाऱ्या बहुतेकांनी दूधयोजनेस दूध नाकारून दाखविलेले धैर्य कौतुकास्पद आहे. ज्यांना हमखास मासिक उत्पन्न आहे व संपामुळे फार तर तेवढ्या दिवसांचा पगार कमी होण्यापेक्षा अधिक गमवावे लागत नाही अशा संघटित पांढरपेशांच्या संपाशी तुलना होऊ शकत नाही. कारण ज्यांना २–३ लिटर दूध घातल्यावरच दिवसाची रोजी रोटी मिळेल अशा दुर्बल घटकांतील उत्पादकांनी दूध असून ते विकायचे नाकारले हे धाडसाचे आहे !

या निमित्ताने काही बाबी पुन्हा उजेडात आल्या. त्यासाठी वृत्तपत्रांतील खालील बातम्या पुरेशा बोलक्या आहेत.

(१) दूधउत्पादकांना मिळणारा दर समाधानकारक असून कोणीही शासनाच्या दूधदराबद्दल तक्रार केली नाही.

– इति दूधविकास–अधिकारी, सातारा.

दुधाच्या दराबद्दल प्रत्येक संस्थेने तक्रारी केल्या असूनही शासकीय अधिकाऱ्यांची बेपर्वाई व आत्मसंतोषी वृत्ती.

(२) 'अधिक संख्येच्या ग्राहकांसाठी अल्पसंख्य उत्पादकांचे म्हणणे मान्य करणार नाही'–मा. मुख्यमंत्र्यांचे उद्गार.

बहुसंख्य सभासदांची इच्छा नसताना मुख्यमंत्री–निधीसाठी छोटया गटाच्या पुढाऱ्यांकडून यांनीच मागील पंधरवड्यात चेक स्वीकारला. हाच न्याय कापडगिरणी–संपास का लावला जात नाही ?

(३) दूधदराचा विचार करण्यास शासनाने समिती नेमली असून तिच्या ३–४ बैठका झाल्या आहेत असे दूधविकासमंत्री श्री. शिवाजीराव निलंगेकरांनी पत्रकारांना सांगितल्याचे वृत्त २७-६-८२ च्या सर्व वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले आहे.

(४) शासनाने नेमलेल्या समितीचे एक सदस्य श्री. अण्णासाहेब शिंदे, माजी केंद्रीय राज्यमंत्री यांनी समितीची एकही सभा न झाल्याचे म्हटल्याचे दि. २९–६–७२ च्या वृत्तपत्रात श्रीरामपूरची बातमी आहे.

(५) शासनाकडे दूधदरासंबंधी शेतकरी संघटनेने पत्र दिले नसल्याचे संबंधित मंत्र्यांनी (शिवाजीराव निलंगेकरांनी) पत्रकारांना सांगितले (सकाळ दि. १–७–८२), यापूर्वी मागील विधिमंडळ–अधिवेशनातही त्यांनी सभागृहात असे निवेदन केले होते. शासनास पाठविलेल्या निवेदनाची पोच शेतकरी संघटनेकडे असल्याचे श्री. शरद जोशी यांनी एप्रिलमध्ये सांगितले होते.

शासनाची बेफिकिरी, अधिकाऱ्यांची बेपर्वाई व मंत्र्यांची खोटी विधाने याची खात्री दूधआंदोलनामुळे सर्वांना पटावी.

मंत्र्यांच्या विधिमंडळास दिलेल्या खोटया माहितीबद्दल 'हक्कभंग' होऊ शकतो. विधिमंडळ–सदस्यांनी याबाबत विचार करावा.

३ जुलै — अशोक थत्ते, सोलापूर

¤ 'माणूस'चा '३ जुलै ८२'चा अंक वाचला. संपादकीयात आपण "संपकरी या देशाचेच नागरिक आहेत. ते आपले देशबांधव आहेत. गेले पाच महिने ते लढताहेत. हालअपेष्टा सहन करताहेत. त्यांच्या हलाखीशी इतर संघटनांचा संबध पोचत नाही का ? हा अत्यंत चांगला असा प्रश्न विचारला आहे."

"राजकीय आर्थिक प्रश्नांशी संबंधित अशा इतर संस्था–संघटनांनीही आपली ताकद उपयोगात आणून सरकारला वाटाघाटी करायला भाग पाडायला हवे."

'मुख्यमंत्र्यांवर झालेल्या गोळीबारा या

सर्वांनी निषेध केला तो योग्यच आहे. होता. पण या घटनेकडे अधिक खोलात जाऊन पहायला नको का ?'

आपण जे प्रश्न निर्माण केले आहेत ते खरोखर काळाच्या स्थितीत योग्य आहेत. एखादी व्यक्ती गोळीबार करण्याइतपत क्रोधित का होते ? याचा विचार व्हायला हवा आहे. पाच–सहा महिने संप चाललाय; पण तो संपवायची ताकद कुणात नाहीय किंवा संपवायची इच्छा नाहीय. हे सारं गृहीत धरलं तरीही पुढं काय ? हा प्रश्न निर्माण होतो. मध्यंतरी दलित चळवळींनी दोन घोषणा काढल्या होत्या पँथरच्या काळात.

" पोटात तुझ्या पेटली आग !
ऊठ दलिता तोफा डाग ! "
" ऊठ दलिता भूके कंगाल !
वदुकीला हात घाल ! "

आणि नेमकी ही पाळीच हा संप उपाशी-पोटी कामगारावर आणू शकतो. हे एक भयानक सत्य आहे. पोटातली आग विझवण्यासाठी जर संपकऱ्यांनी दिसेल ते पेटविण्याचा प्रयत्न केला तर दोष त्यांचा नसून, मग्रूर मालकवर्ग आणि नकर्तेपणाची भूमिका घेणाऱ्या सरकारचा असेल !

५ जुलै भीमराव जाधव, चेंबूर

¤ श्री. शरद जोशी यांचे दूधआंदोलन संपले. त्यांची स्वतःची प्रतिक्रिया आंदोलन अयशस्वी झाले अशी प्रसिद्ध झाली आहे; परंतु पहिल्या खेपेस दूधआंदोलनास शेतकऱ्यांचा मिळालेला प्रचड प्रतिसाद पाहता ते यशस्वी झाले असे आग्रहपूर्वक म्हणावेसे वाटते.

५ जुलै गोपाळराव कुलकर्णी, मिरज

¤ 'माणूस'च्या दि. ३–७–८२ च्या अंकातील आपला ' व्यापक सहानुभूतीची गरज आहे ' मुंबईच्या गिरणीकामगार संपाबाबतचा अग्रलेख वाचला. याच अंकात कामगार वृत्तात जे. के. हाही एक लेख वाचला.

आपल्या विवेचनात सरासरी नागरिकाचे स्थान गृहीत धरलेले नाही, संपवाले व संपनेते बाकीच्या समाजाचे काही देणे लागतात की नाही ? की नागरिकांच्या खिशावर यांनी हात मारायाचा व त्याचे समर्थन आपणांसारख्या संपादकांनी करायचे ?

दोन्ही लेख वाचल्यावर बेकायदेशीर व बेसनदशीर वर्तणुकीला रेग्युलराईज्ड करायचे प्रयत्न आपणाकडे तत्त्वतः स्वीकारले जात आहेत असे वाटते. विद्यार्थ्यांनी शिक्षणसंस्था बंद पाडून इतरांची हानी करायची, थोड्या गुंड लोकांनी जमिनी बळकावून झोपडपट्टी उभारायची, कामगारांनी करारमदार धाब्यावर बसवून स्वतःची व अर्थव्यवस्थेची हानी करायची व मग सर्वांनीच सरकारला यात ओढून त्यास बळीचा बकरा बनवायचा हे कोणत्या नीतीत बसते ? अडचणीत सापडल्यावर मग हे लोक ज्या उर्वरित समाजाच्या जिवावर जगतात, त्यांच्या सहानुभूतीची कशासाठी याचना करतात ? सरकारनेही कायद्यात न बसणारी भांडणं स्वत.वर का ओढून घ्यावीत ?

७ जुलै हेमंत कुलकर्णी
पिंपरी

¤ 'फंड असाही' हा ललिता बर्वे ह्यांचा लेख वाचला. वाचत असतानाच एक प्रसंग आठवला–सिव्हिल सर्जन सांगत होते–

' आजची घटना डोळ्यांत पाणी आणणारी होती. खेड्यावरून एक१०–१२वर्षांचा मुलगा आपल्या वडिलांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये घेऊन आला होता. दुर्दैवाने वडिलाना हॉस्पिटलमध्येच मृत्यू आला. हॉस्पिटलच्या नियमानुसार प्रेत त्याच्या ताब्यात मिळणार होते. वडील गेल्याच्या दुःखाने तो अतिशय बावरून गेला. ढसाढसा रडायला लागला. सांत्वन करीत मी त्यास सांगितले, आम्ही सर्व व्यवस्था करू, तू काळजी करू नको. असे म्हणत मी फॉर्म पुढे केला. त्यात एक तपशील असे सांगणारा होता, ' हे माझे वडील नाहीत. ' पण त्या कोवळ्या असहाय्य मुलाने तेही लिहून दिले व म्हणाला, ' मला एकदा तरी माझ्या दादाला बघू द्या ! '

मयतफंड अशा अनाथ, असहाय्य मुलांसाठी काही करेल का ? तसेच हॉस्पिटलला जी बेवारशी प्रेते असतात त्यांची अंत्यक्रिया पटवून मुसलमान वा ख्रिश्चन धर्मातील लोक घेऊन जातात, तशी त्यांच्या धर्मात व्यवस्था आहे. हिंदू धर्मात तरी तशी व्यवस्था असल्याचे ऐकिवात नाही. मयतफंडास ही दोन्ही कार्ये तेव्हाच करता येतील जेव्हा त्यांच्याजवळील फंड वाढतील. ह्यास उपाय असा सुचतो की, आपल्या मंदिरांच्या उत्पन्नातून हा फंड गोळा करता येण्यासारखा आहे. ' मयतफंड ' योजनेचे कार्यकर्ते ही सूचना विचारात घेतील अशी आशा आहे.

७ जुलै सौ. रेणुका र. बेलपाठक
धुळे

## समाजपरिवर्तनाचे काम करणाऱ्या संस्था। संघटनांची सूची

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे, ही संस्था महाराष्ट्रातील समाजपरिवर्तनाच्या कामात सहभागी झालेल्या संस्था / संघटनाची सूची बनवण्याचे काम करीत आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात, शहरात, खेड्यात अनेक संस्था व संघटना काम करीत आहेत. त्या सर्वांची माहिती आज एकत्र उपलब्ध नाही. ती एकत्र उपलब्ध करून देता आली तर अनेकांना त्याचा लाभ होऊ शकेल.

यासाठी संघटनांच्या व संस्थांच्या सहकार्याची गरज आहे. कार्यकर्त्यांनी आपली संस्था / संघटना केव्हा स्थापन झाली, नेमका हेतू काय, पदाधिकारी कोणकोण आहेत, कार्य कुठे चालते, कार्याचे स्वरूप काय इत्यादी माहिती पाठवावी. त्याबरोबरच आपले माहितीपत्रक, अलीकडील अहवाल व इतर काही मुद्रित साहित्य असल्यास तेही पाठवावे, ही विनंती.

माहिती पाठविण्याचा पत्ता :–
श्री. विलास चाफेकर,
इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन
१२८/२ कर्वे रस्ता, कोथरूड
पुणे २९.

# दंगली केव्हा थांबतील ?

शनिवारी, तीन जुलैला (कराडजवळील) ओगलेवाडी येथे झालेल्या दंगलीत ' हिंदू एकता आंदोलन ' कार्यकर्त्यांचा हात होता असा आरोप सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. बी. एस्. मोहिते यांनी पत्रकारांशी बोलताना केलेला आहे. (प्रेस ट्रस्ट वार्ता)

श्री. मोहिते यांनी असेही सांगितले की, दोन वर्षांपूर्वी हिंदू एकता आंदोलन कार्यकर्त्यांनी ओगलेवाडी येथील एका प्रार्थनास्थळाच्या बांधकामास विरोध केला होता. ३ जुलैला घडलेल्या घटनामागे हे कारण होते.

नुकतीच बिहारमध्येही एक हिंदु–मुस्लिम दंगल उसळली. पाटण्याजवळील फुलवारीशरीफ येथे. अशोक सिंग नामक एका पत्रकाराचा या दंगलीसबंधीचा एक प्रदीर्घ लेख संडे ऑब्झर्व्हरमध्ये प्रसिद्ध झालेला आहे. ( दि. ४ जुलै ) या लेखावरून तरी सिंग हे ऑब्झर्व्हरमधील बहुतेक लेखकांप्रमाणेच रा. स्वं. संघ / हिंदुत्वविरोधी दिसतात. तरी या सिंगांनी या लेखात एके ठिकाणी म्हटले आहे–

' The most important factor to have triggered off communalism–a factor most hotly debated–concerns an acre of land in the heart of the township and its allotment to the Imarat–e–sharia.'

"इमारत–ए–शरियाला शहराच्या मध्यवस्तीतील सुमारे एकरभर जागा दिली गेली. हे दंगल उसळण्यामागील मुख्य कारण आहे. यावर जोरदार चर्चाही झाली." (शरिया हे येथील एक प्रमुख मुस्लिम धर्मस्थान आहे.)

एक वर्षापूर्वी बिहारशरीफ येथे हिंदू–मुस्लिम दगल उसळली होती. त्याही वेळी जागेबाबतचा वादच मुळाशी होता.

पुण्यात चालू वर्षी दंगल झाली. मशिदीला हात न लावता रस्तारुंदी होऊ घातली होती. पतितपावन या हिंदुत्ववादी संघटनेने याला आक्षेप घेतला. वाटेत येणारे देऊळ काढले तशीच मशिदही काढा, नाही तर देवळाला हात लावू नका, अशी पतितपावनची मागणी होती. यातून तणाव वाढत गेला व पर्यवसान शेवटी एका कार्यकर्त्याच्या मृत्यूत व दंगलीत झाले.

आता ओगलेवाडीला हेच घडले–घडत आहे.

अचानक, बेकायदा देवस्थाने उभी राहतात. यांना हरकत घेतली तर तणाव वाढतो, दंगली उसळतात. अशी बेकायदा बांधकामे वेळीच हटवून दगलीचे मूळ कारण दूर करायचे की, हरकत घेणाऱ्यांनाच दोषी ठरवून पकडायचे ? तुरुंगात डांबायचे ?

आपण जर खरे सेक्युलरवादी,धर्मनिरपेक्षतावादी असू तर बेकायदा बाधकाम मशिदीचे आहे की, मंदिराचे आहे इकडे लक्ष न देता, ते बेकायदा आहे, रहदारीला–घाततेला त्रासदायक आहे, या एकाच कारणास्तव ते प्रथम व वेळीच हटवा असे म्हणू; पण आपण काँग्रेसछाप सेक्युलरवादाचे पाईक असू तर मंदिरे पाडू, पण मशिदींना हात लावणार नाही. अशा पक्षपाती सेक्युलॅरिझमचा निषेध म्हणून हिंदू एकता आंदोलन किंवा पतितपावन या किंवा अशा चळवळी नेहमीच उभ्या राहणार व यापुढे बहुजनसमाजाचा त्यांना वाढता पाठिंबाही लाभणार. यशवंतराव चव्हाणांनी किंवा बाबासाहेब भोसल्यांनी कराड–ओगलेवाडीमधून कितीही पदयात्रा काढाव्यात. तरुण माणसे यापुढे त्यांचे ऐकण्याच्या मन:स्थितीत नाहीत, हेच कराड–ओगलेवाडी दंगलींनी दाखवून दिले.

फुलवारीशरीफ येथील जो जमिनीचा तुकडा दंगलीला कारणीभूत ठरला तो इमारत–ए–शरियाला देऊ नये, असा बिहारचे माजी मुख्यमंत्री अब्दुल गफूर याचा पूर्वीचा स्पष्ट आदेश होता; पण सध्याचे मुख्यमंत्री डॉ. जगन्नाथ मिश्रांनी सौदा केला. मुस्लिम मते गेल्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेसला मिळाली व जमिनीचा तुकडा शरियाच्या पदरात पडला. कुणी तरी कोर्टात गेले. या जमिनीवर बांधकाम करू नये हा कोर्टाचा मनाईहुकूम. तरी सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान पाटण्याला आले असताना त्यांच्या हस्ते, इंदिरा काँग्रेसचे मुख्यमंत्री डॉ. जगन्नाथ मिश्राच्या उपस्थितीत, शरियाच्या नव्या बांधकामाचा कोनशिलासमारंभ साजरा झाला–कोर्टाचा मनाई हुकूम धाब्यावर बसवून ! आसपासचे हिंदू मग का नाही खवळणार ?

जे पुण्याला घडले, ओगलेवाडीला घडले तेच फुलवारी-शरीफला घडले. कोकणपट्टीत हे ठिकठिकाणी सध्या घडते आहे. अरबी पैशातून मोक्याच्या जमिनी गावोगाव मुस्लिम मंडळी खरेदी करीत आहेत. काही कायदेशीर मार्गांनी तर काही बेकायदेशीररीत्याही. खुद्द रत्नागिरी शहरात शिवाजीपुतळ्याजवळच असा एक जमिनीचा व्यवहार होतो आहे आणि एक तणावक्षेत्र तेथे उत्पन्न होण्याची शक्यता आहे. ओगलेवाडीला ज्या बांधकामाबद्दल हिंदू एकतावाल्यांनी आक्षेप घेतला, त्याचा विचार तेव्हाच का झाला नाही ? सर्व धर्मांतील समजस मंडळींना एकत्र करून हा वादग्रस्त बाधकामाचा प्रश्न तेव्हाच सामोपचाराने निकाली काढला गेला असता, तर आज दंगली उसळण्याची वेळच आली नसती; पण असे होणे नाही ! कारण आपला सेक्युलॅरिझम काँग्रेसछापाचा आहे, पक्षपाती आहे, फक्त हिंदूंना ठोकत राहणारा आहे. मिरजेला येऊन श्रीमंत म्हातारे अरब पैशाच्या जोरावर गरीब मुस्लिम मुलींची खरेदी करतात. या विकृत चाळ्यांबद्दल तेथील हिंदू एकता आंदोलनवाल्यांनी आवाज उठवला. प्रश्न मुस्लिमांचा आहे, मला काय त्याचे, अशी संकुचित भूमिका घेतली नाही. एकाही काँग्रेसछापी सेक्युलरवाद्याने या विशुद्ध राष्ट्रीय भूमिकेबद्दल हिंदू एकतावाल्यांचे अभिनंदन केले नाही. असे जोवर घडते आहे तोवर दंगलीही अटळ आहेत. ओगलेवाडी, कराड, पुणे, फुलवारीशरीफ, बिहारशरीफ, जमशेटपूर... नावे तरी किती घ्यायची ? ही सख्या कमी करायची असेल तर हिंदूसमाजाच्या खच्चीकरणावर, तेजोभंगावर आधारित काँग्रेसी सेक्युलरवादाचा वैचारिक आणि राजकीय पराभवच करायला हवा. ही प्रक्रिया सुरू झालेलीच आहे. काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात,

यशवंतरावांच्या कऱ्हाडात "आणि वसंतदादांच्या सांगली-मिरजेत हिंदू एकता आंदोलन उभे राहावे, याचा दुसरा अर्थ कोणता ? गांधीजी थोर महात्मे होते, नेहरू उदारमतवादी होते; पण मुस्लिमअनुनयावर आधारित असलेला त्यांचा प्रादेशिक हिंदी राष्ट्रवाद भावी पिढ्यांनी स्वीकारलाच पाहिजे असे नाही. गांधीजींचा अन्त्योदय हवा. नेहरूंचा लोकशाही समाजवाद महत्त्वाचा; पण दोघांचाही राष्ट्रवाद सदोष व अपूर्ण. हे राष्ट्र प्रथमतः हिंदूराष्ट्रच आहे. हे पुढे जायचे किंवा मागे पडायचे ते हिंदू समाजाच्या पुढे जाण्यावर किंवा मागे राहण्यावरच अवलंबून आहे. या देशाचे जे काही बरेवाईट होणार ते हिंदूसमाजाच्या बरेवाईटपणावरच अवलंबून आहे. या बहुसंख्य समाजालाच या देशात चोरट्यासारखे राहायला लावणारा सेक्युलरवाद किती दिवस टिकाव धरणार ? खरा सेक्युलरवाद शिवाजीने आचरला, टिळकांनी सांगितला. गांधी-नेहरूंच्या उदयानंतर ही खरी वाट लुप्त झाली. ती पुन्हा शोधून काढून, आचरणात आणल्याशिवाय कराड-ओगलेवाडीची पुनरावृत्ती टळणार नाही. हे प्रथमतः मुस्लिमांनी, ख्रिश्चनांनी ध्यानात घ्यायला हवे. कारण दंगली जरी त्यांच्या आडमुठेपणामुळे सुरू झाल्या तरी ते संख्येने अल्प असल्याने शेवटी नुकसान अधिक त्यांनाच सहन करावे लागणार आहे. त्यातल्या त्यात गरीब लोकांचे हाल तर अधिकच. त्यांचा काहीही दोष-अपराध नसताना बिहारशरीफच्या दंगलीनंतर अनेक गोरगरीब मुस्लिमांना हिंदूंनी आश्रय दिला, घरी ठेवून घेतले; पण या हिंदूंबद्दल चार बरे शब्द उच्चारायलाही, बिहारशरीफला जाऊन आलेल्या पुण्यातील काँग्रेस-छापी, सेक्युलरवादी, समाजवादी मंडळींची जीभ अडखळत होती. इतका जोवर हिंदुद्वेष आहे तोवर हिंदू एकता आंदोलनवादाला तरी पर्याय कसा निर्माण होणार ? आणि का व्हावा ?

—श्री. ग. मा.

## कामगार वृत्त

# गिरणी कामगारापाठोपाठ महानगरपालिका कर्मचारी

मुंबईतील २॥ लाख सुती कापडगिरणी-कामगारांचा गेले सहा महिने चाललेला बेमुदत संप अद्यापही आहे तसा असतानाच मुंबई महानगरपालिकेतील सव्वा लाख कर्मचारी बेमुदत संपावर जाण्याच्या तयारीला लागले आहेत. येत्या आठ-दहा दिवसांत जर त्यांच्या मागण्यांबाबत बोलणी झाली नाहीत तर हे कर्मचारी कोणत्याही दिवसापासून बेमुदत संपावर जाणार आहेत !

मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांबरोबरच शिक्षक, नर्सेस, फायर ब्रिगेडचे कर्मचारी आदी मिळून सव्वा लाख कर्मचारी येतात. हे सर्व कर्मचारी हिंद मजदूर सभेच्या 'म्युनिसिपल मजदूर युनियन' संघटनेच्या नेतृत्वाखाली संघटित आहेत. या संघटनेचे अध्यक्ष खा. जॉर्ज फर्नांडिस तर जनरल सेक्रेटरी महाबळ शेट्टी हे आहेत. गेल्या कित्येक वर्षांपासून खा. फर्नांडिसांनी येथे आपले नेतृत्व टिकवून धरले आहे. फर्नांडिसांच्या जोडीला येथे आणखी एक युनियन आपले अस्तित्व टिकवून आहे. या युनियनचे अध्यक्ष वासूभाई पराडकर हे आहेत. त्यांच्याकडे पालिकेचे क्लार्क्स, हेडक्लार्क्स, ऑफिस सुपरिंटेंडंटस आदी सहा-सात हजार कर्मचारी आहेत.

महापालिकेतील कर्मचाऱ्यांची इतकी मोठी संघटना असतानाही गेल्या दहा वर्षांपासून नवीन वेतनश्रेणीचे कोणतेच फायदे या कर्मचाऱ्यांना मिळालेले नाहीत. गेल्या दहा वर्षांत महागाई भरमसाठ वाढली, घरांच्या किंमती दसपट झाल्या पण या कर्मचाऱ्यांच्या वेतनात कोणतीच वाढीव भर पडलेली नाही. पालिकेतील पूर्वीचा करार १ ऑक्टोबर १९७२ ला संपला. तेव्हापासून आजमितीपर्यंत वेतनवाढीबाबत कोणताच तोडगा निघू शकला नाही. जेव्हा जेव्हा येथील एखाद्या प्रश्नाने उग्र रूप धारण केले तेव्हा तेव्हा लागलीच त्यावर मलमपट्टी मारून जखम थोपवून धरली गेली. पण त्यावर कायमचा इलाज अद्यापही निघू शकलेला नाही.

म्युनिसिपल मजदूर युनियनने वेळोवेळी हा प्रश्न धसाला लावण्याचे प्रयत्न केले; पण त्यात त्यांना यश आले नाही. आता मजदूर युनियनने आपल्या सविस्तर मागण्या पालिकेला सादर केल्या आहेत.

गेल्या दहा वर्षांपासून कामगारांची वेतनश्रेणीच निश्चित न झाल्याने नवीन वेतनश्रेणी कशा प्रकारची असावी याबद्दल सविस्तर माहिती युनियनने पालिकेला कळवली आहे. महापालिकेच्या एकूण कामगारांपैकी ७० टक्के कामगार हे चतुर्थ श्रेणीत येतात. या कामगारांच्या ११७ श्रेणी पूर्वीच्या करारानुसार सध्या अस्तित्वात आहेत. त्या रद्द करून ११७ श्रेणीतील ७०,००० कामगारांना युनियनने वेगवेगळ्या ९ विभागांत बसवले आहे. त्यानुसार त्यांचा पगार ५०० रुपयांपासून १००० रुपयांपर्यंत व्हावा अशी युनियनने मागणी केली आहे. ही नवीन वेतनश्रेणी १ जानेवारी ७९ पासून लागू व्हावी व तेवढी थकबाकी कामगारांना मिळावी अशी त्यांची मागणी आहे.

पूर्वीच्या करारानुसार कामगारांना दोन वर्षांतून एकदा ५०० रु. प्रवासभत्ता देण्यात येतो. आता एस. टी. चे, रेल्वेचे दर वाढल्याने हा प्रवासभत्ता पगाराच्या १५ टक्के म्हणजे १००० रुपयांपर्यंत द्यावा अशी युनियनची मागणी आहे. पालिकेतील उच्चाधिकाऱ्यांना हा प्रवासभत्ता ३५०० रुपये मिळतो तर कामगारांना ५०० रुपये ! या दोहोतील तफावत कमी करून परिस्थितीनुसार प्रत्येकी १००० रुपये प्रवासभत्ता द्यावा ही त्यांची मागणी आहे.

महाराष्ट्रातील ठाणे, खोपोली आदी ठिकाणच्या पालिकेतील कामगारांना वैद्यकीय भत्ता दिला जातो. पालिकेच्या रुग्णालयात कामगारांसाठी मोफत सुविधा उपलब्ध

असतानाही असा भत्ता कामगारांना दिला जातो; पण मुंबई महानगरपालिकेतील कामगार कर्मचाऱ्यांना हा भत्ता मिळत नाही. त्यांच्याप्रमाणेच येथील कामगाराला वार्षिक ६०० रुपये वैद्यकीय भत्ता मिळावा अशी युनियनची मागणी आहे. ही मागणी रास्त असल्याचे कमिशनरनी खाजगीत बोलूनही दाखविले आहे; पण कामगार-कर्मचारी अद्यापही या सुविधेपासून वंचित आहेत !

मुंबईकरांना सर्वांत भेडसावणारा प्रश्न राहत्या घरांचा ! पालिकेच्या अखत्यारीत येणाऱ्या दवाखाना–शाळा आदींतील कामगार-कर्मचाऱ्यांसाठी घरे देण्यात यावीत ही रास्त मागणी ! पण गेल्या दहा वर्षांत ही मागणी दुर्लक्षित राहिली. पालिकेतील एकूण कामगारांपैकी दहा टक्के लोकांचीही पालिकेकडून राहण्याची व्यवस्था होऊ शकली नाही. मध्यंतरी सहकार पद्धतीने घरे बांधून देण्याची एक योजना पालिकेने राबवली. यानुसार घरे बांधण्यासाठी जागा आणि कर्ज कामगारांना देण्यात आले. यानुसार बांधण्यात आलेल्या १३३ सोसायट्यांमध्ये सुमारे पाच हजार कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय करण्यात आली; परंतु ज्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी ही योजना आखली त्यांना घरे न मिळता ती वरच्याच लोकांना दिली गेली अशी सर्वांची तक्रार आहे. म्हणूनच पालिकेने आपल्या कर्मचाऱ्यांना घरे बांधून द्यावीत ही प्रमुख मागणी युनियनने समोर ठेवली आहे.

याशिवाय कँटिनमधील खाद्यपदार्थ स्वस्त दरात मिळावेत, महाराष्ट्र सरकारच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे पालिकेतील कर्मचाऱ्यांनाही शहरभत्ता मिळावा, शहरातील कचरा वाहून नेण्यासाठी जे कंत्राट दिले आहे ते रद्द करून हे काम पालिकेमार्फतच केले जावे अशाही मागण्या आहेत.

येथे भेडसावणारा आणखी एक प्रश्न बदली कामगारांचा ! असे १८ ते २० हजार बदली कामगार येथे आहेत. त्यांना महिन्यातून फक्त १० ते १२ दिवस काम मिळते; पण काम मिळवण्यासाठी त्यांना रोज येथे यावे लागते. पदवी धारण केलेल्या एखाद्या इसमासही येथे बदली कामगार म्हणून झाडूवाल्याचे काम मिळते असे येथे ऐकिवात आहे. म्हणूनच जे कर्मचारी एका वर्षापेक्षा जास्त काळ बदली कामगार म्हणून काम करतात, त्यांना कायम केले जावे अशी युनियनची मागणी आहे. त्यांना कायम करेतोपर्यंत बेकारभत्ता देण्यात यावा अशीही त्यांची मागणी आहे.

या सर्व मागण्या म्युनिसिपल मजदूर युनियनने ७ मे १९८१ रोजी पालिकेला सादर केल्या आहेत; पण अद्यापही परिस्थिती आहे तशीच आहे. आता संघर्षाशिवाय पर्याय नाही हे युनियनला कळून चुकले आहे. या सर्व मागण्यांचा वार्षिक ३० कोटी रुपये बोजा पालिकेवर पडतो. एवढा बोजा सहन करण्याची पालिकेची आर्थिक कुवत नाही, म्हणूनच हा प्रश्न रेंगाळत पडला आहे. आता युनियनने बेमुदत संपावर जाण्याची हाक दिल्याने पालिका जागी झाली तर ठीक ! नाही तर हॉस्पिटलपासूनच या आंदोलनाला सुरुवात होणार आहे. मुंबईतील २॥ लाख गिरणीकामगार ज्या धैर्याने लढा देत आहेत तोच आदर्श डोळ्यांसमोर ठेवून हा कर्मचारी तयार झाला आहे. तेव्हा लढाई केव्हा सुरू होते याचीच आता प्रतीक्षा आहे !

— मोहन शंकर कुलकर्णी

---

## परराष्ट्र

# युगोस्लाव्हिया

## टिटोनंतरची आव्हाने

वा. दा. रानडे

---

टिटोंच्या निधनानंतर युगोस्लाव्हियाच्या कम्युनिस्ट पक्षाची पहिली काँग्रेस नुकतीच पार पडली. टिटोंसारख्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने त्यांच्या निधनानंतर युगोस्लाव्हिया त्यांचीच धोरणे पुढे चालू ठेवील की निराळ्या मार्गाने जाईल ? रशियाचा प्रभाव त्या देशावर वाढेल, की तो पाश्चात्य राष्ट्राकडे अधिक झुकेल ? की तो आपली अलिप्तता कायम टिकवील? या प्रश्नांना गेल्या दोन वर्षांत मिळालेल्या उत्तरांवरून टिटोंचीच धोरणे नवे नेते पुढे चालू ठेवणार हे स्पष्ट झालेच होते. काँग्रेसने त्यांच्या धोरणांवर शिक्कामोर्तब केले आहे. कारखान्यावर कामगारांचे स्वयं-व्यवस्थापन, विकेंद्रीकरण आणि अलिप्त परराष्ट्रधोरण ही टिटोंच्या धोरणांची मुख्य सूत्रे होती. ती पुढे चालू राहाणार आहेत. सरकारवर दोन हजार कोटी डॉलर कर्जाचा बोजा आहे. त्याच्या परतफेडीची सरकारची योजनाही काँग्रेसने मान्य केली; पण युगोस्लाव्हियाच्या सहा प्रजासत्ताकांत संघर्ष वाढत आहे. त्यावर मात्र समाधानकारक तोड नव्या नेतृत्वाला अजून काढता आलेली नाही.

प्रभावी नेत्याच्या निधनानंतर त्याच्या अनुयायांमध्ये सत्तेसाठी संघर्ष होतो तसे युगोस्लाव्हियात घडले नाही. एकाच व्यक्तीचे हाती सत्ता केंद्रीत होऊ नये यासाठी युगोस्लाव्हियात अध्यक्षपद वरिष्ठ नेत्यांत क्रमाक्रमाने फिरते ठेवले जाते. टिटोंच्या काळातच आखली गेलेली ही योजना त्यांच्या निधनानंतर कोणतेही अडथळे किंवा अडचणी निर्माण न होता चालू आहे.

युगोस्लाव्हियाच्या संघराज्यात सर्बिया, मॅसिडोनिया, मॉन्टेनेग्रो, बोस्निया, क्रोशिया आणि स्लोव्हेनिया ही सहा प्रजासत्ताक राज्ये आहेत. त्यातून एकात्म संघराज्य निर्माण करण्याच्या प्रयत्नांना अजून फारसे यश आलेले नाही. देशाची फाळणी होण्याइतक्या टोकापर्यंत या प्रजासत्ताकांमधील संघर्षाची तीव्रता वाढलेली नाही; पण आपल्या प्रजासत्ताकाबाहेर दुसऱ्या प्रजासत्ताकात आपल्या मालाची निर्यात करणे, उद्योगधंदे उभारणे ही प्रवृत्ती वाढण्याऐवजी कमीच झाली आहे. १९७० मध्ये ही प्रजासत्ताके आपल्यातल्याच दुसऱ्या प्रजासत्ताकाशी ४० टक्के मालाची निर्यात करीत असत. दहा वर्षांनी हे प्रमाण ३१ टक्क्यांपर्यंत घटले. तीन टक्क्यांपेक्षाही कमी औद्योगिक कंपन्यांनी आपल्या प्रजासत्ताकाबाहेर दुसऱ्या प्रजासत्ताकात उपकंपन्या काढल्या आहेत. याबाबत सरकारने केलेल्या आवाहनांना फारसा अनुकूल प्रतिसाद मिळालेला नाही.

युगोस्लाव्हिया कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास या वर्षी प्रसिद्ध व्हावयाचा होता. पण दुसऱ्या महायुद्धात या सहा प्रजासत्ताकांतील

लोकांनी बजावलेल्या कामगिरीबद्दल बुद्धिवंतांमध्ये तीव्र मतभेद झाल्याने ते काम लांबणीवर पडले आहे झाग्रेब येथील लोक्सिकोग्राफिकल इन्स्टिटयूट गेली अनेक वर्षे युगोस्लाव्ह ज्ञानकोश तयार करीत आहे. पण त्याच्या नव्या आवृत्तीतील ऐतिहासिक विश्लेषणाबद्दल विचारवंतामध्ये मतभेद निर्माण झाले आहेत. मॉन्टेनेग्रिन लोक हे आतापर्यंत स्लाव्ह वंशीय व सर्बियाचाच एक भाग मानले जात होते; पण आता त्यांच्यातलेच इतिहासकार म्हणत आहेत की, आम्ही इलिरियन किंवा डुक्ल जात म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिगरस्लाव्ह बाल्कन वंशाचे आहोत.

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने काहीच प्रगती झालेली नाही असा याचा अर्थ नाही. आपल्या प्रजासत्ताकाबाहेर दुसऱ्या प्रजासत्ताकातील लोकांशी विवाहांचे प्रमाण वाढत आहे. गेल्या वर्षीच्या शिरगणतीचे वेळी २ कोटी २३ लाख लोकांपैकी बारा लाख लोकानी आपले राष्ट्रीयत्व 'युगोस्लाव्ह' असल्याचे सांगितले. दहा वर्षांपूर्वीच्या शिरगणतीत अशी नोंद करणारांचा आकडा याच्या एकपंचमांश होता. असे असले तरी सर्ब आणि बिगर सर्ब याचे संबंध अजून तणावाचे आहेत. सर्बिया हे युगोस्लाव्हियामधील सर्वांत मोठे प्रजासत्ताक. तेथील सर्ब लोक आपल्यावर प्रभुत्व गाजवितील अशी चिंता बिगर सर्ब लोकाना वाटत असते. या भिन्न्या प्रादेशिक लोकसमूहामध्ये अजून एकात्मता निर्माण होऊ शकलेली नाही.

याच संबंधात कोसोव्हो प्रांतांच्या प्रश्नाचा विचार करायला हवा. हा प्रांत सध्या सर्बियन प्रजासत्ताकाचा भाग असला तरी तेथील बहुसंख्य लोक अल्बानियन आहेत. सर्बियातून फुटून निघून इतर सहा प्रजासत्ताकांप्रमाणे आपले सातवे प्रजासत्ताक स्थापन करावे अशी त्यांची मागणी आहे. गेल्या वर्षी या प्रश्नावर तेथे दंगली झाल्या होत्या. त्या मोडून काढण्यात आल्या; पण तरुणांचे गट अजूनही मधूनमधून निदर्शने करतात. शेकडो लोकांना अटक झालेली आहे. सरकारचा व कम्युनिस्ट पक्षाचा या फुटीर चळवळीस पूर्ण विरोध आहे. अल्बानियन राष्ट्रवाद्याची सरकारी यंत्रणेच्या जागांवरून तसेच कम्युनिस्ट पक्षातील अधिकारपदांवरून पूर्ण हकालपट्टी करण्यात आली आहे.

यातूनच आणखी एक प्रश्न निर्माण झाला आहे. कोसोव्हो प्रांतातून सर्ब लोक स्थलांतर करीत आहेत. हे स्थलातर गेली अनेक वर्षे संथपणे चालू होतेच; पण आता बेलग्रेडमधील वृत्तपत्रे त्याकडे अधिक लक्ष देऊ लागली आहेत. कोसोव्होमध्ये राहणाऱ्या सर्बियन लोकाचा अल्बानियन लोक छळ करतात, अशा बातम्याही प्रसिद्ध होत आहेत. कोसोव्हो प्रांतात सर्बियन लोकांचे प्रमाण १९७१मध्ये १८·३टक्के होते. ते पाच टक्क्यांनी घटून १३·२ टक्क्यांवर आले आहे; पण कोसोव्होमधील सर्बियनांच्या या स्थितीबद्दल इतर प्रजासत्ताकातल्या लोकसमूहांना फारशी सहनुभूती दिसत नाही. अशा छळाच्या बातम्यांना भडक प्रसिद्धी देऊन सर्बियन लोक चूक करीत आहेत असे त्यांना वाटते, तर काहीना अशी चिंता वाटते की, सर्बियन लोक कोसोव्होमधील संघर्षाचा फायदा घेऊन देशाच्या इतर भागावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतील.

असे अंतर्गत संघर्ष असले तरी देशाची फाळणी होण्याच्या टप्प्यापर्यंत ते जाऊ न देता युगोस्लाव्ह-नेते त्यातून मार्ग काढतील. कोसोव्हो प्रांतातील अल्बानियन लोकांना आपले स्वतंत्र प्रजासत्ताक स्थापन व्हावे असे तीव्रतेने वाटत असेल तर ती मागणी फार काळ अमान्य करता येणार नाही; पण सर्बिया प्रजासत्ताकाच्याच अंतर्गत कोसोव्हो प्राताला स्वायत्त प्रदेशाचा दर्जा देऊन तेथील अल्बानियन लोकांच्या हितसंबंधाचे रक्षण करता येईल. रशिया व चीनमध्ये भिन्न लोकसमूहांचे असे स्वायत्त प्रदेश आहेत. तेव्हा अशी तोड या प्रश्नावर युगोस्लाव्ह-नेते काढणे शक्य आहे.

भिन्न संस्कृती, भिन्न इतिहास व भिन्न परंपरा असलेल्या प्रादेशिक लोकसमूहांचे एकात्म राष्ट्र कसे निर्माण करावयाचे हा प्रश्न कम्युनिस्ट राष्ट्रांपुढेही आहे. स्वायत्त प्रजासत्ताक, स्वायत्त प्रदेश या मार्गांनी त्यावर तोड त्यांनी काढली असली तरी तणाव व संघर्ष पूर्णपणे दूर होऊ शकलेले नाहीत हे युगोस्लाव्हियावरून दिसून येते. □


तिचं सौंदर्य हाच तिचा शाप ठरला !....
स्त्रीबुवाबाजीवर झोत टाकणारी
'माणूस'मधून क्रमशः प्रसिद्ध
झालेली कादंबरी आता पुस्तकरूपात
प्रकाशित झाली.

सबला
माधव शिरवळकर

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
मूल्य रुपये बारा

## अवती भवती

शरद कृष्णन

## □ नवीन राष्ट्रपती–ग्यानी झैलसिंग

गेल्याच सप्ताहामध्ये पार पडलेल्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीमध्ये अपेक्षेप्रमाणे इंदिरा कॉंग्रेसचे उमेदवार ग्यानी झैलसिंग भारतीय प्रजासत्ताकाचे सातवे राष्ट्रपती म्हणून निवडून आले आहेत. आता २५ तारखेला त्यांचा रीतसर शपथविधी होऊन ते सत्ताग्रहण करतील. त्यांच्या कारकीर्दीमध्ये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होणार असल्याने त्यांचे स्थान आणि निर्णय यांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. ८५ साली होणाऱ्या निवडणुका त्रासदायक ठरू शकतील याची थोडी–फार जाणीव असल्यानेच विरोधी पक्षाकडून सर्वसंमत पसंतीचा प्रस्ताव पुढे आला असतानाही इंदिराजींनी आपल्या विश्वासाचा नेता राष्ट्रपतिभवनामध्ये नेऊन बसवला आहे. निवडणुकीपूर्वी राष्ट्रपतिपक्षाचे उमेदवार असताना झैलसिंग यांच्यावर भरपूर चिखलफेक करण्यात आली. आपल्या प्रचारासाठी झैलसिंग यांनी जो देशव्यापी दौरा केला त्या वेळी मतदारांसमोर म्हणजेच आमदार मंडळीसमोर केलेली भाषणे पुष्कळच समाधानकारक होती. त्यांना भरपूर प्रशासकीय अनुभव आहे. तशीच वेळ आली तर सर्वसाधारण परिस्थितीमध्ये केवळ नामधारी राष्ट्रप्रमुख असलेल्या राष्ट्रपतींना मौलिक कामगिरी बजावावी लागते. राष्ट्राच्या राजकीय भवितव्यावर अनेक दूरगामी परिणाम करणारे निर्णय निवृत्त होत असलेल्या राष्ट्रपतींना घ्यावे लागले होते. झैलसिंग यांच्यावर महत्त्वपूर्ण निर्णय करण्याची वेळ येणारच नाही असे म्हणण्यासारखी परिस्थिती सध्या नाही. झैलसिंग यांची पक्षनिष्ठा, इंदिरानिष्ठा वादातीत आहे. किंबहुना तसे असल्यामुळेच त्यांना त्यांच्या पक्षाची उमेदवारी मिळू शकली. पक्षीय कोशाच्या बाहेर पडून आपण आपल्या घटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडू असे त्यांनी सांगितले असले तरी तसेच निर्णायक परिणाम करणारे निर्णय घेण्याची वेळ त्यांच्यावर आली आणि पळवाटा उपलब्ध असल्या तर ते इंदिराजी आणि त्यांचा पक्ष यांना लाभदायक ठरणारे निर्णय घेऊन मोकळे होतील. पंजाबचे मंत्री आणि पुढे पंजाबचे मुख्य मंत्री म्हणून त्यांनी काम केले असले तरी गृहमंत्री म्हणून काही ते प्रभावी ठरू शकले नाहीत. त्यांनी गृहामध्ये केलेल्या अनेक बेधडक विधानांनी त्यांना आणि सत्ताधारी पक्षाला अडचणीत आणले होते. खास सरदारजींच्या नावे नोंदल्या जाव्यात अशा काही नोंदी त्यांच्या नावेही जमा आहेत. अलीकडेच तामीळनाडूमधील काही आमदार त्यांना भेटायला आले होते. थोडेफार इकडचे तिकडचे बोलणे झाल्यावर त्यांनी कामाची चौकशी केली तेव्हा आलेल्या मंडळींपैकी एकाने कर्टसी कॉल असल्याचे बोलून दाखवले. आपण कामाबद्दल वगैरे विचारले होते हे विसरून जाऊन झैलसिंग यांनी समोरच्या फोनकडे बोट केले आणि संबंधित आमदाराला ते म्हणाले, 'तो फोन तिथे आहे. आपण वाटेल तेवढे फोन करू शकता.' गृहमंत्री म्हणून गृहामध्ये ते एकदा काही निवेदन करत होते. संबंधित बाब गुप्तचर विभागाकडे सोपवली आहे असे त्यांना सांगायचे होते; पण ते बोलून गेले 'द मॅटर हॅजबीन रिफरड् टू द इंटलिजंशिआ ?' त्यांना प्रत्यक्षात म्हणायचे होते हे भिंटलिजन्स ब्युरो. पुढे अर्थात तशी दुरुस्ती करण्यात आली. शक्यतेच्या टप्प्यात असणाऱ्या सर्व राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण झाल्यामुळे राष्ट्रपतिपदी झालेली निवड ह्या झैलसिंग यांचा मोठाच सन्मान मानला पाहिजे. ६६ वर्षांचे झैलसिंग आपल्या निवडीबद्दल समाधानी आहेत. अल्पसंख्य असलेल्या शीख समाजामधील नेत्याला राष्ट्रपतिपदी विराजमान होण्याचा सन्मान प्रथमच मिळत आहे. झैलसिंग यांचे खाजगी आयुष्य सुखीसमाधानाचे आहे. फरिदाकोट या त्यांच्या मूळ गावी यांची ५७ एकर जमीन आहे. जन्माने ते सुतार समाजामधील असले तरी त्यांचा एकुलता एक मुलगा शेतीव्यवसाय करतो. झैलसिंग यांच्या तीन मुलींपैकी दोघींनी डॉक्टरीचा अभ्यासक्रम पूर्ण केला असून त्या आपआपल्या घरी सुखीसमाधानी आहेत. त्यांच्या पत्नी प्रधानकौर या घरप्रपंच करणाऱ्या सर्वसाधारण भारतीय महिलेप्रमाणे आहेत. त्या शेती करणारा आपला मुलगा जोगींदरसिंग व त्यांची पत्नी यांच्याबरोबर जास्त काळ असतात. आपल्या पतीबरोबर राष्ट्रपतिभवनामध्ये राहण्याचा त्यांचा विचार असला तरी झैलसिंग यांचा मुलगा जोगींदरसिंग मात्र त्यांना अधूनमधून भेटण्यासाठी राष्ट्रपतिभवनात जाणार आहे. आपण आपला शेतीचा व्यवसाय चालू ठेवू असे त्याने सांगितले आहे.

'इंडिया टुडेच्या' प्रतिनिधीने झैलसिंग यांच्याशी बातचीत केली असता त्यांनी सांगितले, राष्ट्रसेवेचे जे काम मी इतकी वर्षे केले आहे तेच काम मी राष्ट्रपतिभवनातून करीन. मात्र ही भूमिका वठवत असताना माझ्या आजवरच्या वाटचालीला असलेले राजकीय संदर्भ यापुढे रहाणार नाहीत. झैलसिंग यांच्याबरोबर झालेली प्रश्नोत्तरे बरेच काही सांगून जातात.

**प्रश्न :** राष्ट्रपतिपदी निवड झाल्याबद्दल आपली काय प्रतिक्रिया आहे ?

**उत्तर :** ही निवड तशी अपेक्षितच असली तरी आता अधिकृतपणे निकाल जाहीर झाला असल्याने समाधानाच्या भावनेने आणि नम्रपणे मी या विजयाचा स्वीकार करतो.

**प्रश्न :** राष्ट्रपतिपदी निवड म्हणजे क्रियाशील राजकारणातून निवृत्ती असे आपल्याला वाटत नाही का ? आयुष्यभर क्रियाशील राजकारण केलेल्या आपल्यासारख्या व्यक्तीला या बदललेल्या परिस्थितीशी कसे जमवून घेता येईल ? क्रियाशील राजकारण म्हणजे

नेमके काय ? राजकारणाकडे पाहण्याचा तुमचा व्यक्तिगत दृष्टिकोन कसा आहे, यावर पुष्कळसे अवलंबून आहे. मी राष्ट्रपतिपदाचा कालखंड हा माझ्या राष्ट्रसेवाकार्यांचा पुढील महत्त्वपूर्ण टप्पा आहे असे मानतो. मात्र त्याचबरोबर आजवर ज्या जबाबदारीच्या जागेवरुन राष्ट्रसेवा केली आहे त्या कामामध्ये आणि राष्ट्रपतिपदावरून मला बजावाव्या लागणाऱ्या कामामध्ये फरक आहे याची जाणीव मी ठेवली आहे. पक्षीय राजकारणाच्या कक्षा ओलांडून राष्ट्राची सेवा करण्याची संधी देणारे पद या दृष्टीने मी राष्ट्रपतिपदाकडे पाहतो.

प्रश्न : आपल्या पक्षाने आपली निवड का केली ? आपल्याला असे वाटते का, की जातीय दृष्टिकोनातून सोयिस्कर असल्याने आपली निवड झाली ? खेरीज इंदिराजीवरील आपल्या असाधारण निष्ठेचाही विचार केला गेला ?

उत्तर : हे प्रश्न मला विचारण्याचे प्रयोजन असू नये. वास्तविक पाहता हे सारे तुम्ही पक्षश्रेष्ठींना विचारावे हे उत्तम. मी फक्त एवढेच म्हणू शकेन की, राष्ट्रपपतिदाची जबाबदारी मी उत्तमप्रकारे पार पाडू शकेन असा विश्वास असल्यामुळेच त्या वेळी माझी निवड झाली असावी. मी माझ्या भाषणातून राष्ट्रपती हा देशाचा असतो, पक्षाचा नसतो, हे निवडणुकीपूर्वीच सांगितले आहे. राष्ट्रपतिपदाची जबाबदारी मी पक्षविरहित भूमिकेतूनच पार पाडीन.

प्रश्न : इंदिराजीच्या निर्णयामुळे राष्ट्रपतिपद मिळत असल्याने आपल्या निर्णयावर त्यांचा प्रभाव राहील असे आपल्याला वाटत नाही का ? खेरीज आपण पक्षविरहित दृष्टिकोनातून आपली जबाबदारी पार पाडू शकणार नाही असेही विरोधी पक्षांना वाटते. त्याबाबत आपली प्रतिक्रिया काय आहे ?

उत्तर : राष्ट्रपती व पंतप्रधान याच्यामध्ये संघर्षात्मक भूमिका असावी असे मानणे चुकीचे आहे. इतकेच नव्हे तर ते घटनेच्या विरोधात आहे. या संदर्भात माझे असे स्पष्ट मत आहे की, राष्ट्रपतीच्या अधिकाराबाबत असलेली घटनात्मक बंधने लक्षात घेतली तर असा संघर्ष संभवनीय नाही. खेरीज पंतप्रधान हा कार्यकारी प्रमुख असल्याने त्याला अभिप्रेत असलेल्या गतिमान दिशेने सरकारचे कामकाज चालले पाहिजे आणि सर्वसाधारणपणे राष्ट्रपतीचा दृष्टिकोन हा सहकार्याचाच असला पाहिजे याबाबत माझ्या मनात संदेह नाही. खेरीज आपली चौकट सांभाळूनही राष्ट्रपतींना बरेच काही करता येते असे मला वाटते.

प्रश्न : नेमके कोणत्या स्वरूपाचे काम राष्ट्रपतींना करता येईल असे आपल्याला वाटते ?

उत्तर : खरे सांगायचे तर राष्ट्रपतीच्या कामाचे स्वरूप घटनेमध्ये पुरेशा स्वरूपात स्पष्ट केले आहे आणि अनेक घटनातज्ज्ञांनी राष्ट्रपतीच्या अधिकाराबाबत विवेचनही केले आहे. सरकार व राष्ट्रपती यांच्यामध्ये सामंजस्य असेल तर अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांच्या बाबतीत राष्ट्रपती आपल्या अनुभवांचा आणि विचारांचा लाभ शासनाला देऊ शकतात आणि राष्ट्रपतीच्या मताची कदरही शासनाकडून केली जाते.

प्रश्न : राष्ट्रपतींनी पंतप्रधानाशी परिपूर्णरीत्या एकनिष्ठ रहावे आणि पंतप्रधानांच्या प्रत्येक मताचा त्याने स्वीकार करावा अथवा आपल्या स्वतःच्या मताच्या आधारे समोर आलेल्या विषयावर मत व्यक्त करावे.

उत्तर : राष्ट्रपतिपद हे सर्वोच्च बहुमानाचे पद असले तरी कार्यकारी स्वरूपाची सत्ता राष्ट्रपतींना नाही. त्यांनी राष्ट्राची एकात्मता सांभाळणे आणि शासन सुरक्षित चालले आहे याबाबत खातरजमा करून घेतल्यावर पंतप्रधानाशी विसंवादी सूर लावण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

प्रश्न : राष्ट्रपतिपदाची जबाबदारी स्वीकारत असताना देशासमोरील कोणते प्रश्न आपल्याला विशेष भेडसावतात ?

उत्तर : देशापुढे आज असंख्य प्रश्न आ वासून उभे आहेत. देशाची एकात्मता टिकवणे विशेष महत्त्वाचे असल्याने फुटीर प्रवृत्तीचा कठोरपणे बीमोड करावा लागेल. खेरीज, आर्थिक विकासाचा प्रश्न विशेष महत्त्वाचा आहे. आपण समाजवाद, निधर्मी वातावरण आणि लोकशाही या तीन मूल्याचे विशेष जतन करतो असे सांगून झैलसिंग म्हणतात हेच धोरण कठोरपणे अमलात आणले तरच भारतासारखे बहुभाषी व विभिन्न पंथांना सामावून घेणारे राष्ट्र प्रगती करू शकेल. जागतिक शांततेच्या दृष्टीने भारत नेहमीच प्रयत्नशील राहिला आहे. कै. जवाहरलालजी व इंदिराजी यांनी या संदर्भात केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा आतरराष्ट्रीय पातळीवर झालेली आहे. स्वसंरक्षणाच्या बाबतीत खंबीरपणे उभे राहून हेच धोरण आपल्याला पुढेही अंमलात आणावे लागेल.

झैलसिंग यांच्यापूर्वी राष्ट्रपती म्हणून काम बजावलेल्या सर्व राष्ट्रपतींनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेली आहे. अपवाद असलाच तर तो फकरुद्दीन अलीअहंमद यांचा. ते राष्ट्रपती असताना व्यंगचित्रकार अबू यांनी एक कार्टून प्रसिद्ध केले होते. टबमध्ये बसून स्नान घेता घेता राष्ट्रपती एका वटहुकुमावर सही करत असून बाहेर उभ्या असलेल्या सेवकाला सागत आहेत आणखी काही वटहुकूम असतील तर त्यांना थोडा वेळ थाबायला सांगा. एक फकरुद्दीन अलि अहंमद यांचा अपवाद वगळता व्ही. व्ही. गिरीसुद्धा अन्य सर्व राष्ट्रपतींनी आपल्या अस्तित्वाची चुणुक दाखवली आहे. कै. गिरी हे रबरी शिक्का म्हणून बदनाम असले तरी अनेक महत्त्वपूर्ण प्रश्नांवर त्यांनी आपले विचार परखडपणे व्यक्त केले होते. पहिले राष्ट्रपती कै. राजेंद्रप्रसाद यांनीही घटनात्मक चौकटीमध्ये राहून आपला ठसा उमटवला होता. दोन वेळा राष्ट्रपतिपद लाभलेले ते एकमेव राष्ट्रपती होते. त्यांची फेरनिवड करण्यास जवाहरलालजीचा विरोध होता; परंतु मरहूम मौलाना अबुल कदम आझाद यांनी त्याची बाजू जोरदारपणे उचलून धरली. त्यांच्या उमेदवारीचे समर्थन करताना ते म्हणाले, राजेंद्रबाबू माझ्याप्रमाणे किंवा जवाहरलाल यांच्याप्रमाणे स्वतंत्र सैनिक आहेत. त्याना वयस्कर म्हणून बाजूला सारण्याचे प्रयोजन नाही. खेरीज जवाहर आणि मी जर फेरनिवडणूक लढवू शकतो, तर राजेंद्रबाबूंना अशी निवडणूक लढवण्याचा अधिकार आहेच. स्वातंत्र्यइतिहासाची पाने उलटली तर राजेंद्रबाबूंचे नाव मला दिसते. अन्य काही नावेही आढळतात; परंतु जवाहर ज्यांची तरफदारी करत आहेत त्या सर्वपल्ली राधाकृष्णन याचे नाव मात्र कोठे दिसत नाही. आता मौलवीजींनी एवढी जोरदार तरफदारी केल्यावर राजेंद्रबाबूंची फेरनिवड करण्याच्या दृष्टीने वातावरण तयार झाले. कै. राधाकृष्णन पुढे राष्ट्रपती झाले. प्रगल्भ प्रज्ञेच्या या विचारवंताने राष्ट्रपतिपदाची

घान तर वाढवलीच; पण खेरीज जवाहरलालजींच्या अखेरच्या काळात राजकीय निर्णयही प्रभावित केले. कै. कृष्णमेनन यांना संरक्षणमंत्रीपद सोडावे लागले त्यामागे कै. राधाकृष्णन यांचा मोठा वाटा होता. त्यांच्याच कारकीर्दीत जवाहरलालजींचे निधन झाले. तथापि सुयोग्य पद्धतीने सत्तांतर घडवून आणण्याची जबाबदारी त्यांनी उत्तम प्रकारे पार पाडली. झाकीर हुसेन हे राजकारणापासून अलिप्त होते. शिक्षणशास्त्राचा त्यांचा व्यासंग गाढा होता. राष्ट्रपतिपदाची त्यांची कारकीर्द तशी छोटेखानी असली तरी शानदार होती. घटनात्मक तरतुदींनी राष्ट्रपतींच्या मर्यादा पुरेशा स्पष्ट केल्या असल्या तरी विशेष परिस्थितीमध्ये राष्ट्रपती किती परिणामकारक कामगिरी बजावू शकतो याची झलक संजीव रेड्डी यांनी दाखवली असल्याने यापुढे ज्याच्या पाठीशी हुकमी बहुमत आहे असा कोणीही पंतप्रधान जबर राजकीय महत्त्वाकांक्षा असलेल्या आपल्या सहकाऱ्याला राष्ट्रपतिभवनात नेऊन बसवणार नाही. राष्ट्रपतिपदाची सर्वसाधारण परंपरा उज्ज्वल आहे. झैलसिंग ज्याप्रमाणे बोलून दाखवतात त्याप्रमाणे त्यांनी आता खरोखरच पक्षातीत भूमिका घेतली तर त्यांचे केवळ विरोधी पक्षाकडूनच नव्हे तर सर्वसाधारण जनतेकडूनही स्वागतच होईल. ८५ साली होणाऱ्या निवडणुकीमध्ये इंदिराजींना बहुमत मिळाले तर ठीक; पण ते न मिळाले आणि कठीण राजकीय परिस्थिती निर्माण झाली तर झैलसिंग यांना महत्त्वपूर्ण कामगिरी बजवावी लागेल. मात्र सामान्यपणे त्यांचे निर्णय इंदिराजींना लाभदायक ठरणारे असतील असा एक अंदाज आहे.

## □ महाराष्ट्राचे राजकारण – मुख्यमंत्री विरूद्ध अंतुले गट

राष्ट्रपतिपदाची निवडणूक होईपर्यंत थांबा म्हणून आदेश आल्याने २० जूनला होणारी इंदिरा काँग्रेसच्या महाराष्ट्रामधील आमदारांची बैठक मुख्यमंत्र्यानी पुढे ढकलली असली तरी रामराव आदिकांच्या बंगल्यावर झालेल्या बैठकीमध्ये बंडाचे निशाण फडकावले गेले आहे. उच्च न्यायालयामध्ये केलेल्या अपिलाचा निर्णय विरोधात गेला असला तरी अंतुलेगट तसा थंड पडलेला नाही. भोसले यांच्या नेतृत्वाविरुद्ध वातावरण तयार करण्यात येत आहे. रामरावांनी पक्षाच्या केंद्रीय नेत्याविरुद्ध आपण कोणतीही हालचाल करत नसून आपले सारे लक्ष महाराष्ट्राच्या अकार्यक्षम मुख्यमंत्र्यांना हलवण्यावर आहे हे स्पष्ट केले आहे. विधानसभेमध्ये असलेल्या २३६ आमदारांपैकी १५० हून जास्त आमदारांचा आपल्याला पाठिंबा असल्याचा बंडखोरांचा दावा आहे. नेतृत्व बदलण्यासाठी पक्षश्रेष्ठींवर वाढत्या प्रमाणात दडपण येणार असल्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहेत. अंतुलेजींनी आमदारांना अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या; परंतु याबाबत भोसले यांचे धोरण ताठरपणाचे आहे. शासन एकदम थंडावले असून पक्षाच्या आमदारांना विश्वासात न घेता मुख्यमंत्री मनमानी कारभार करत आहेत असा मुख्य आक्षेप असून आपल्या विविध नातेवाइकांना त्यांनी सत्तास्थाने दिली आहेत. केन्द्रीय नेत्यांना पुरेशा पुराव्यासह एक निवेदन पाठवण्यात आले आहे. साखरकारखान्यांचे राजकारणही विद्यमान मुख्यमंत्र्यांच्या विरोधात उभे आहे. अंतुले परत येण्याचा संभव नसला तरी त्यांचा प्रभाव टिकून आहे. खेरीज विविध प्रतिष्ठानांच्या पैशावरील त्यांचे नियंत्रण आले आहे. दोन्ही बाजूंनी मोर्चेबंदी चालू आहे. भोसले यांची भूमिका सौम्य असली तरी केन्द्रीय नेत्यांचा आशीर्वाद मिळाला तर अंतुलेगटाला एखादा निर्णायक तडाखा ते जरूर देतील असा एक अंदाज आहे. आमदारनिवासामध्ये जाऊन आमदारांची भेट घेण्याचा त्यांचा प्रयत्न म्हणजे घबराट आहे असे जे भासवले जात आहे ते तितकेसे बरोबर नाही. बंडखोरी झालीच तर किती आमदार विरोधी गटामध्ये आहेत याचा त्यानी अंदाज घेतला असून ही संख्या ५० पेक्षा जास्त नाही असा त्याचा दावा आहे. खेरीज बंडखोर अवाजवी ताकदीचा दावा करत असले तरी पक्षाची चौकट सोडणार नसल्याने केन्द्रीय नेत्यांवर वाढत्या प्रमाणात दबाव आणण्याचे प्रयत्न चालूच राहातील आणि इंदिराजींचा आपल्याला आशीर्वाद असल्याने अंतुलेगटाने आपल्या विरोधी कितीही बोटे मोडली तरी आपल्या सत्तेला बाधा येणार नाही. गिरणीकामगारांच्या प्रश्नाबाबत मुख्यमंत्र्यानी हालचाल सुरू केली आहे. त्याबाबत तडजोड झाली तर केन्द्रीयनेते त्याना आता हात लावणार नाहीत. स्वतः इंदिराजी केन्द्रीय मंत्रिमंडळामधील संभाव्य फेरबदल, उत्तर प्रदेशामधील राजकारण आणि कर्नाटक व आंध्रप्रदेशामधील वाढती बंडखोरी यासारख्या विषयांमध्ये डोके घालून बसलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये त्या सध्या तरी मुख्यमंत्र्यांच्या मागे खंबीरपणे उभ्या राहातील असा मुख्यमंत्र्यांचा पाठपुरावा करणाऱ्या मंडळीचा अंदाज आहे. याबाबतची खातरजमा झाल्यावर मुख्यमंत्री अंतुलेजींना आणखीन एक तडाखा देण्याची शक्यता आहे. आपले मंत्रिमंडळ बनवताना त्यांनी अंतुले मंत्रिमंडळामधील १९ नामदारांची झूल उडवली आहे हे विसरता येणार नाही. □


# टॉलस्टॉय – एक माणूस

दुसरी आवृत्ती

लेखिका : सुमती देवस्थळे

किमत : ५५ रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०



रामन इन्स्टिटयूटमध्ये
डॉ. चंद्रशेखर

**विज्ञानेश्वरी**

# पेकिंग ते टिंबकटू

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

**चीनच्या वैज्ञानिक प्रगतीचा आलेख**

जवळजवळ सातशे वर्षांपूर्वी या जगातील एक अतिशय अवघड शास्त्रीय ग्रंथ माझ्या मराठीत आला. माझ्या भाषेचे ज्ञान सांगण्याचे आणि समजावून घेण्याचे सामर्थ्य या ग्रंथाने सहजपणे सिद्ध केले. त्यानंतर आपण दरवर्षी ज्ञानेश्वरीची शतसहस्र पारायणे केली आणि ही अशी पारायणे घडत असतानाच गावोगावचे प्राध्यापक आणि विचारवंत मराठीतून विज्ञानाचा अभ्यास करणे कसे चुकीचे व अशक्य आहे हे आपणाला आग्रहाने सांगत बसले. का कोण जाणे; पण न येणाऱ्या इंग्रजीत बोलले की, आपले 'प्रेस्टिज' वाढते आणि 'इंप्रेशन' पडते असे आपणा सर्वांनाच मनापासून वाटते !

ज्ञान आणि भाषा यांच्याशी भांडण नसावे. त्यांचा नेहमीच आदर करावा; पण मग जगभरचे सारे देश आपापल्या भाषेत विज्ञान सर्वसामान्य माणसापर्यंत का व कसे पोचवतात हे समजावून घ्यावे. जर्मनी, फ्रान्स, रशिया, जपान, इटली, स्वित्झर्लंड सारेच लहान-मोठे देश हे करत असतात. त्यांचे संशोधन त्यांच्या भाषेत होते. त्यांच्या भाषेत प्रसिद्ध होते. ते समजावून घ्यायचे असेल तर अनुवादक नेमून ते आपल्या भाषेत आणावे लागते. उदाहरणार्थ आज औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या असलेल्या बहुभुजा रसायन (Polymer Chemistry) मध्ये सर्वांत अधिक संशोधन जपान करतो. इंग्लिश, रशियन, जर्मन संशोधकांना अनुवादक नेमून हे समजावून घ्यावे लागते. अगदी भारतातसुद्धा पानाला वीस-पंचवीस रुपये देऊन अशी हजारो जपानी पाने आपणाला अनुवादित करून घ्यावी लागतात.

पण हे सारे प्रगत देश आहेत. आपणासारख्या विकसनशील देशाला आपल्याच भाषेतून शिकण्याचा हट्ट परवडेल का ? जमेल का ? आधी कोंबडी का आधी अंडे असा हा प्रश्न आहे. गेली तीस-पस्तीस वर्षे आपण या प्रश्नावर पुन्हा पुन्हा विचार करतोय.पायात भिंगरी बांधलेला माणूस चकव्यात सापडावा आणि गोलगोल चकरा मारत बसावा, तसं आपलं झालंय. आपण चकव्यात सापडलो आहोत असे वाटले की, क्षणभर थांबावे. थोडे आजूबाजूला पहावे. असे आजूबाजूस पाहतानाच डॉ. चंद्रशेखर माझ्या नजरेसमोर येतात. डॉ. चंद्रशेखर नुकतेच पुन्हा एकदा चीनची वारी करून आलेत. माओच्या मृत्यूनंतर चीनला भेट देणारे ते पहिले आशियाई शास्त्रज्ञ होते. गांधीजींना आपल्या स्वप्नातील भारत उभा करावयास मिळाला नाही. नियतीने ते दान माओच्या पदरात टाकले. माओने अनेक गोष्टी अट्टाहासाने केल्या. रशियाची मदत नाकारली. अणुशक्तीचा विकास केला. कोणाच्याही मदतीशिवाय स्वतःच्या अग्निबाणातून सत्तर साली उपग्रह आकाशात सोडला. उतलेल्या-मातलेल्या प्रशासकांना, विचारवंतांना आणि शास्त्रज्ञांना रस्त्यावर आणण्यासाठी सांस्कृतिक क्रांती केली. डॉक्टर चंद्रशेखर

भीमवारीनंतर तसे भारावून गेलेत हे मला माहीत होते. ते दिल्लीच्या एका पंचतारांकित हॉटेलात उतरलेत. नेहमीप्रमाणेच ते गडबडीत आहेत. मात्र 'विज्ञानेश्वरी'साठी चीनभेटीवर मुलाखत पाहिजे म्हटल्यावर चंद्रशेखर सरळ मला जेवावयासच बोलावतात. म्हणतात, जेवता जेवता सविस्तर गप्पा मारू. नंतर लगेच विमानतळावर जाऊ.

## भाषा आणि विज्ञान

डॉ. चंद्रशेखर! नोबेल पारितोषिकाचे मानकरी सर सी. व्ही. रामन यांचा हा मुलगा; पण चंद्रशेखरांना त्यांची अशी ओळख करून दिलेली आवडणार नाही. उंच, सडपातळ, विसरलेल्या डोळ्याचे, आपल्याच तंद्रीत मग्न असलेले चंद्रशेखर पाहिल्यावरच ते शास्त्रज्ञ आहेत हे लगेच पटते. बंगलोरच्या रामन प्रयोगशाळेतच ते काम करतात. अमेरिकेतल्या जॉन विली, इंटर सायन्स या दर्जेदार प्रकाशनसंस्थेने त्यांची विज्ञानावरची पुस्तके व संशोधनात्मक प्रबंध प्रसिद्ध केलेत. जगभरचा प्रवास, शास्त्रीय परिसंवादातील भाषणे, सरकारी शास्त्रीय आयोगावरचे काम या साऱ्या गोष्टी मग ओघानेच आल्या; पण या सर्वांत स्वतःला हरवून स्वतःचे संशोधन व स्वतःच्या संशोधनाची सामाजिक बांधिलकी चंद्रशेखर कधी विसरले नाहीत. चीनमध्ये माध्यम कोणते आहे व त्याचा विज्ञानाच्या प्रसारावर व स्तरावर काय परिणाम झालाय या माझ्या प्रश्नावर चंद्रशेखर दिलखुलासपणे हसतात. ते म्हणतात, 'सदुसष्ट साली प्रो. मेंडलशन भारतात आला होता. माओच्या खास निमंत्रणावरून हा अमेरिकेतला भौतिक शास्त्राचा प्राध्यापक त्या वेळी चीनमधून मोकळेपणाने भटकून आला होता. मला वाटते त्या वेळी त्याला भेटावयास माझ्याबरोबर तुम्हीपण आला होतात. किंबहुना माझ्या मते त्या वेळी पण तुम्हाला त्याची 'विज्ञानेश्वरी'साठीच मुलाखत घ्यावयाची होती! त्या वेळी मेंडलशनने एक मजेदार गोष्ट सांगितली होती. प्रो. मेंडलशन चीनच्या कम्युनमधील एका ग्रामीण विद्यापीठाला भेट देत होता. समोरच्या विद्यार्थ्यांची जरा फिरकी ताणायला म्हणून त्यांनी त्यांना सांगितलं, 'गेल्या महिन्यात एका अमेरिकन मासिकात माझा भौतिक विज्ञानावरचा एक संशोधनात्मक लेख प्रसिद्ध झालाय. कधी मिळाला तर तो वाचा' आणि विद्यार्थ्यांनी त्याला सुनावले होते, 'ते मासिक त्याच वेळी आमच्या विद्यापीठात आलंय. त्याचा चिनी भाषेत अनुवाद करून तो छापून आमच्या वाचनालयात ठेवलाय आणि त्याच तुमच्या संशोधनावर खरे पाहता आम्हाला काही आडवेतिडवे प्रश्न तुम्हाला विचारायचेत!' सर्वसामान्य माणसाची प्रगती करावयाची असेल तर जगातील सर्व ज्ञान मुक्तपणे त्याच्यासमोर उघळले पाहिजे, यावर माओचा विश्वास होता. जरूर पडली तर पोटाला चिमटा काढून हे केले पाहिजे, असा त्याचा कडवा आग्रह होता. ज्ञान तसे कोणत्याच भाषेत सांगणे कठिण नसते. निजामाच्या हैद्राबादेत एम. बी. बी. एस. चे शिक्षण उर्दूमधून होते. फार चांगले डॉक्टर्स तेथे तयार झाले. उर्दूतून उत्तरपत्रिका लिहून वा उर्दूतून पुस्तके वाचून त्यांनी हे केले. डॉक्टराचा संबंध सर्वसामान्य माणसाशी येणार. तो आपल्या भाषेत डॉक्टरला आपला रोग समजावून सांगणार. ते समजावयाचे व पुन्हा त्या रोग्याला समजावून सांगावयाचे तर उर्दूतून ज्ञान ग्रहण करण्याचे व विचार करण्याचे शिक्षण डॉक्ट-

---

## 'आंतरराष्ट्रीय' डॉक्टर

डॉक्टर चंद्रशेखर यांचा जन्म सहा ऑगस्ट १९३० रोजी झाला. बी. एस. सी. आणि एम. एस. सी. ते नागपूर विद्यापीठातून झाले. या परीक्षांत ते विद्यापीठात पहिले आले आणि त्यांना दोन सुवर्णपदके मिळाली. वयाच्या चोविसाव्या वर्षी त्यांना नागपूर विद्यापीठाची डी. एस. सी. पदवी मिळाली. त्यानंतर आणखी तीन वर्षांनी त्यांनी केंब्रिज विद्यापीठातून आयुष्यातील दुसरी डॉक्टरेट मिळविली. त्यानंतर लंडन आणि केंब्रिज विद्यापीठात त्यांनी काही काळ काम केले. अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया येथील प्रख्यात विद्यापीठांतून भाषणे दिली. त्यानंतर वयाच्या तिसाव्या वर्षी म्हैसूर विद्यापीठात भौतिक विज्ञानशाखेचे प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक झाली. सर सी. व्ही. रामन यांच्या मृत्यूनंतर बंगलोरच्या 'रामन इन्स्टिट्यूट'मध्ये प्रोफेसर म्हणून ते दाखल झाले.

इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्स, नॅशनल ॲकेडमी ऑफ सायन्स आणि इंडियन नॅशनल सायन्स ॲकॅडमी या तीन्ही संस्थांचे ते सन्मानीय फेलो आहेत. १९७२ साली त्यांना संशोधनाबद्दल 'कौन्सिल ऑफ सायन्टिफिक ॲंड इंडस्ट्रिअल रिसर्चचे' रौप्यमहोत्सवी वर्षातील खास बक्षीस मिळाले. त्याच वर्षी त्यांचा 'शांतिस्वरूप भटनागर' पारितोषिक देऊनही गौरव करण्यात आला. १९७९ साली उत्कृष्ट औद्योगिक संशोधनाबद्दलचे 'फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ॲन्ड कॉमर्सचे' सुवर्णपदक त्यांना बहाल करण्यात आले.

त्यांची त्यांच्या संशोधनावर आधारित पुस्तके जगभरच्या अनेक प्रमुख प्रकाशकांनी प्रसिद्ध केलीत. जगभर पन्नासहून अधिक परिसंवादात भाग घेऊन त्यांनी प्रबंध सादर केलेत. प्रॅमाना, लंडनहून निघणारे 'मॉल्युक्युलर क्रिस्टल ॲन्ड लिक्विड क्रिस्टल्स व इराणियन जर्नल ऑफ सायन्स ॲन्ड टेक्नॉलजी' या मासिकाच्या ते संपादकमंडळावर आहेत. मागे ते अणुशक्तिविभागाच्या सल्लागारमंडळावर होते. सध्या ते 'भारतीय अवकाश संशोधन' (इंडियन स्पेस रिसर्च ऑरगनायझेशनच्या) सल्लागारमंडळावर आहेत.

चीनच्या 'ॲकॅडमी ऑफ सायन्स'ने 'द्रव-घन' (liquid crystal) या विषयावर नुकताच एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद आयोजित केला होता. जगभरचे अनेक शास्त्रज्ञ चीनने त्या परिसंवादात बोलावले होते. मात्र त्या परिसंवादाचे संचालन करण्याची जबाबदारी चीनने डॉक्टर चंद्रशेखर यांच्यावर टाकली होती. त्याच वेळी चीनमधील अनेक प्रयोगशाळांना व विद्यापीठांना भेटी देऊन त्यांनी तेथील शास्त्रज्ञांशी अनेक विषयांवर मोकळेपणे चर्चा केली. *

रांना असले पाहिजे, असे निजामाचे म्हणणे होते. बहुतेक सर्व विषयांवरचे उर्दूतून दर्जेदार ग्रंथ आज हैद्राबादला उपलब्ध आहेत. निजामाचा हा प्रयत्न फसला येवढ्यासाठीच की, उर्दू ही काही तेथील सर्वसामान्य माणसाची भाषा नव्हती; ती पण संस्कृत वा इंग्रजीसारखी एक लादलेली भाषा होती! डॉ. चंद्रशेखर पुढे सांगत होते. 'मला आलेला अनुभव तर प्रो. मेंडलशनपेक्षा अधिक आल्हाददायक आहे. आशियातील एका शास्त्रज्ञाने केलेले संशोधन म्हणून माझ्या वडिलाच्या–सर रामन यांच्या–संशोधनाबद्दल माओला आदर होता. आज चीनमध्ये रामन यांच्या प्रकाशपटावरची अगदी अत्याधुनिक उपकरणे तेथील प्रयोगशाळेत आहेत आणि वीस–बावीस वर्षांच्या ग्रामीण तरुणी रामनच्या प्रकाशपटावर काही नवे संशोधन त्यांच्या भाषेतून आज करताहेत. ते समजावून घ्यावयाचे असेल तर ते अर्थातच आपणाला चिनीमधून इंग्रजीत करून घ्यावे लागेल! चिनी भाषेत रामनवर संशोधन सुरू आहे आणि त्यांच्या मातृभाषेतून रामन अजून पूर्णपणे समजावून घेता येत नाहीत!

मात्र चिनी भाषेत शिक्षण याचा अर्थ इतर भाषांवर बहिष्कार असा होत नाही. इतर भाषा शिकावयास फार मोठे प्रोत्साहन दिले जाते. आपल्याकडे रेडिओवर जशी 'व्यापारी सेवा' असते त्याप्रमाणे मनोरंजनाच्या कार्यक्रमात मधूनमधून वेगवेगळ्या भाषा शिकवल्या जातात. भाषा शिकवण्याचे खास कार्यक्रमपण रेडिओवर होतात. बसमधून प्रवास सुरू असताना रेडिओवर हा कार्यक्रम सुरू असला तर वही–पेन्सिल काढून अभ्यास करणारे उतारू आढळतात. त्यामुळे चिनी भाषेतून शिक्षण होत असतानाच त्या वर्गाला भाषांतर करण्याइतपत जपानी, रशियन, इंग्रजी, जर्मनी अशा भाषा येणारे विद्यार्थी असतात. आधुनिक ज्ञानाशी सुलभपणे व लगेच संबंध यावयास याचा उपयोग होतो. मात्र हे सर्व होत असतानाच इंग्रजी भाषेबद्दल सर्वसामान्य माणसाच्या मनात एक सुप्त आदर आहे आणि ती भाषा आपणाला कामचलाऊ तरी यावी याची एक जाणीव आहे, हे पण जाणवते.

## सांस्कृतिक क्रांती

अनेक चिनी शास्त्रज्ञांशी मी मोकळेपणाने बोललो. भाषेचा अडसर काही वेळा होता, काही वेळा नव्हता. सांस्कृतिक क्रांतीचे नक्की परिणाम काय झाले हे तसे एक–दोन भेटीत जोखणे कठीण आहे. विचारवंत, प्रशासक, शास्त्रज्ञ यांच्यातील बाबुगिरी आणि आळशीपणा जावा, त्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव पुन्हा यावी म्हणून माओने सांस्कृतिक क्रांती केली असे काहीजण म्हणतात. सांस्कृतिक क्रातीच्या वेळी माओने दिलेले आदेश ज्ञात आहेत. त्याने त्या वेळी पण या अग्निपरीक्षेतून शास्त्रज्ञांना वगळण्याचा सल्ला तरुणांना दिला होता; पण तरीही शास्त्रज्ञांना त्रास झालाच. सांस्कृतिक क्रांतीच्या आधी संशोधनाच्या बहुतेक सर्व क्षेत्रात चीन दहाएक वर्षे तरी आपल्या पुढे होता. **आज अनेक क्षेत्रांत विशेषतः मी ज्या द्रव–घन (Liquid Crystal) क्षेत्रात काम करतो त्यात चीन भारताच्या मागे दहा वर्षे आहे;–पण आजच्या त्यांच्या संशोधनाला एक वेग आहे. गतिमान समाजाचे, लोकांचे दर्शन तेथे घडते. पुढील दहा वर्षांत या सर्व क्षेत्रात हे लोक किमान दहा वर्षांनी आपल्यापुढे गेलेले असतील हे जाणवते.** अर्थात सांस्कृतिक क्रातीने शास्त्रज्ञांना योग्य मार्गावर आणल्यामुळे हे झाले की, माओच्या मृत्यूनंतर करण्यात आलेल्या अनेक बदलांमुळे हे झाले हा स्वतंत्र वादाचा प्रश्न आहे आणि मला त्यात पडावयाचे नाही.

## पळसाला पाने तीनच

एक गोष्ट मात्र खरी. सांस्कृतिक क्रांतीत कोणताही उत्पात झालेला असो, सर्वसामान्य माणसाच्या आणि शास्त्रज्ञाच्या मनात माओबद्दल अपार आदर आणि प्रेम आहे भारतात गांधीजींच्याबद्दल सर्वसामान्य माणसाला जे वाटते तेच चीनमधील लोकांना माओबद्दल वाटते. चीनमधून मला मोकळेपणाने हिंडावयास परवानगी होती. लोकांना भेटता पण येत होते. पेकिंगमधूनसुद्धा मोकळेपणाने हिंडलो. हा एक अनुभव आहे. स्वच्छ रस्ते, संथपणे वाहणाऱ्या सायकली, शोधूनही न आढळणारे भिकारी अथवा फाटक्या कपड्यातले लोक. मी या सर्वांनी खरेच प्रभावित झालो. माझ्याबरोबरचे काही चिनी शास्त्रज्ञ मात्र सांगत होते, 'उगाच भारावून जाऊ नका. सर्वत्र काही इतके चांगले नाही. फार आत खेड्यांत अजूनही परिस्थिती कठीण आहे.' कोठेही जा पळसाला पाने शेवटी तीनच असतात! मध्यमवर्गीय माणूस कोणतीही गोष्ट कुरबूर न करता व आपले वेगळे मत व्यक्त न करता स्वीकारत नाही हे खरे. मला मात्र माझ्या चिनी मित्रांचे खाजगीतले हे म्हणणे पटले नाही. कारण ते चीनची तुलना त्यांनी पाहिलेल्या अमेरिका वा रशिया–जपानशी करत होते. मात्र अगदी आपल्या राजधानीतीलही झोपडपट्ट्या, कंगाल वस्त्या, रस्त्यावरील घाण आणि माणसांनी आणि वाहनांनी घोंगावणारी जुनी दिल्ली पाहिलेल्या मला चीनने नेमके काय मिळवलंय आणि ते किती मोलाचे आहे हे समजत होते.

## बुरख्यातील सुंदरी

भारतीय शास्त्रज्ञांनी राष्ट्रीय प्रयोगशाळेत केलेल्या संशोधनाला काहीजण 'बुरख्यातील सुंदरी' असे म्हणतात. आपण फार मोलाचे संशोधन केले आहे; पण उद्योगपती त्याचा उपयोग करून घेत नाहीत म्हणून अनेक शास्त्रज्ञ अनेकदा तक्रार करतात. एखाद्या मुलीने आपण खूप सुंदर आहोत; पण रस्त्याने जाताना लोक आपणाकडे पहात नाहीत असे म्हणण्यातला हा प्रकार आहे. कारण शेवटी उद्योगपती पैशाच्या म्हणजेच नव्या संशोधनाच्या शोधात हिंडत असतात. अर्थात सहजपणे (उघडपणे वा गुप्तपणे) मिळणाऱ्या परकीय तंत्रज्ञानामुळे उद्योगपती भारतीय संशोधकांचे संशोधन वापरत नाहीत का, हा पण एक प्रश्न आहे. या सर्वांवर चीन आणि भारत यांच्या वैज्ञानिक प्रगतीचा आलेख काढणारे (१) सरवार लतीफ यांचे 'इकॉनॉमिक ग्रोथ इन चायना अॅन्ड इंडिया (इकॉनॉमिक इंटेलिजन्स युनिट रिपोर्ट नं. ३०) (२) सुब्रह्मण्यमस्वामींचा 'इकॉनॉमिक डिस्टन्स बिट्वीन चायना अॅन्ड इंडिया' हा चायना क्वार्टरलीच्या जून १९७७ च्या अंकात प्रसिद्ध झालेला लेख आणि (३) हृषिकेश मारुचा 'रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट इन इंडिया अॅन्ड चायना' हा ड्राफ्ट.

रिपोर्ट हे आपण पाहिले असतील असे मी गृहीत धरतो. नुकताच प्रो. अकिल अहमद यांनी 'स्कँडिनेवियन इन्स्टिटयूट ऑफ एशियन स्टडीज'- मध्ये टेक्नॉलॉजी इन डेव्हलपमेंट–द केसेस ऑफ इंडिया अँन्ड चायना– हा आपला प्रबंध वाचला होता. त्या प्रबंधात त्यानी म्हटलंय, भारतीय प्रयोगशाळा पहिली काही वर्षे आपल्या संशोधनाचे काय करावे या चिंतेत होती. त्यानंतर संशोधक आणि उद्योगपती यांच्यातील दुरावा नाहीसा करण्यासाठी सरकारने 'नॅशनल रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन' (एन.आर.डी.सी.) स्थापन केले; पण अजूनही हा प्रश्न सुटलेला नाही. सास्कृतिक क्रांतीच्यापूर्वी चीनने मात्र हा प्रश्न वेगळया प्रकारे सोडवला होता. त्यांनी मुळी उद्योगधंदेच या संशोधनाला जोडून दिले होते. आपल्याकडे खाजगी उद्योगधंद्याचे स्वत:चे संशोधन-विभाग असतात, त्यापेक्षाही चीनचा हा प्रकार वेगळा होता. एखादा संशोधक वा प्रयोगशाळा एखादे संशोधन हातात घेत असेल तर ते संशोधन प्रत्यक्ष व्यवहारात उतरेपर्यंत त्याची जबाबदारी त्या संशोधकावरच राही. किंबहुना तो पदार्थ किंवा वस्तु त्याने बाजारात टाकेपर्यंत त्याचे संशोधन पुरे झाले नाही असेच समजले जात असे. या रचनेत शास्त्रज्ञाचा अर्थातच अधिक सन्मान होतो; पण त्याचबरोबर एखादे संशोधन सुरू करताना प्रत्यक्ष उत्पादन सुरू करेपर्यंत कोणकोणत्या अडचणी येतील व त्यावर आपण कशी मात करणार याचा त्याना प्रथमपासूनच विचार करावा लागे. सांस्कृतिक क्रांतीच्या काळात या सर्वांत आणखी बदल झाला. मार्क्सच्या सिद्धांतात विज्ञान आणि तंत्रज्ञान ही सामाजिक परिवर्तनातील महत्त्वाची साधने आहेत. शास्त्रज्ञाना त्यामुळे शहरी वातावरणातून बाहेर काढून खेडयापाडयात पाठवण्यात आले. त्याच्यातूनच आजची सर्वांसाठी विज्ञान (Mass Science or Science for the People) ही कल्पना निघाली. सर्वांसाठी विज्ञान म्हणजे सर्वसामान्य शेतकऱ्याला भोवतालची प्रत्येक समस्या सोडवताना विज्ञानाचा विचार करावयाची सवय लावणे. चीनमध्ये जसे झटपट डॉक्टर्स (barefoot doctors) बनविण्यावर भर होता तसा आज कम्युन्समधून झटपट शास्त्रज्ञ बनविण्यावर पण मोठया प्रमाणात भर आहे. विज्ञानाची मूलभूत तत्त्वे समजावून घेणारा, काही प्रयोग करणारा व भोवतालचे प्रश्न समजावून घेणारा तरुण शास्त्रज्ञ बनतो. कम्युन्समधले हे शास्त्रज्ञ राष्ट्रीय प्रयोगशाळेत छोटया अभ्यासक्रमासाठी जातात तर प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञ काही काळ कम्युन्सवर राहून त्यांचे प्रश्न त्यांच्या पद्धतीने समजावून घेतात.

चीन संशोधनावर वर्षाला पाचशे कोटी युनान खर्च करतो. (एक युनान म्हणजे जवळजवळ पाच रुपये). राष्ट्रीय उत्पादनाच्या तो एक टक्का येवढा आहे. चीनमधील शास्त्रज्ञांची वा तंत्रज्ञांची संख्या चाळीस लाख इतकी आहे (भारतात राष्ट्रीय उत्पादनाचा जवळजवळ अर्धा टक्का संशोधनावर खर्च होतो व शास्त्रज्ञ-तंत्रज्ञांची संख्या वीस लाख आहे.) आपल्याकडील 'कौन्सिल ऑफ सायन्टिफिक रिसर्च'-सारखी चीनमधील संस्था म्हणजे 'स्टेट कमिशन फॉर सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी'. त्याच्या प्रमुखाला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा असतो.

राष्ट्रीय प्रयोगशाळांच्या प्रमुखाना वा ख्यातनाम प्राध्यापकांना जवळजवळ २५० युनान इतका पगार मिळतो. कमीत कमी पगार ४० ते ५० युनान असतो. प्रयोगशाळेच्या प्रमुखाचे विसरा, अगदी अॅकॅडमी ऑफ सायन्सचा सेक्रेटरीजनरलसुद्धा स्वत:च्या सायकलवरून येतो आणि त्याच्या कपडयात आणि कामगाराच्या कपडयात काहीही फरक नसतो. शास्त्रज्ञांना पगार फार नसला तरी सामाजिक दर्जा प्राप्त झाल्याने आणि आपण एका परिवर्तनातील अग्रदूत आहोत हे पटल्याने ते एकूण समाधानात वाटले. चागले वा उपयुक्त संशोधन केल्याबद्दल शास्त्रज्ञाला जास्ती पैसे वगैरे देत नाहीत; पण वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरचित्र यावरून त्याला प्रसिद्धी दिली जाते. प्रयोगशाळांत व विद्यापीठांत त्याचे फोटो झळकतात.

## गतिमान समाज

संशोधनाच्या अनेक क्षेत्रांत चीन आज आपल्यामागे आहे हे मी आपणाला सांगितले; पण अणुशक्ति, अवकाश, उपग्रह, अग्निबाण या काही क्षेत्रांत चीन आपल्यापुढे काही दशके आहे. मात्र विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या या अत्याधुनिक दालनात प्रवेश केलेल्या चीनमध्ये मोटारगाडया नाहीत. पेकिंगमध्ये पस्तीस लाख सायकली आहेत. सर्वसामान्यपणे काम करण्याच्या जागेपासून एक–दोन किलोमीटर अंतरावरच राहण्याची पण जागा असते. लोक मजेत सायकलीवरून जात असतात. सायकलीचा प्रवाह संथपणे रस्त्यावरून जातो आहे असे वाटते. ओसाड मोकळी जागा मला तरी आढळली नाही. तेथे शेत तरी असते नाही तर फुलझाडे तरी. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे औद्योगिक प्रगतीमुळे होणारे प्रदूषणाचे प्रकार अजिबात आढळत नाहीत. दूषित वायू, दूषित पाणी यांचा सर्वप्रथम बंदोवस्त केला जातो, अगदी युद्धपातळीवर. **मानव, निसर्ग आणि विकास यांचा समतोल थोडासुद्धा बिघडलेला नाही. किंबहुना हे तिघे हातात हात घालून मजेत प्रवास करताहेत.**

राष्ट्रीय स्मारके खूप चांगल्या प्रकारे ठेवलीत आणि त्याबद्दल सार्वत्रिक आदर आहे. अनेक बदल होत असतानाच सर्वसामान्य समाज अजूनही जुन्या गोष्टींची जपणूक करतो. कपडे आणि आहार अजूनही जुनेच आहेत. आधुनिक वैद्यकीय सोयी उपलब्ध असल्या तरी चीनची प्राचीन वैद्यकीय पद्धती फार लोकप्रिय आहे. त्याचा पद्धतशीर विकास पण सुरू आहे. चंद्रशेखर सागत होते, 'तेथे असताना सर्दी झाल्यावर सहकारी शास्त्रज्ञांनी जुनी चिनी औषधे घेण्याचा सल्ला दिला आणि ती औषधे घेऊन ते लगेच बरे पण झाले.'

परकीय तंत्रज्ञान न घेण्याचा माओचा कडवा आग्रह आज तरी संपलेला दिसतो; पण यात माओचे अवमूल्यन करण्याची भावना दिसत नाही. गाधीजींच्या मृत्यूनंतर पंडितजींनी ग्रामोद्योगापेक्षा औद्योगिक विकासावर भर देण्यातला हा प्रकार वाटतो. चंद्रशेखर सागत होते तुम्ही कदाचित वाचले असेल, 'कृत्रिम धागा बनविणारा आशियातील सर्वांत मोठा कारखाना जपानच्या मदतीने चीनमध्ये स्थापन होतोय. या एकाच कारखान्याची क्षमता भारतातील कृत्रिम धागा बनविणाऱ्या सर्व कारखान्यांपेक्षा पाच पटीनी अधिक असेल. भारतात झाले काय की, आठ वेगवेगळया उद्योगपतींना आपण थोडाथोडा कृत्रिम धागा बनविण्याची परवानगी दिली. आजच्या काळात कमी उत्पादनक्षमता असलेले कारखाने वस्तू महाग बनवितात हे माहीत असूनसुद्धा ! त्यातूनही मजेची गोष्ट अशी की, या आठ उद्योगपतींनी आठ वेगवेगळया परकीय कंपन्यांना खूप पैसे देऊन तंत्रज्ञान आणि काही प्रमाणात यंत्रसामुग्री खरेदी केली. एकच वस्तू

भारतात महागप्रकारे बनविण्यासाठी आपल्या राष्ट्राने आठ ठिकाणी परकीय चलन वाटले ! परकीय विज्ञान व तत्त्वज्ञान घेताना असले काही न करावयाचा चीनचा निर्धार दिसतो. चीनमधील शास्त्रज्ञांशी बोलताना, चीनमधील सर्वसामान्य लोकांना पाहताना सारा समाज परिवर्तनात सहभागी कसा होतो ते समजते. उपलब्ध असलेल्या संपत्तीचे (वा गरिबीचे म्हणा हवे तर) समान वाटप झालंय हे लोकाना मनापासून पटलंय. गरिबीचे अजून उच्चाटन झालेले नसले तरी नजीकच्या काळात ते होणार आहे असा विश्वास सर्वसामान्य लोकांच्या मनात आहे. हा विश्वास असणे ही शेवटी खरी महत्त्वाची गोष्ट आहे. चीनमधून परत येताना मनावर एका एकसंध, गतिमान समाजाची ठसठशीत प्रतिमा उठते.

### पेकिंग ते टिंबकटू ...

विमानतळावरून डॉक्टर चंद्रशेखर याना पोचवून परत येताना तशी रात्र झाली होती. आपल्या देशात विमानेसुद्धा वेळेवर सुटत नाहीत ! चीनच्या संदर्भात मी ज्यांना गेल्या काही दिवसांत भेटलो त्यात डॉक्टर चंद्रशेखर हे एकच शास्त्रज्ञ नव्हते. हैद्राबादच्या 'ॲडमिनिस्ट्रेटिव स्टाफ कॉलेज ऑफ इंडियाचे' प्रोफेसर अकिल अहमद मला भेटले होते. 'इंटर नॅशनल क्रॉप रिसर्च इन्स्टिटयूट' मध्ये काम करणारे डॉक्टर एस्. एम्. विरमानी भेटले होते. त्या प्रत्येकाने चीनबद्दल बोलायचंय म्हटल्यावर माझ्याशी अगदी आग्रहाने, मनमोकळेपणाने खूप गप्पा मारल्या होत्या. प्रोफेसर अकिल अहमद व डॉ. विरमानी तर चक्क चीनच्या प्रेमात पडले होते. डॉ. विरमानी न राहवून अगदी प्रत्येक क्षेत्रात भारत–चीनची तुलना करत होते. म्हणाले होते, 'भारतात विमाने वेळेवर सुटत नाहीत; पण विमानात हवाईसुंदरी, चॉकलेटस् आणि वेळेनुसार जेवण देतात. मात्र चीन-मधील अंतर्गत हवाईसेवेत खाण्याचा डबा वगैरे बरोबर वागवावा लागतो. विमानातून आणि रेल्वेतून जाणाऱ्या माणसांत काही फरक आहे असे तिकडे मानत नाहीत. महत्त्वाचे म्हणजे विमान आणि आगगाडी दोन्हीही वेळेवर सुटतात आणि वेळेवर पोचतात !'

मला राहून राहून एका गोष्टीचे आश्चर्य वाटत होते. डॉक्टर चंद्रशेखर, डॉ. विरमानी, प्रोफेसर अकिल अहमद हे काही भाव-व्याकुळ कवी नव्हेत. जगाचा अनुभव नसलेले तरुण स्वप्नाळू शास्त्रज्ञ नव्हेत. भारताच्या संशोधनाशी आणि प्रगतीशी हे एकरूप झालेत. अनेकदा जगभर हिंडलेत. उन्हाळे-पावसाळे पाहून यांचे केस पांढरे झालेत. बघता-बघता, समोरच्या शास्त्रज्ञाच्या कार्याची व कुवतीची हे लोक आपल्या बुद्धीने चीरफाड करतात हे मला माहीत आहे. डॉक्टर चंद्रशेखर तर 'इलेक्ट्रॉनिक कमिशनने' विद्यापीठांना वा राष्ट्रीय प्रयोगशाळाना द्यावयाचे दहा लाख रुपयांपर्यंतचे प्रयोग फायनान्स सेक्रेटरी वगैरेंना न विचारता पाच मिनिटांत मंजूर करू शकतात आणि त्यानी केलेली निवड अजून कधी चुकीची ठरलेली नाही. या लोकाना चीनमधून ठरवून फिरवून आणणे आणि एखाद्या नाटकाने त्यांना भारावून टाकणे खरोखरच अशक्य वाटते.

चीनचे सारेच काही बरोबर आहे आणि आपले सारेच काही चुकले असे त्यापैकी कोणालाच म्हणावयाचे नव्हते; पण तरीही त्यांना काही तरी सांगावयाचे होते. आमच्या तासाभराच्या मुलाखतीत डॉ. चंद्रशेखर जे म्हणाले त्यावरून मला नकळत १९५० साली 'नवभारत' मासिकात प्रसिद्ध झालेली एक कविता आठवली. कवितेचे नाव होते 'टिंबकटू.' टिंबकटू–साऱ्या समाजाला जेथे घेऊन जावयाचे आहे अशी कल्पनेतील एक आदर्श जागा. अशी जागा जेथे असेल सुख, समृद्धी, समानता, शांती. असा कवितेचा आशय होता. ◻

टिंबकटू ..
– मला टिंबकटूला जायचे होते.
न्यूयॉर्क ते टिंबकटू हा रस्ता त्याला माहीत होता.
मास्को ते टिंबकटू हा जवळचा रस्ता त्याला माहीत होता.
– पण मला तर दिल्लीहून टिंबकटूला जावयाचे होते.
केवढ्या आशेने मी त्याच्याकडे गेलो.
पण माझा रस्ता तो मला आखून देऊ शकला नाही !

माओने आपल्या कुवतीप्रमाणे पेकिंग ते टिंबकटू हा रस्ता शोधावयाचा प्रयत्न केला. माओ अनेक ठिकाणी बरोबर आला. काही ठिकाणी चुकला; पण चीन आणि भारत दोघेही अजून टिंबकटूला पोचलेले नाहीत आणि म्हणूनच दोघांनीही एकमेकांच्या प्रयत्नातून खूप काही शिकावयाचे आहे. चीनने हे ओळखले आहे. आपणही ते ओळखले पाहिजे. नाही तर चीन टिंबकटूला पोचेल, आपण पोचणार नाही ! ◻

ज्या पावसात सर्व मासे मरतात
तो पाऊस चेंबूरला पडतो.
पुढील विज्ञानेश्वरीत
**तेजाबचा पाऊस !**

‘ बंगाली साहित्य अजून
खूप मागे आहे ’
पोरं पुन्हा पुन्हा मला
बजावत होती.
मला आठवलं,
श्री. बा. जोशी म्हणाले होते,
‘ बंगाली साहित्य खूप पुढे आहे....’




# आनंदबझार ते कॉफीहाउस

**वार्तापत्र : चौथे**
**निखिल वागळे**

पुस्तकांच्या वासाने ज्यांना झिंग येते त्यांनाच मी काय सांगतोय ते नेमकं कळेल.

पुस्तकांच्या दुकानात जाऊन तासन् तास रेंगाळणं, नाना तऱ्हेची पुस्तकं चाळणं यातली गोडी पुस्तकवेड्यांच्या दृष्टीनं अपूर्वच आणि मग ऐपत असेल तर त्यातली भाराभर पुस्तकं विकत घेणं...जाऊ द्या, ती वेळ फारशी येत नाही आपल्यावर. चार हव्याहव्याशा वाटणाऱ्या पुस्तकांकडे नजरा टाकीत त्यातलं एखादंच खट्टू होऊन निवडायचा प्रसंगच अधिक वेळा येतो. मग फार तर थोडा जास्त वेळ दुकानात रेंगाळत दोन्ही बाजूंना खच्चून भरलेल्या पुस्तकांचा वास नाकात साठवून घ्यायचा एवढंच आपल्या हातात उरतं !

हा वास अनुभवायलाही दुकानाची पायरी चढावी लागते. तेही कोसभर अंतरावर. म्हणजे सहज जाताजाता करू म्हटलं तर शक्य नाही. वर पुन्हा दुकानदाराच्या ‘ काय शिची कटकट ’ अशा टिपिकल मऱ्हाठमोळ्या नजरा. या सगळ्यातून पार पडत पुस्तकांचा हा आनंद घ्यायचा म्हणजे निगरगट्टच असायला हवं. आनंद आसमंतात भरून रहाणं वगैरे दूरच !

कलकत्त्याच्या कॉलेज–स्ट्रीटने मात्र मला हा आनंद अगदी भरभरून दिला. जिथे पहावं तिथे पुस्तकं. कलकत्ता विद्यापीठाला लागूनच असलेल्या या परिसरात पुस्तकांशिवाय दुसरं कसलं दुकान सापडणं कठीण. फुटपाथवरही जुन्या पुस्तकांचे ढीग. पुस्तकांचा वास अक्षरशः आसमंतात भरून राहिलेला. कुणीही यावं आणि हा नाक्यानाक्यावर लटकणारा आनंद लुटावा ! कलकत्त्यातल्या सगळ्या महत्त्वाच्या प्रकाशकांची दुकानंही याच भागात आहेत. त्यामुळं अनेक साहित्यिकांचे अड्डेही इथेच. प्रकाशकांपैकी बरेचजण स्वतःच लेखक. मग दुकानादुकानातून गप्पांचे अड्डे जमले तर नवल नाही.

बराच वेळ मी या भागातून हिंडत होतो. गल्लीबोळ पालथा घातला. दुकान न् दुकान निरखलं. पुस्तकं विकणारे आणि विकत घेणारे पाहिले. त्यांच्यातला सुखसंवाद ऐकला; पण मन तृप्त झालं

नाही. 'हा प्रदेश अनोखा आहे. अजून पहा, अजून पहा.' असं त्याचं सांगणं होतं. आपल्याला बंगाली येत नाही याचं सगळचात जास्त दु.ख त्या दिवशी झालं. मुळात बंगालबद्दल मला सुरुवातीपासून आकर्षण. बंगाली शिकावं हे त्यामुळं अनेकदा मनात आलं होतं, पण काही ना काही कारणामुळं जमलंच नव्हतं. कॉलेज-स्ट्रीटवर हिंडताना वाटलं, 'आपणच करंटे. आनंदाचा क्षण काही असा सांगूनसवरून येत नसतो. आधीच बंगाली शिकून ठेवलं असतं तर आज हा आनंद शतपटीनी अनुभवता आला असता.'

या करंटेपणाला शिव्या देण्यापलीकडे त्या वेळी तरी माझ्या हातात काहीच नव्हतं !

इथल्या डेज् पब्लिशर्सबद्दल मी बरंच ऐकलं होतं. हे बंगालीतले सगळचात मोठे प्रकाशक. शंकरसारख्या आजच्या तुफान लोकप्रिय लेखकाची पुस्तकं डेज्वालेच काढतात. बंगाली प्रकाशनव्यवसाय डबघाईला आला तेव्हा याच मडळीनी अनेक क्लृप्त्या लढवून सावरला. त्यासाठी हातात पिशव्या घेऊन दारोदारी पुस्तकं विकायलाही इथल्या अनेकांनी कमी केलं नाही, असं कलकत्त्याच्या साहित्यवर्तुळात मोठचा कौतुकानं बोललं जातं.

डेज्चं दुकान शोधून काढणं तसं थोडं जिकरीचंच होतं. सगळचात मोठे प्रकाशक असले तरी भपका अजिबात नाही. मुख्य रस्त्यावर धड पाटीही नव्हती. विचारत विचारत एका जुन्या पण नव्यानं रंगवलेल्या वाडाटाइप इमारतीत शिरलो. सुरुवातीला एक इंग्रजी पुस्तकांचं दुकान. दोघं-चौघं पुस्तकं न्याहाळत उभे होते. त्यापैकी एकाला डेज्चा पत्ता विचारला तर त्यानं वर यायला सांगितलं.

'कोणतं पुस्तक पाहिजे ? आमच्याकडेही बघा ना. डेज्कडेच काय ठेवलंय ?' त्यानं वर चढल्या चढल्याच आपले विक्रीगुण दाखवायला सुरुवात केली.

मला पुस्तकं विकत घ्यायची नाहीत म्हटल्यावर तो थोडा नाराज झाला असावा. 'जशी तुमची मर्जी' म्हणत त्याने खांदे उडवले आणि वाडचाच्या मधल्या चौकाकडे बोट दाखवलं.

समोरच एका दारावर बंगालीत लिहिलेली पाटी होती. कलकत्त्यात येऊन मला पाचेक दिवस लोटल्यानं थोडाफार बंगाली अक्षरांशी परिचय झाला होता. त्यावरून हेच 'डेज् पब्लिशर्स' असावेत हे मी ताडलं.

आत गेलो आणि काउंटरवर मी कशासाठी आलोय हे सांगितलं. तिथल्या माणसानं मला आत बोलावलं. दुकानाच्या बरोबर मध्यभागी एकजण टेबलावरच्या पुस्तकाच्या ढिगांशी काही तरी झटापट करत होता. समोर बहुधा बिलबुक. हा दुकानाचा मालक किंवा मॅनेजर असावा असा अंदाज मी बांधणार तोच काउंटरवाल्यानं साधारण चारेक कोसावर ऐकू जाईल अशा आवाजात हाक मारली, 'कार्तिकबाबू ऽऽऽ'

मी कशासाठी आलोय हे आता फक्त कार्तिकबाबूनाच नव्हे तर सगळचा दुकानाला, दुकानात पुस्तकं घ्यायला आलेल्या तमाम पब्लिकलाही कळलं होतं. कार्तिकबाबूही काही कमी नव्हते. त्यांनी तेवढंच तोंड भरून मला 'याऽऽयाऽ' केलं.

किरकोळ बांध्याचे कार्तिकबाबू कधी तरी व्यायाम करत असावेत. त्याच्या शरीरावरच्या तेलकट काटकपणावरून तरी मला तसं वाटलं. केसही चिप्प तेल लावून विंचरलेले. अंगात पांढरी स्वच्छ अर्धी चड्डी आणि वर बिनबाह्याचा कुडता. एकूण स्वच्छता वगळली तर उत्तर प्रदेशातल्या कुठच्याही गोठचात फिट्ट बसेल असं रूप.

'मी कार्तिकबाबू...पूर्ण नाव कार्तिकचंद्र कामिला. तुमच्या लक्षात आलं असेल म्हणा एव्हाना हे.' कार्तिकबाबू हसत हसत म्हणाले.

'तुम्ही डेज् पब्लिशर्सचे मालक की मॅनेजर ?' मी त्याच्या अर्धी चड्डी कुडत्याकडे पहात बिचकतच विचारलं.

'नाही. मालक आणि मॅनेजर वेगळे आहेत. मी डेज्चा पी. आर. ओ. आहे.' एखाद्या प्रकाशकाकडे पी. आर. ओ. असू शकतो हे माझ्या दृष्टीनं तसं अनपेक्षितच; पण बंगाली प्रकाशन-व्यवसायाबद्दल एवढचा सुरस आणि चमत्कारिक कथा मी त्या दिवसापर्यंत ऐकलेल्या होत्या की, कार्तिकबाबूंनी असं सांगितल्यावर विशेष आश्चर्य वाटलं नाही.

दुकानाचा कानाकोपरा कार्तिकबाबूनी मला दाखवला. एखाद्या गाईडने पर्यटनस्थळाबद्दल रंगवून रंगवून काही सांगावं तसंच कार्तिकबाबू मला ऐकवत होते.

दुकानाच्या दर्शनी भागात दोन मोठचा रॅक्सवर शंकरची पुस्तकं मांडली होती. फक्त शंकरची; दुसऱ्या एकाही लेखकाला तिथे प्रवेश नव्हता. त्याबद्दल कार्तिकबाबू म्हणाले, 'आमचं सगळं प्रकाशनच शंकरच्या पुस्तकांवर उभं आहे. बंगाली माणसाला शंकरनं वेडच लावलं आहे. गृहिणी तर त्याच्या कादंबऱ्यावर अक्षरशः तुटून पडतात. 'शॉर्गो, मर्त्यो, पाताल'सारख्या त्याच्या पुस्तकाच्या लाखावर प्रती आजपर्यंत संपल्या आहेत. त्याच्या या नव्या पुस्तकाचच बघा ना' कार्तिकबाबूनी कुणाला तरी हाक मारून शंकरची 'नोविना' ही नवी कादंबरी आणवली 'ही पंधरा एप्रिलला प्रसिद्ध झाली. अवघ्या दोन महिन्यात तिच्या पंधरा हजार प्रती संपल्या ! 'मानसन्मान' ही त्याची दुसरी कादबरी. तिचीही विक्री वीस हजारांवर गेली आहे.'

शंकरचं पुस्तक प्रसिद्ध होणार असं एकदा जाहीर झालं की, त्याच्या आदल्या दिवसापासून खरेदीसाठी रांगा लागतात ही कथा मी महाराष्ट्रातच ऐकली होती. त्याबद्दल कार्तिकबाबूंना विचारलं तर म्हणाले, 'अगदी खरं आहे हे. नुसत्या रांगा लागतात असं नाही तर पुस्तक प्रसिद्ध झाल्यावरही दिवसभर लोक येत-जात असतात. आता ही काही आम्हाला अनोखी गोष्ट राहलेली नाही.'

शंकरच्या इतर पुस्तकाबद्दल मी विचारू लागलो तर कार्तिकबाबूंनी सर्व पुस्तकांचा ढीगच माझ्यासमोर हजर केला. जनअरण्य, सीमाबद्ध, चौरंगी ही त्यातली मराठी माणसाच्या ओळखीची पुस्तकं. कोतो अजानारे, तनया, आशाआकाखा, रुपतापोश, मोरुभूमी, सम्राट-शुंदरी वगैरे जवळजवळ चारशे पुस्तकं शंकरच्या नावावर आहेत असं कार्तिकबाबू म्हणाले. टेबलावरच्या ढिगातून नेमकं पुस्तक ते शोधून काढत होते आणि पाचेक मिनिटं प्रत्येक पुस्तकाचं कथानक सांगत होते. वर त्या पुस्तकाबद्दल टीकाकारांनी काय म्हटलंय हे सुद्धा. एखाद्या पुस्तकविक्रेत्याकडून हे सगळं म्हणजे फारच होतं. सुखद होतं. कुठंही त्रासल्याचा भाव नाही. प्रत्येक शब्द अगदी समरसून बाहेर पडल्याचं जाणवत होतं.

शंकरचं कौतुक फार झालं याची जाणीव झाल्यामुळंच की काय कार्तिकबाबू तत्परतेनं म्हणाले, 'केवळ शंकरचीच पुस्तकं खपतात

असं मात्र नाही. कविताची किंवा वैचारिक पुस्तकंही लोक घेतात. नुकतंच सातवं बुक-फेअर इथं झालं. त्या वेळी सुनील गांगुलीच्या नव्या कवितासंग्रहाच्या पाचशे प्रती आठ–दहा दिवसात संपल्या, म्हणजे बघा!'

'पुस्तक खपवण्यासाठी तुम्ही काय करता?' मी काही खास युक्ती असेल तर काढून घ्यावी अशा बेतानं विचारलं.

'काही विशेष नाही.' कार्तिकबाबूंनी थंडपणे सांगितलं. 'दैनिकातून तीन–चार जाहिराती, विक्रेत्यांना पत्रं वगैरे नेहमीचंच; पण आमच्या बंगालीबाबूला तेवढं पुरतं. इथे पुस्तकांचं वेडच अजब आहे. प्रत्येकाला वाटतं आपल्याकडे चांगली पुस्तकं असली पाहिजेत. त्यामुळं पुस्तकाची दोन–अडीच हजाराची आवृत्ती संपायला फारसा वेळ लागत नाही.'

एकूण पुस्तकवेड फार खोलवर रुजलेलं होतं. कार्तिकबाबूंकडून एखादी युक्ती ऐकावी आणि आपल्या प्रिय महाराष्ट्र देशातल्या रंजल्यागांजल्या प्रकाशकांना सांगावी हा माझा मनसुबा सहजासहजी पुरा होईल अशी परिस्थिती नव्हती.

अखेर आडातच नाही तर आपल्याकडच्या पोहऱ्यात तरी कुठून येणार असा सुज्ञ विचार केला आणि मनाचं समाधान करून घेतलं!

¤

बंगालच्या पुस्तकवेडाचं कार्तिकबाबू हे प्रातिनिधिक उदाहरणच असावं. कारण नंतर ज्या ज्या बंगालीबाबूना मी भेटलो त्यातला प्रत्येकजण पुस्तकांविषयी असंच भरभरून बोलणारा होता मध्यमवर्गीय असेल तर त्याच्या घरी रवींद्रनाथ, शरदचंद्र, बंकीमचंद्र यांच्या साहित्याचे खंड तर आवर्जून दिसयाचेच; पण त्याबरोबर नव्या साहित्यिकांची पुस्तकंही असायची. आपल्याला आवडलेल्या पुस्तकाबद्दल तास न् तास बोलत रहायचं हा बहुसंख्य बंगालीबाबूचा छंदच आहे. दैनिक–साप्ताहिक ही तर जणू इथे अपरिहार्य गोष्ट मानली जाते. 'आनंद बझार पत्रिके'चा खप साडेचार लाखाच्या घरात आहे; पण त्याबरोबर 'सतजुग, जुगांतर' ही दैनिकंसुद्धा लाखाच्या घरात खपतात. सुप्रसिद्ध पत्रकार गौरकिशोर घोष यांनी गेल्याच वर्षी सुरू केलेल्या 'आजकल'चा खपही सत्तर हजार आहे. यावरून दैनिकं विकत घेऊन वाचण्याची बंगाल्यांना सवय आहे, शेजारच्या घरून आणून वाचायची नव्हे हे स्पष्ट होतं! 'देश'सारखं साप्ताहिक आज पन्नास वर्षं नेमानं चालू आहे. गेल्या दोन वर्षांत अशा आणखी दोन–तीन साप्ताहिकांची भरच पडली आहे. सिनेमा, खेळ यांच्या साप्ताहिकांच्या खपाचं तर विचारायलाच नको. एखाद्याची पुस्तकं विकत घ्यायची ऐपत नसेल तर तो त्यासाठी आवर्जून बचत करतो; पण, वर्षाकाठी काही तरी पुस्तकं खरेदी केल्याशिवाय रहात नाही, हे जेव्हा कळलं तेव्हा खरोखरच बंगाली लेखकाच्या भाग्याचा हेवा वाटला. 'लग्नामध्ये अहेर' म्हणूनही सर्रास पुस्तकं दिली जातात असं कॉलेजस्ट्रीटवरच्या एका दुकानदारानं मला मोठ्या अभिमानानं सांगितलं.

पण विकत घेऊन वाचावयाचं हे वेड बंगाल्यांमध्ये आलं कसं? मला छळणाऱ्या या प्रश्नाचं नेमकं उत्तर सुनील गंगोपाध्यायनी दिलं. मुळात कवी असलेले सुनीलबाबू आज बंगालीचे आघाडीचे कादंबरीकार आहेत. लोकप्रियतेत शंकरचा क्रम पहिला असला तरी साहित्यिक निकष लावायचे झाले तर सुनीलबाबूच वरचढ ठरतील. मध्यमवर्गीयांना गोंजारणारं, गृहिणींना आवडणारं असं शंकरच्या लिखाणाचं स्वरूप असतं. थोडं कौटुंबिकच म्हणता येईल. श्री. बा. जोशी तर म्हणाले, 'शंकरचं लिखाण आपल्याकडच्या फडके-तंत्राच्या जवळ जाणारं आहे असं ढोबळपणे म्हणता येईल. त्याची भाषा मात्र अतिशय सहजसुंदर असते. त्याच्या लोकप्रियतेत भाषेचा हा भाग मोठा आहे. पुस्तक वाचायला घेतल्यावर खाली ठेववत नाही. सुनील गंगोपाध्याय मात्र खऱ्या अर्थानं समर्थ लेखक आहे. कुठेही लोकांना चुचकारण्याचा त्याचा प्रयत्न नसतो. आजची रूढ, तरुणांची बोलीभाषा तो वापरतो. बायाबापड्यांना आवडते म्हणून गोड, गुळगुळीत शब्दरचना त्याच्या पुस्तकात आढळत नाही. सद्य:-कालीन शहरी जीवनाचं चित्र त्याच्या साहित्यात अगदी थेटपणे उभं रहातं.'

मैत्रेयी चटर्जीचं मतही जवळपास असंच होतं. त्या म्हणाल्या, 'शंकर शरद्चंद्रांच्या जवळ जाणारा आहे. अर्थातच सामाजिक वजा करून!'

हे सांगताना त्या उपहासानं हसल्या. नंतर सुनील गंगोपाध्याय मला शरद्चंद्रांबद्दल सांगत होते तेव्हा मला त्याचा अर्थ समजला. सुनीलबाबू म्हणाले, 'शरद्चंद्र लोकप्रिय होते हे खरं. बाहेरचे लोक त्यांना थोरही मानतात; पण आम्ही बंगाली लेखक साहित्यदृष्ट्या शरद्बाबूंचं साहित्य तेवढं थोर मानत नाही. आज शरद्चंद्र जवळजवळ नामशेष झालेत. रवींद्रनाथांचं तसं नाही. त्यांची थोरवी आजही कायम आहे.'

## 'आनंद बझार'

सुनीलबाबू 'आनंद बझार पत्रिके'च्या 'देश' या बंगाली साप्ताहिकाच्या संपादकमंडळावर आहेत. एका दृष्टीनं 'आनंद बझार' ग्रुपने बंगाली साहित्यावर केलेले हे उपकारच म्हणावे लागतील. फक्त सुनीलबाबूच नव्हे तर मोती नंदी, शक्ती चटर्जी, निरंजन हलदार, पूर्णेंदू पत्री यांसारखे अनेक नामवंत बंगाली लेखक–कवी आज 'आनंद बझार'च्या नोकरीत आहेत. दिसला चांगला लेखक की, उचललाच 'आनंद बझार'नं. या लेखक मंडळींना ऑफिसात फारसं कामही नसतं. पत्रिकेची सगळी यंत्रणाच अशी व्यवस्थित बसलेली आहे की, धावपळीचा प्रसंगच येत नाही. त्यामुळं लेखकांना आपल्या साहित्यनिर्मितीला, त्यावर विचार करायला भरपूर मोकळा वेळ मिळू शकतो. हे ऐकलं तेव्हा मला पोटाची चिंता वाहात साहित्यनिर्मिती करणारे आपल्याकडचे अनेक लेखक आठवले. मराठी साहित्याचा बहुतेक सगळा इतिहासच या खपाटीला गेलेल्या पोटाचा आहे' पोटाच्या चिंतेत प्रतिभा कधी जळून खाक होते याचा पत्ताच लागत नाही. सहाजिकच लेखक जगवणाऱ्या 'आनंद बझार पत्रिके'चं मला कौतुक वाटलं. (याला आता 'बंगालची काही बंडखोर लेखक मंडळी. 'लेखक विकत घेणं' म्हणतात आणि पत्रिकेतल्या या साहित्यिकाच्या नावाने कडाकडा बोटं मोडतात ती गोष्ट वेगळी!)

सुनीलबाबूंच्या एअरकण्डिशण्ड चेंबरमध्ये गेलो तेव्हा एवढा मोठा साहित्यिक पटकन् बोलेल की नाही ही शंका मनात होती; पण सुनीलबाबूंच्या पहिल्या काही वाक्यांतच एवढी आपुलकी होती की, चर्चेत खुलेपणा यायला वेळ लागला नाही. कुठेही मोठेपणाचा गर्व

नाही की यशावरोबर येणारा तुसडेपणा नाही. बंगाल्यांच्या पुस्तकवेडाबद्दल मी विचारलं तेव्हा सुनीलबाबू म्हणाले, 'बाहेरून आलेल्या प्रत्येकाला हाच प्रश्न पडतो; पण याचं उत्तर आमच्या बालसाहित्यात आहे. बालसाहित्याची समृद्ध परंपरा आमच्याकडे आहे. रवींद्रनाथानी 'सहज पाठ 'च इतक्या सुबोधपणे लिहिलेत की, त्या लहान वयातच मुलाला वाचनाची गोडी लागते. याशिवाय रवींद्राची बालगीतं, गोष्टी आहेतच. आमच्याकडे मोठे लेखकही मुलासाठी साहित्य लिहिण्यात कमीपणा मानत नाहीत. शंकरसारखा लेखकही लहान मुलांसाठी गोष्टी लिहितो.'

कार्तिकबाबूंनी मला शंकरनं लहान मुलांसाठी लिहिलेल्या गोष्टींचं पुस्तक दाखवलं होतंच. 'एक बॅग शंकर' हे त्याचं नाव. रंगीबेरंगी कव्हरचं हे पुस्तक मुलांना दिलं जातं. पानं-फुलं चितारलेल्या एका छोटया प्लॅस्टिकच्या पिशवीतून पिशवीची छोटी रिबिनीनी बनवलेली हॅण्डल्स तिच्या गोंडसपणात भरच टाकतात. पुस्तक घेऊन जाणाऱ्या मुलाला वाटावं-एक बॅगभर शंकरच घेऊनच आपण चाललोय! अशी तऱ्हेतऱ्हेची मजा बालसाहित्यात ठिकठिकाणी विखुरलेली आढळते.

मला दुसरीही एक शंका होती. बंगाली माणूस एवढा रवींद्रप्रेमी, रवींद्रांच्या पलीकडे फारसं न पहाणारा, ऐदीसुद्धा, तास न् तास गप्पा छाटणारा. कामाचं नाव नको. इतिहासात खुषीने रमणारा. रवींद्रानीसुद्धा आपल्या साहित्यातून बंगालीबाबूच्या या वृत्तीवर कडक टीका केली आहे. रवींद्रांच्या मनात एका आदर्श बंगाली माणसाची प्रतिमा होती. संवेदनाक्षम, कृतिशील आणि मोठ्या मनाचे नायक त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून चितारले आहेत. त्यांच्या नायिकाही याला अपवाद नाहीत. या सगळ्या साहित्यातून आपलं स्वप्न साकार झालेलं कदाचित रवींद्रनाथ पहात असावेत. बंगालीबाबूंनं मात्र त्यांच्या या स्वप्नाकडे हेतुतः दुर्लक्ष केलं. मग तरीसुद्धा बंगाली साहित्य एवढं कसं पुढं गेलं? खरं तर या मंडळीची वृत्ती अशी की, त्यांनी रवींद्र एके रवींद्र केलं असतं तरी नवल नव्हतं; पण बंगाली साहित्य तिथेच थांबलं नाही. रवींद्रनाथांनंतर अनेक वळणं-आडवळणं घेऊन त्यानं फार लांबचा पल्ला गाठला आहे. त्याबद्दल सुनीलबाबू म्हणाले; 'रवींद्रनाथांचा प्रभाव अनेक क्षेत्रांत आहे. जवळजवळ तीन हजार गीतं त्यांनी लिहिलीत. त्यांच्यासारखी नाटकं, नृत्यं नंतर बंगालीत आजवर तरी झालेली नाहीत. साहित्यानं मात्र नवा आकार धारण केला आहे. रवींद्राच्या वेळीच चालू झालेल्या चळवळीत याची मुळं सापडतात. रवींद्रनाथ हे सामान्य माणसाला समजणारे नाहीत, त्यांचं साहित्य फार वरच्या पातळीवरचं असतं हे त्या वेळी नझरुल इस्लाम, बुद्धदेव बसू, सुधीन दत्त वगैरे लेखकांनी मांडलं आणि सामान्य माणसाच्या जवळ जाणाऱ्या साहित्यनिर्मितीसाठी 'कल्लोळ गोष्ठी' नावाची चळवळ सुरू केली. रवींद्रनाथाना तेव्हा नोबेल पारितोषिक मिळालेलं असल्यानं ते लोकांच्या आदराचा विषय होते. त्यांच्याविरुद्ध बोलणं म्हणजे बंगालीबाबूच्या भावना दुखावणं असं त्या वेळी मानलं जाई. सहाजिकच नझरुल, सुधीन वगैरेंना सुरुवातीला बऱ्याच टीकेला तोंड द्यावं लागलं. लोक तर त्यांना 'मारून टाका' पर्यंत पोचले होते; पण हळूहळू या साहित्यिकांनीही आपले गुण सिद्ध केले आणि महत्त्वाचं स्थान मिळवलं.'

'कल्लोळ गोष्ठी 'नं उभारलेल्या या बंडाच्या निशाणामुळच असेल कदाचित; पण आज बंगाली साहित्य समृद्ध दिसतं आहे. नवे प्रयोग, नवे विषय यांचा हा हव्यास प्रामुख्यानं दिसतो कविता आणि कादंबऱ्यांतून. सुनीलबाबू म्हणाले, 'लघुकथा लिहिणारे चांगले लेखक आमच्याकडे नाहीत, लघुकथांची पुस्तकंही फारशी खपत नाहीत. कदाचित ठिकठिकाणहून निघणारी लिटल मॅगझिन्स लघुकथा छापत नाहीत म्हणून असेल; पण लघुकथा लिहिण्याकडेच फारसा कल दिसत नाही. दुर्गापूजेला बंगालमध्ये अनेक नियतकालिकांचे विशेषांक निघतात. वीस वर्षांपूर्वी त्यामध्ये तीसेक कथा आणि जोडीला एखादीच कादंबरी असे. आज मात्र सहा-सात कादंबऱ्या आणि सात-आठ कथा छापणं लोक पसंत करतात.'

कादंबरीच्या या समृद्ध दालनात शंकर आणि सुनीलबाबूंखेरीज शिशदु मुखर्जी, समरेश बसु, श्यामल गांगुली, अतीन बॅनर्जी, आशुतोष मुखर्जी वगैरे नामवंत मंडळी आहेत. पैकी शिशंदु सुनीलबाबूंच्या जवळचे. श्यामल गांगुलीनी गावांचे प्रश्नही हाताळले आहेत; पण त्यांचा मुख्य भर उपनगरी-जीवनावर. 'लोकटा' या आपल्या कादंबरीनं मराठी वाचकांना माहीत झालेल्या (अशोक शहाणेकृत मराठी अनुवाद 'इसम') गौरकिशोर घोषची 'प्रेमनेल' नावाची कादबरी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. बंगाली मुस्लिमांचं जीवन चितारणाऱ्या या कादंबरीचं समीक्षकात सध्या खूपच कौतुक होतंय. मैत्रेयी चटर्जी तर म्हणाल्या, 'अशा तऱ्हेचा विषय आणि इतक्या समर्थपणे बंगालीत क्वचितच हाताळला जातो.' सुनीलबाबूंची १९ व्या शतकाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली 'शई जीवन' ही नवी कादंबरीही आज कलकत्त्यातल्या कॉफी हाउसमधला चर्चेचा विषय आहे

बातमीतले विषय घेऊन कादंबऱ्या लिहिण्याचा प्रवाहही बंगालीत सुरू झाला आहे. मार्क्सवादी राज्यात माजी अर्थमंत्री अशोक मित्रांनी 'संचयिता चिट फंड 'वर बंदी आणली. अनेक मध्यमवर्गीयांनी या चिट फंडमध्ये पैसे गुतवले होते. त्यांना वाटलं आपले पैसे जाणार! नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत अशोक मित्रांच्या पराभवाचं हे एक महत्त्वाचं कारण होतं. डॉ. सुभाष मुखर्जींना 'संचयिता 'मध्ये कादंबरीची बीजं दिसली आणि ताबडतोब पुस्तक बाहेरही आलं! याशिवाय मोती नंदीच्या क्रिकेटपटू-फुटबॉलपटूच्या जीवनावरच्या छोटया कादंबऱ्याही विषयाच्या नाविन्यामुळं नोंदणीय ठराव्यात.

## दलित साहित्याचा अभाव

महाराष्ट्रातल्या दलित साहित्याच्या प्रवाहाबद्दल मी सुनीलबाबूंना सांगू लागलो. ते पटकन् म्हणाले, 'त्याबद्दल मी ऐकलंय. काही मराठी साहित्यिक माझे मित्रही आहेत. पु. ल. वगैरे; पण बंगालीत अशा प्रकारचं असं लिखाण नाही. आमच्याकडे जातीय विद्वेष तसा प्रभावी नाही हे याचं कारण आहे;' पण सुनीलबाबूंच्या बोलण्यात फारसं तथ्य नाही हे मला श्री. बा. जोशीनीही सांगितलं, 'प्रत्येक बंगाली माणसाला असंच वाटतं; पण इथेही दलितवर्ग आहे. तो अजून बोलता व्हायचाय. दलिताच्या जीवनावरचं साहित्य जरूर लिहिलं गेलंय; पण ते इतरांनी लिहिलेलं, आपल्याकडच्या माटे-

माडगूळकरांसारखं. 'ईश्वर पाटणी' नावाची एका चांभाराच्या जीवनावरची कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. इतरही दोन–चार पुस्तकं आहेत; पण ती या प्रकारातच मोडतात.'

विशेष उल्लेख करावा लागेल महाश्वेतादेवींचा. सुरुवातीला ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणाऱ्या या बाईंनी आता संथाळ साहित्याच्या संशोधनाला वाहून घेतलं आहे. त्या अनेक दलित तरुणांना लिहिण्यासाठी प्रोत्साहन देत असतात. त्यांचं स्वतःचं लिखाणही याच समस्या मांडणारं असतं.

अनुवाद आणि वैचारिक वाङ्मयाच्या क्षेत्रातही बंगाल बराच पुढं आहे. श्री. बा. जोशींचा याबाबत मराठी प्रकाशकांवर बराच राग दिसतो. ते काहीशा चिडीनंच म्हणाले, "मराठीत एखाद्या पुस्तकाचा अनुवाद व्हायला कित्येक वर्षं लोटावी लागतात. आशापूर्णादेवींच्या 'प्रथम प्रतिश्रुती'चा अनुवाद त्यांना ज्ञानपीठ-पुरस्कार मिळाल्यावरच झाला; पण ते काही त्यांचं सर्वोत्तम पुस्तक नाही. बंगालचा देशी–विदेशी भाषांशी सतत संपर्क असतो. चिनी, रशियन, फ्रेंच वाचणारेही इथं बरेच आहेत. त्यामुळं तिथले नवे प्रवाह बंगाली साहित्यात ताबडतोब येतात. मोठे लेखकही अनुवादाच्या कामात कमीपणा मानत नाहीत."

"तेच वैचारिक लिखाणाचं. रवींद्रनाथांचे खंड तर खपतातच; पण नुकतंच शंकरीप्रसाद बसूंनी विवेकानंदांचं चरित्र सहा खंडांत लिहिलंय. या बसूंची एक गंमत आहे. आधी ते क्रिकेटवर लिहीत होते. तिथून वळले विवेकानंदांकडे. पंधरा वर्षं ते त्यावर अभ्यास करत होते. या खंडाची पहिली आवृत्ती दीड वर्षात संपली म्हणजे बघा!" सिनेमा-नाटकाचा गंभीरपणे विचार करणारी, वाङ्मयविषयक चर्चा छेडणारी नियतकालिकंही बंगालीत आहेत; पण लोक मनोरंजक साहित्य वाचणंच अधिक पसंत करतात. 'आनंद बझार'चे ग्रंथपाल चित्तरंजन बंधोपाध्याय या व्यवसायात गेली चाळीस वर्षं आहेत. ते म्हणाले, 'लोकांना हलकंफुलकं वाचण्यात जास्त रस दिसतो. 'भारतवर्ष', 'प्रवासी' यांसारखी वाङ्मयीन नियतकालिकं गेल्या काही वर्षांत बंद पडली यावरून हेच सिद्ध होतं.'

लेखिका मात्र बंगालीत फारशा दिसत नाहीत. आशापूर्णादेवी, महाश्वेतादेवी वगैरे दोन–चार नावं सोडली तर बंगाली स्त्री अजून उंबरठ्यातच आहे. राजा राममोहन रायनी टाकलेल्या सुधारणेच्या पावलाकडे बोट दाखवून बंगाल आपल्या इतिहासाचे ढोल जरूर बडवतो; पण त्यापुढं जाणं त्याला जमलेलं नाही असा याचा अर्थ लावायचा का, असं मी काही जणांना विचारलं, तेव्हा त्यांनी निव्वळ हसणं किंवा मौन धारण करणंच योग्य मानलं!

साहित्याच्या क्षेत्रातली ही आघाडी नाटक–सिनेमांच्या बाबतीत मात्र बंगालीबाबूनं राखलेली नाही. बादल सरकारची 'तिसरी रंगभूमी' नाट्यगृहांचं बंधन न मानणारी रस्ता-नाटकं आणि ठरीव साच्यातली व्यावसायिक नाटकं यापलीकडे काही नाही. रस्ता-नाटकही आता एका वर्तुळात फिरतंय. बादल सरकारांची प्रायोगिकता संपलीय म्हणावं की काय अशी परिस्थिती आहे. शिवाय बादल सरकार सामान्य माणसापासून अनेक कोस दूर आहेत ही गोष्ट वेगळी. एकूण आपली छबिलदासी चळवळ. एक गोष्ट मला कधीच समजत नाही. प्रयोग केले तर ते सामान्य माणसाला आवडत नाहीत असं आहे? मग 'घाशीराम' का चाललं? सुरुवातीला कदाचित ते पचणार नाही; पण हळूहळू नवे मार्ग रूढ होतात. ते जर होणार नसतील तर ते प्रयोगांचं अपयश नको का मानायला? की सगळा प्रपंच चार डोक्यांची खाज जिरवण्यासाठी? बंगालच्या प्रायोगिक रंगभूमीचं स्वरूप यापेक्षा फारसं वेगळं नाही. मुळात माणसं थोडी आणि गट हजार!

रंगभूमीवरचं हे अपयश चांगल्या संहितांच्या अभावामुळं आहे, असं सुनीलदांचं मत पडलं. "आमच्याकडे तेंडुलकरांसारखा समर्थ नाटककार आजघडीला झालेला नाही. जी नाटकं होतात त्यांपैकी बहुसंख्य रूपांतरित. जवळजवळ सगळा ब्रेख्त बंगाली रंगभूमीनं पाह्यला आहे; पण ओरिजनल असं नाटक शून्य."

मी मराठीतल्या कादंबऱ्यांची नाटकं करण्याच्या पद्धतीविषयी सुनीलदांना सांगितलं तर म्हणाले, "नाटक लिहिण्याचं धाडस बंगालीत फारसे कादंबरीकार दाखवत नाहीत. त्यांना तो आवाका नाही की काय कोण जाणे. नक्की नाही सांगता येणार."

सिनेमात सत्यजित रे आणि मृणाल सेननंतर मधली काही वर्षं निर्माण झालेली पोकळी आता भरून निघाली आहे. गौतम घोष, बिप्लव रायचौधरी वगैरे तरुण मंडळींनी स्वत:चे मार्ग शोधून काढले आहेत. त्याच्यापुढे अडचण आहे ती साधनांची. चित्रपट तयार होतो, प्रदर्शित होण्याची मात्र शाश्वती नाही. मार्क्सवादी सरकारनं नव्या चित्रपटांना अर्थसहाय्य करण्याची योजना आखून पैशाची अडचण दूर करण्याचा प्रयत्न जरूर केला; पण चार मंडळींचे खिसे भरण्यापलीकडे त्यातून काही साधलं नाही. मुळात तुटवडा आहे तो हे चित्रपट दाखवण्यासाठी थिएटर्सचा. सध्या अशी दोन थिएटर्स एन. एफ. डी. सी. च्या सहकार्यानं बांधायचा सरकारी प्रयत्न जारी आहे; पण त्याविषयी फारसे आशादायक उद्गार निघत नाहीत हेही तेवढंच खरं!

डेज पब्लिशर्सपासून थोड्याच अंतरावर कॉफीहाउस आहे. विद्यापीठाच्या अगदी समोरच.

कलकत्त्याच्या व्यक्तिमत्त्वात या कॉफीहाउसचं स्थान अगदी अपरिहार्य आहे. कॉलेजस्ट्रीटवरचं हे एक आणि चित्तरंजन अॅव्हेन्यूच्या जवळचं दुसरं. दोन्हीकडचा कळकटपणा, काळोख आणि भिंतीवरची कोळिष्टकं जवळपास सारखीच असली तरी आत खदखदणारे मूड्स मात्र अगदी विरुद्ध टोकांचे आहेत.

अॅव्हेन्यूजवळचं कॉफीहाउस बरंच थकलेलं. इथले अड्डेही म्हाताऱ्यांचे. फार तर 'आनंद बझार'मधल्या पत्रकारांचे. हल्ली तर म्हणे बहुतेक वेळा इथे 'बिझिनेस डिलिंग'च चालतात!

कॉलेजस्ट्रीटवरच्या कॉफीहाउसमध्ये मात्र नुसता चिवचिवाट. तासन् तास टेबलं अडवून बसलेली तरुणांची टोळकी आणि अखंड धूम्रकांड. गप्पांना तर अंत नाही!

बंगाली माणसाच्या खोलवर रुजलेल्या पुस्तकवेडापाठची आणखी दोन कारणं मला इथंच समजली.

कॉफीहाउसमध्ये शिरलो आणि कुठच्या दाढीचे खुंट पकडावेत या विचारात क्षणभर थबकलो. समोरच बसलेल्या दोन–चार तरुणांचं माझ्याकडे लक्ष गेलं. माझं नवखेपण त्यांना बोचलं असावं. 'काय पाहिजे' म्हणून विचारलं. मी कशासाठी आलोय हे सांगतो तोच

एक घोळकाच माझ्याभोवती जमा झाला.

हे इथल्या असंख्य लिट्ल मॅगझिन्सचे प्रणेते. प्रत्येकाकडे सांगण्या-सारखं काही तरी होतं. आवेश बंगाली साहित्याला आपण दिशा देणार असा.

या लिट्ल मॅगझिन्समुळं बंगाली साहित्याला दिशा मिळालीही आहे. अक्षरशः गावागावातून इथे मॅगॅझिन्स निघतात. शक्यतो सायक्लोस्टाइल्ड, शक्य तसेल तर कार्बन कॉप्यासुद्धा. प्रत्येकात या नव्या मंडळीचं लिखाण छापलेलं. लिट्ल मॅगझिन्सचा हा सगळा व्यवहार अर्थातच खिशाला चाट देऊनच चालतो. त्यामुळं बहुसंख्य नियतकालिकं वेळप्रसंगी बंद झाली म्हणून कुणी रडत बसत नाही. नव्या जोमानं दुसऱ्याची सुरुवात होते. मी सुनील गंगोपाध्यायकडे गेलो तेव्हा त्यांच्या टेबलावर या लिट्ल मॅगॅझिन्सचा ढीगच पडलेला होता. त्यातलं एक ते लक्षपूर्वक वाचत होते. मध्येच एक तरुण आला आणि त्यांना आपलं मॅगझिन देऊन गेला. स्वतः सुनीलबाबू या मॅगझिन्स चळवळीतून आले आहेत. आजही इथल्या घडामोडीकडे त्यांचं लक्ष असतं. अनेक नवीन लेखक त्यातून मिळतात असं ते म्हणाले.

या मॅगॅझिन्सचा खरा उत्सव भरतो रवींद्रजयंतीला. रवींद्र भवनातल्या कार्यक्रमाच्या वेळी तिथे असे अनेक गट आपली मॅगॅझिन्स विकत असतात. दुसरा मार्ग साहित्यजत्रांचा. याही जिल्ह्याजिल्ह्याच्या ठिकाणी होतात. त्या निमित्ताने सामान्यातल्या सामान्य माणसाचा पुस्तकांशी संपर्क येतो.

माझ्या भोवतीचा घोळका जरा दूर झाल्यावर मी टेबलावरच्या एका तरुणाकडे वळलो. हा भास्कर मुखोपाध्याय. (या मुखोपाध्याय, गंगोपाध्याय मंडळीचीही एक गंमत आहे. हे मूळचे मुखर्जी, गांगुली. स्वतःला उपाध्याय लावणं प्रतिष्ठेचं मानतात. सुरुवातीला मला सुनील गांगुली–गंगोपाध्याय दोघं वेगळे वाटायचे. नंतर एकदा बालीगंजच्या पुलावरून जाताना सागरबटरची जाहिरात बघितली आणि उलगडा झाला. 'इफ मुखोपाध्याय इज मुखर्जी सागर इज बटर्जी' हे त्या जाहिरातीतलं वाक्य. दुसऱ्या दिवशी किशोर चटर्जींना याबद्दल विचारलं तेव्हा या उपाध्यायापाठचं रहस्य उमगलं !).

भास्कर 'आदिम' नावाचं मॅगॅझिन चालवतो. लिट्ल मॅगॅझिनची चळवळ संघटित नसली तरी प्रस्थापितांना शह देण्याचं काम त्यातून नीटपणे होतं असं त्याचं म्हणणं.

मॅगॅझिनवाल्यामध्येही 'कमिटेड' आणि 'नॉन कमिटेड' असे गट आहेत असं भास्करनं सांगताच त्याच्या आजूबाजूच्या पोरांनी कान टवकारले. थोडं दबकतच भास्कर म्हणाला, 'आम्ही तसे कमिटेड नाही.'

समोरचा मुलगा खसकन् त्याच्या अंगावरच आला, 'काय आपण कमिटेड नाही ? पार्टीला नसू; पण एका विशिष्ट राजकीय विचाराला आहोतच !'

*नंतर बराच वेळ त्यांच्यामध्ये हा वाद चालला होता.*

प्रस्थापित लेखकाबद्दल पोरं थोडी चिडूनच बोलत होती. सुनील-बाबूंवर त्याचा जास्त राग. 'ते आधी आमच्यापैकी होते. आता आम्हाला विसरले !' त्यातला एकजण कुरकुरला. शंकरला तर ती जमेला धरायलाही तयार नव्हती.

सर्वांचं एका गोष्टीवर मात्र एकमत होतं. 'काही नाही हो, तुम्हाला वाटतं तसं नाही. बंगाली साहित्य अजून खूप मागं आहे' पोरं पुन्हा पुन्हा मला बजावत होती.

मला आठवलं, श्री. बा. जोशी म्हणाले होते, 'बंगाली साहित्य खूप पुढं आहे. आपण सध्या त्याच्या जवळपासही जाणार नाही !'

पोरांना मात्र वाटत होतं, ती फार मागं आहेत !

बंगाली साहित्याच्या प्रगतीचं गमक कदाचित या वाटण्यातच असेल !

**समाप्त**


## प्रसिद्ध झाले...

**संदीप पाटील आणि रवी शास्त्री सुनील आणि कपिलदेवनंतरची भारतीय क्रिकेटची ही दोन आशास्थाने. संदीप खेळाला निर्णायक कलाटणी देऊ शकतो. तर रवी निर्णायक कलाटणी देणाऱ्या कोणालाही हुकमी साथ देऊ शकतो.**

**आंतरराष्ट्रीय दर्जाचे हे दोन खेळाडू प्रथमच सांगत आहेत – त्यांच्या क्रिकेटजीवनाची कथा.**

# पटक आणि पटकार

लेखक : संदीप पाटील, रवी शास्त्री

मूल्य रुपये तीस

सवलत मूल्य रुपये पंचवीस

आदित्य प्रकाशन, मुंबई

श्यामचा संसार

कथा ४४

फिरोझ रानडे

# श्याम व महाशिवरात्री

'साहाब, आगले सोमवार को महाशिवरात्री है। आप जायेंगे?' श्यामच्या न्हाव्याने त्याची दाढी कातरता–कातरता विचारले.

ह्या प्रश्नाने श्याम चाटच झाला.

त्याचे चाट होण्याचे कारण न्हाव्याने अैसपस बोलावे हे नव्हते. श्यामची न्हावी, धोबी, भाजीपाला, पानवाले ह्यांच्याशी मोकळेपणी बोलण्याची खोडच होती. कलकत्त्याला तेच, आसाममध्ये तेच, दिल्लीला तेच व आता मसकतमध्ये पण तेच!

त्यांच्याशी रहाण्या–खाण्यावरून बोलावयाचे, त्यांच्या खाजगी प्रश्नांबद्दल चर्चा करावयाची व जमल्यास त्यांना मदत करावयाची ही श्यामची वृत्ती होती. त्यामुळे दोनचार भेटीत त्यांचे मनमोकळेपणाने बोलण्याचे जमून जात असे.

तेव्हा त्याच्या ह्या प्रश्नाने श्याम चाट पडला नव्हता. तो चाट झाला होता तो त्या न्हाव्याने आपण हिंदू आहोत हे ओळखले होते व अगदी विश्वासाने महाशिवरात्रीला जाणार का म्हणून विचारले होते म्हणून.

श्याम दिसायला यथा–तथाच होता व मसकतला येण्याआधी त्याने दाढी वाढवली होती. मुळात येथे कोणी हिंदू वा मुसलमान आहे हे ओळखणे अवघड होते. आधुनिक वस्त्र–प्रावरणामुळे म्हणजे कपड्यांमुळे तर तो अवघडपणा फार वाढला आहे. पूर्वी कपड्यांवरून धोतर–पागोट्याचा रंग व घालण्याच्या पद्धतीवरून धर्मच काय पण जातपोटजातही ओळखता येत असे.त्या वेळी कोणा ब्राह्मणाने दाढी वाढवली असती तर त्याला जातीच्या बाहेर व ठाण्याच्या तुरुंगाच्या आत टाकले असते!

पण आता फक्त रंगावरून–कातडीच्या. कपड्याच्या नाही. हा आफ्रिकी, हा विलायती, हा हिंदी उपखंडातला, हा अतिपूर्वेकडला इतकेच फार फार तर ओळखता येते.

श्यामच्या दाढीमुळे, सर्वसाधारण रंगामुळे व दिल्लीला बरेच वर्षे राहिल्यामुळे, उर्दूमिश्रित हिंदी बोलण्यामुळे,श्याम पाकिस्तानी वा हिंदी मुसलमान समजला जावयाचा.त्याचा त्याला नफाही खूप होत असे. तेव्हा न्हाव्याच्या महाशिवरात्रीला जाणार का? ह्या प्रश्नाने श्याम चाट होणे अगदी सहाजिकच होते.

'पण मी हिंदू आहे हे तू मुळी ओळखलेसच कसे?' श्यामने मोठ्या आश्चर्यतेने व थोड्या खजिलतेने विचारले.

हा न्हावी गुजराथकडला–पक्के सांगावयाचे म्हणजे आपल्या महात्मा गांधीच्या पोरबंदरचा. हिंदू. तो गुजराथी पद्धतीने हिंदी बोलावयाचा व येथे इतक्या चांगल्याचागल्या विलायती सिगरेटस् मिळत असतानाही तो गुजराथकडली विडी प्यावयाचा. हातातली विडी बाहेर भिरकावत तो म्हणाला,

'तुम्ही दाढी वाढवा नाही तर काही करा; हिंदू माणूस व मुसलमान सहज ओळखता येतो.'

'पण कसा?' श्यामचा प्रश्न सुटला नव्हता.

'ते नाही मला सांगता यावयाचे; पण तुम्ही हिंदू आहात हे मी पैजेवर सागतो!' न्हाव्याने दाढी कातरून झाली आहे व चर्चा पण संपली आहे ह्या दोन अर्थी श्यामच्या गळ्यातले पांढरे फडके काढले व जोरात झटकले.

ओमानमध्ये बरीच गुजराथी व कच्छी कुटुंबे आहेत. त्यातली काही मुसलमान असली तरी बरीच हिंदू आहेत; पण सगळी व्यापारउदिमात आहेत. ह्या हिंदू गुजराथ्यांच्या हातात मोठा व्यापार आहे. सुलतानकडे त्यांचे फार मोठे वजन आहे. ते मुळी ओमानीच आहेत.

त्यातला खिमजी रामदास हा धनाढ्य म्हणता येईल असा श्रीमंत आहे. ह्या गुजराथी शेटाने जुन्या मसकतमध्ये शिवाचे एक टुमदार मंदीर बांधले आहे. त्याला जोडून एक धर्मशाळा आहे. त्याने मुंबईचा एक तरुण पुजारी आणला आहे व त्याची आपल्या कुटुंबासहित रहाण्याची व्यवस्था केली आहे. ह्या सगळ्याचा खर्च त्या खिमजी रामदासने केला आहे व करत आहे.

हे सगळे ज्या वेळी श्यामला कळले त्या वेळी त्याच्या मनात आले, 'ह्या खाकी हाफ्‌पॅन्ट वाल्यांपेक्षा गांधीच्या हाफ्‌-धोतर वाल्यांनीच हिंदू धर्माचा जास्त प्रतिकार केला आहे म्हणावयाचा.'

श्याम न्हाव्याच्या दुकानातून बाहेर पडला व इतर जुजबी खरेदी करून घरी आला. येत असताना त्याच्या मनात महाशिवरात्रीला शिवालयात जावे का? असे येत होते.

गेले कित्येक वर्षांत तो धार्मिक उत्सवाकरता म्हणून कोणा देवळात गेला नव्हता. आपल्या धर्मात तशी पद्धत आहेच कुठे? नाही म्हणायला दहा-बारा वर्षांचा असताना नाशिकला रामजन्माकरता वा कृष्णाष्टमीला त्याच्या मित्रांचे टोळकेच्या टोळके जात असे. त्या जाण्यामागे राम-भावनेपेक्षा कृष्ण-भावना जास्त होती. गर्दीत बायकामुलींना धक्के मारता येतात ह्याची त्या वयात खूप मजा वाटावयाची. फ्रॉइडसाहेबाने ह्या वृत्तीला काही तरी अवघड नाव दिले असणार; पण ही वृत्ती जागवणे तितके अवघड नव्हते. हिंदूधर्माच्या सगळ्या उत्सवांतून आधीच मोठा गोंधळ असतो व अशा पर्वण्याचे वेळी तर फारच. तेव्हा श्याम व त्या टोळक्याची पण पर्वणी व्हायची.

श्याम थोडा मोठा झाला. राष्ट्रसेवा दलात जाऊ लागला तेव्हा अशी धक्केगिरी करणे चांगले नाही असे त्याच्या मनाने तर घेतलेच पण देवळात जाणे वगैरे धार्मिक संकुचितवृत्तीचे आहे असेही त्याला वाटू लागले. त्यामुळे देवळात जाणे सुटले ते सुटलेच.

पुढे सरकारी कामाकरता बऱ्याच छोट्यामोठ्या गावांना त्याला जावे लागले, तेथे काही प्रसिद्ध देऊळ आहे असे कळले की, तो ते बघून येत असे. तशी त्याने बद्रीकेदार, काशी–विश्वेश्वर, गोहात्तीचे कामाख्या, पुरीचे जगन्नाथ अशी कित्येक देवळे पाहिली; पण ती सगळी सफरचंद-वृत्तीने. तेथल्या देवांपेक्षा त्याचे मनात तेथले बडवे व भिकारीच जास्त घर करून राहिले होते.

□

आता श्यामला मसकतच्या कचेरीत येऊन १–१॥ महिना झाला होता. कचेरीतल्या

ब्रिटिश, इजिप्ती, पाकिस्तानी, सुदानी सहकाऱ्यांच्या ओळखी झाल्या होत्या. फक्त त्याच्या उजव्या बाजूला बसणाऱ्या पाकिस्तानी इंजिनियरची ओळख झाली नव्हती. त्याचे कारण म्हणजे तो रजेवर होता.

एक दिवस श्याम कचेरीत गेला. पहातो तो त्या रिकाम्या खुर्चीवर एक तगडा, उंच, रुबाबदार पंजाबीवृत्तीचा तरुण बसला होता. श्यामने त्याला आदाब अर्ज करताच त्याने पण केला व 'मी अमानुल्ला इंजिनियर आहे' म्हणून स्वतःची ओळख करून दिली. त्याचा तो सुट्टीवरून आल्यानंतरचा पहिलाच दिवस असल्यामुळे त्याचेकडे बरेच लोक येत होते व तो बऱ्याच जणांना भेटायला जात होता. त्यामुळे त्या दिवशी त्यांचे काही विशेष बोलणे झाले नाही.

श्याम त्याच्या पंजाबी व्यक्तिमत्त्वाने आकर्षित झाला तितकाच त्याच्या अमानुल्ला ह्या असाधारण नावामुळे. रशिया व चीनचे माहीत नाही; पण जगातल्या बाकी देशातली मुसलमान नावे बरीच एकसारखी असतात. म्हणजे अब्बास जाफर म्हटले तर तो कोणत्याही देशाचा असू शकतो आणि आपल्यात रामचंदर, रामचंद्र व रामचंद्रन ह्या एकाच नावाने तो उत्तरेचा, मध्यातला की दक्षिणेचा हे चटकन कळते व दुरावा वा आपलेपणा वाढतो.

त्या दृष्टीने अमानुल्ला हे चाकोरीबाहेरचे नाव. श्यामला कोणा मराठी लेखिकेने अफगाणिस्तानावर भारंभार लिहिले आहे त्यावरून ह्या नावाचा कोणी मोठा सुधारक अफगाण राजा होऊन गेला होता हे वाचून माहीत होते व त्याच्या नावाबद्दल उत्सुकता निर्माण झाली. हे अफगाण राजाचे नाव ह्या पाकिस्तानी माणसाचे कसे ?

चार–पाच दिवसांनी श्यामने त्याला विचारले, 'क्यूँ मिया, तुझे असे अमानुल्ला नाव कसे?' बहुधा आतापर्यंत त्याला हा प्रश्न कोणी विचारला नव्हता. ह्या प्रश्नाने तो खूष झाला व सांगू लागला, 'हे नाव माझ्या म्हाताऱ्या खालाने म्हणजे मावशीने ठेवले. ती तरुण असताना त्या नावाचा एक अफगाण राजा होऊन गेला. तो फार लोकप्रिय होता.' वगैरे.

बाकी काही नाही तरी ह्या नावाच्या प्रश्नाने श्याम व अमानुल्ला बरेच लवकर व बरेच जवळ आले. गप्पागोष्टी होऊ लागल्या. स्वतःची माहिती दिली जाऊ लागली, दुसऱ्याची माहिती विचारली जाऊ लागली.

अमानुल्लाचे कुटुंब विभाजनाच्या आधी पूर्वपंजाबमध्ये रहावयाचे. त्यांना काही मैलाचाच प्रवास करून पाकिस्तानात जावे लागले होते. आता ते सियालकोट ह्या गावी स्थायिक झाले होते. त्याचे वडील मोठे कर्मठ होते. त्यांना आपल्या राजपूतपणाचा फार अभिमान होता. एका मुसलमानाला आपल्या राजपूतपणाचा अभिमान वाटावा ह्याचे श्यामला कौतुक वाटले.

'का रे, विभाजनाचे वेळी तू तर लहान होतास; पण तुझ्या वडलांना काही फरक जाणवला का ? ते कधी आपण पाकिस्तानात आलो हे बरे केले की वाईट केले ह्याबद्दल बोलतात का ?'

'साहाब, आम्ही सियालकोटपासून २५–३० मैलांवरच होतो. पंजाबी. वडील सरकारी नोकरी करणारे. तीच नोकरी पुढे चालू राहिली, त्यामुळे आम्हाला काही फरक जाणवला नाही. आता हिंदुस्थानात दंगा–फसाद झाला की, वडील म्हणतात, 'बरं झालं येथे आलो, नाही तर त्या दंग्या–फसादात तुम्ही मुले–बाळे कदाचित मारली गेली असतात.'

श्याम त्याला हिंदुधर्मात इतके देव कसे, तर अमानुल्ला त्याला कुराणातल्या गोष्टी सांगत असे. ६५ सालच्या युद्धात हिंदी सैन्य जवळजवळ लाहोरपर्यंत कसे आले, त्यामुळे सरहद्दीवरचे लोक गाव सोडून कसे पळाले, सगळीकडे कसा गोंधळ माजला होता हे ज्या वेळी अमानुल्लाने श्यामला सांगितले त्या वेळी श्यामला मनातल्या मनात आनंद झाला.

¤

म्हाव्याने सांगितलेली महाशिवरात्र दोन दिवसांवर आली तरी श्यामचे जावे की जाऊ नये हे ठरत नव्हते. त्याच्या सहकाऱ्यांपैकी व मित्रांपैकी कोणीही जाण्याचा उत्साह दाखवला नव्हता. एकदा श्यामला वाटावयाचे की, आपण परदेशात आहोत. बाकी लोक आपआपल्या धर्माचे व आपल्या धर्मस्तानात जाण्याचे किती कौतुक करतात. तर आपण जावे; पण आतापर्यंतचा देवळाचा अनुभव विशेष चांगला नव्हता. देवळात जावे असे मनापासून वाटतच नव्हते. तेवढ्यात चपराश्याने चहा आणून ठेवला तरी श्यामचा विचार चालूच.

'क्या सोचमें पडे हो साहाब ? चाय ठंडी हो रही है!'

अमानुल्लाच्या प्रश्नाने श्याम भानावर तर आलाच; पण एकदम त्याला झटकतेने सुचले की, अरे, पाकिस्तानात किती तरी देवळे असतील. हिंदू मारले गेले वा हिंदुस्थानात आले तरी देवळे तेथेच असतील की नाही ? त्या देवळांची काय स्थिती असेल बरे ? हे अमानुल्लाला का नाही विचारू ?

'मिया, तुझ्या सियालकोटमध्ये कित्येक मंदिरे असतील. आता हिंदू तर नाहीत मग त्यांची काय स्थिती आहे रे ?'

ह्या प्रश्नाने अमानुल्ला थोडा वरमला. त्याच्या दृष्टीने श्याम आता फक्त हिंदी माणूस राहिला नव्हता तर मित्र झाला होता. तो सांगायला थोडा संकोच करू लागला.

'हे बघ, जे काय झाले असेल ते खरं सांग. चागलं–वाईट सगळं. जे काही झाले त्याला काही तू स्वतः जबाबदार नाहीस.' श्यामने त्याला बोलते करण्याकरता म्हटले.

'साहाब, चांगले–वाईट लोक तर सगळ्याच देशांतून असतात. आमच्या देशातही तसेच आहे. बाकी सियालकोटमधले मला माहीत नाही; पण आपल्या मोहोल्ल्यात एक शिवालय होते. इमारत उंच, दगडी, छान कोरीव काम केलेली होती. आजूबाजूला दहा–बारा फुटांची भक्कम दगडी भिंत होती.


सगळे हिंदू निघून गेले. प्रथम आम्ही मुले तेथे खेळायला जात होतो. मग तीन पत्ती जुगार खेळणाऱ्यांचा तो अड्डा झाला. ते लोक तेथेच जेवावयाचे, खावयाचे व रहावयाचे. पोलिसांना कळताच त्यांनी त्यांना पकडून नेले. मग काही दिवस ते तसेच राहिले. मग काही त्या जागेचा ... लोक ... पब्लिक ... टॉयलेट म्हणून उपभोग करू लागले.'

अमानुल्लाने हे वाक्य चाचरत म्हटले होते तरी श्यामच्या हृदयात ते सुरीसारखे चिरत गेले. अमानुल्ला शिवालयाचे वर्णन करत होता त्या वेळी सियालकोटचे शिवालय कसे असेल ह्याचे चित्र श्याम मनाशी रंगवत होता. आपल्या त्र्यंबकेश्वरासारखे काही तरी असणार. भव्य व थंडगार गाभारा–तेथे शिव–लिंग, उदबत्ती, कापूर वगैरेचा सुवास–आणि आता ते सगळे पब्लिक टॉयलेट !

'पण जेव्हा आयुबखान आला त्या वेळी परिस्थिती बदलली. तुमच्या लालबहादूर शास्त्र्यांनी त्याच्या मागे लागून तेथे संत्री ठेवण्याची व्यवस्था केली....'

श्यामचे अमानुल्लाच्या बोलण्याकडे आता लक्ष नव्हते. त्याने मघाशीच मनाशी निश्चय केला होता. आता निदान ओमानमध्ये वा कोणा परदेशात असेपर्यंत प्रत्येक शिवरात्रीला शिवालयात जायचेच–जायचे. □

शेतकरी चळवळ आर्थिक पातळीवरच राहील. शेतीमालाच्या रास्त भावाची आणि योग्य मार्गाने उत्पादनखर्च काढायची कल्पना जर शासनाने कायम म्हणून मान्य केली तर ही संघटना व चळवळ विसर्जित करण्याचा सल्ला मी देईन !



# शरद जोशींबरोबर ...पंजाबात

## लेखक : अरविंद वामन कुलकर्णी । लेखांक : चौथा

३० मे ला संध्याकाळी खन्ना सोडले. गाडीत आम्ही शिरेस्तोवर जीतसिंगाची सारखी बडबड चालू होती. तिथल्या मुक्कामात त्याने माझा बकरा केला होता. शेवटी शेवटी माझ्याकडे पाहून त्याने काही विचारले की, जोशीही हसू लागले होते. बाकीच्या सर्वांना माझी खात्री आहे, खन्ना सोडताना या एकाच गोष्टीचे दुःख झालेले असणार ! आम्ही 'किसान युनियन' ने पंजाब-भ्रमंतीसाठी खास भाड्याने घेतलेल्या बसमध्ये शिरलो, सामान लावले नि सर्वांचा निरोप घेण्यासाठी खिडकीशी सरकलो. जीतसिंग बाहेर उभा होता, त्याचा सारा उत्साह ओसरल्यागत झाला होता. मान वर करून आमच्याकडे स्वारी पाहीचना ! 'किसान युनियन झिंदाबाद' च्या घोषणा झाल्या. गाडीत तीसेक प्रतिनिधी व कार्यकर्ते होते. बस सुरू होणार तेव्हा आमच्यापैकी कुणी तरी मोठ्यांदा म्हणाला, 'तो भाई जीतसिंगजी, हम चले.' दाढीमिशांच्या जंजाळातूनही त्याचे कसनुसे झालेले डोळे आम्हाला जाणवले. कसेबसे दोन्ही हात उचलून त्याने आम्हाला निरोप दिला.

गाडी सुटली नि जाणवले की, अवघ्या तीन दिवसांच्या वास्तव्यात या माणसाच्या घरात आम्ही बरेच खोलवर रुजलो होतो. आमच्या बोलण्याचा विषय शेती हाच प्रामुख्याने होता. पंजाबच्या शेतीविषयीची किती तरी माहिती त्यातून आम्हाला झालेली होती. त्याची एक मुलगी कॅनडात नवऱ्याबरोबर संसार करीत होती. एक मुलगा शेतीत बापाला मदत करीत होता. बी. ए. झालेली एक मुलगी व बी. एस्सी. च्या शेवटच्या वर्षाला असलेला एक मुलगा घरी होता. त्याने तर आदल्या दिवशी श्रीकांत तराळला तासभर खर्च करून शीख स्टाइलची पगडी बांधली होती. श्रीकांत ती बांधूनच सर्वत्र हिंडत होता. आम्हीही त्याला शीख समजून काही वेळा चकलो होतो. मी तर त्याला श्रीकांतसिंगच म्हणू लागलो होतो. पंजाबचे कार्यकर्ते मराठी श्रीकांतचे ते पंजाबी कपडे पाहून खूष झाले होते. जीतसिंगाचे तर सारखे म्हणणे होते की, श्रीकांतला तिथे काही दिवस ठेवा. त्याला एक सुरेख पंजाबी बायको मिळवून देतो !

खन्ना येथेच आम्हाला ज्या एका गोष्टीची कल्पना आलेली होती ती मानसाला जाताना नि गेल्यावर चांगलीच दृढ झाली. ती गोष्ट म्हणजे पंजाबात किसान युनियनचे विणले गेलेले शिस्तबद्ध नि सुरेख जाळे. खन्ना ते मानसा हे अंतर तसे ६० मैलांचे.; पण ते कापायला आमच्या बसला सुमारे चार तास लागले. कारण वाटेत संगरूर येथे तेथील किसान युनियनचे प्रधान श्री. मालविंदरसिंग यांची रीम आमच्या बसची वाट पाहात उभी होती. त्यांनी बस थांबविली, झिंदाबादच्या घोषणा झाल्या आणि शीतपेयपानसमारंभ झाला. अशा ठिकाणी थम्स अप् किंवा कॅम्पाकोलाच्या बाटल्यांचे अक्षरशः

क्रेट्स् ठेवलेले असत. एखादा तरुण शीख ओपनरचा वापर न करता मनगटातल्या कडयानेच झपाझप बाटल्या उघडून देत असे. थम्स अप् हे जोशींचे आवडते पेय. अगदी नाट्याचार्य भरतमुनींनी सांगितलेल्या सुमनसा: आस्वादकाप्रमाणे तल्लीन होऊन ते त्याचे मोठ्या चवीने नि शांतपणे घुटके घेत ! किसान युनियनच्या पदाधिकाऱ्याकडून नि कार्यकर्त्यांकडून हार्दिक स्वागत ह्या पंजाबच्या ग्रामीण भागात हिंडताना आम्हाला आलेला सततचा अनुभव होता. वेळ कोणतीही असो, गेलेल्या ठिकाणी व्यवस्था नाही, कार्यकर्ते नाहीत, पदाधिकाऱ्यांचा पत्ता नाही असे कुठेही व कधीही घडले नाही. ज्या ठिकाणी मुक्कामाला जायचे तिथेच नव्हे तर त्या रस्त्यावरील ठळक ठिकाणी आधी कळविलेले असायचे नि त्याप्रमाणे कार्यकर्त्यांचे गट हजर असायचे. आम्ही पन्नास पैशांचे एखादे नाणे खर्चून दाण्याची एखादी पुडी घेतली तर तेही त्यांना रुचायचे नाही. त्यातला एखादा ज्येष्ठ शीख हात जोडून म्हणायचा, 'भाई, ऐसा मत करना. मत भूलो की आप हमारे मेहमान है।' मला वाटले की, शेतकरी संघटनेच्या महाराष्ट्रातील छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांनी जरूर गिरवावा असा हा पहिला धडा आहे !

मानसा (जि. भटिंडा) येथे कोण्या एका 'जय दुर्गा धरमसाले'त आम्हा सर्वांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. चारी बाजूनी खोल्या आणि मधे एक प्रशस्त मोकळा चौक अशी ती एक मजली धर्मशाळा होती. रात्री नवाला आम्ही तिथे पोहोचलो आणि सामानसुमान ठेवून थोडेसे स्थिरावतो न स्थिरावतो तोच चहा-बिस्किटांचा सरंजाम स्वागतास आला. चहा उरकून मी पत्रे लिहिण्यास आणि बाकीच्यांनी गप्पा हाणण्यास बैठक घातली. 'किसान-मजदूर' पाक्षिकाचा संपादक असलेला बिहारचा सुरेंद्र सुमन आणि कानपूरच्या पॉलिटेक्निकमध्ये लेक्चरर असलेला फिजिक्सचा डॉ. रामकृष्ण गांधी हे सर्वोदयी वाटावेत असे दोन तरुण. त्यांच्याइतके नाना जातीचे प्रश्न विचारून या दोघ्यात शरद जोशींना दुसऱ्या कुणीही भंडावून सोडले नाही. जोशीही सफाईदार उत्तरे देऊन त्यांचे समाधान करीत. तर या दोघांनी त्या वेळी भारतीय तत्त्वज्ञान, आत्म्याचे अस्तित्व वगैरे विषय चर्चेसाठी वेठीस धरले. थोडा वेळ गेला आणि दरम्यानच्या काळात गायब झालेले भास्करराव बोरावके एकदम ओरडत आले, 'अरे, स्नानाची काय उत्तम व्यवस्था आहे इथे !' झाले. स्नानोत्सुक मंडळी उठली आणि स्नानासाठी पळाली. मात्र चर्चोत्सुक मंडळी तशीच मांड ठोकून बसली होती. धर्म, संस्कृती, कर्मकांड, त्यावर पोसलेल्या संघटना, पक्ष वगैरेंची जोशींनी भलतीच खुसखुशीत चंपी केली आणि कुमार गंधर्व जसा धूमधाम मचावून अनपेक्षितपणे समेवर उतरतो तसे जोशीजी 'शेतीमालाच्या रास्त किंमती' वर उतरले !

इथे माझ्यासंबंधीचा एक बारका तपशील नोंदायला हवा. जीतसिंग मागे खन्नाला राहिला तरी माझे 'बकरेपण' चालूच होते. त्यासाठी माझे 'पत्रलेखन' हे साधन बनविले गेले. एखाद्या ठिकाणी मुक्कामासाठी डेरेदाखल झालो की, माझ्यासाठी ठरलेला आहेर असायचा, 'काढा कार्डे-पाकिटे आणि सुरू करा काम !' पायात वाहाणा सरकावून कुठे बाहेर निघालो की प्रश्न ठरलेला, 'आता पोस्टाचा शोध की पोस्टच्या पेटीचा शोध ?' बाकी यामुळे दोन् गोष्टी झाल्या. पहिली म्हणजे माझी चेष्टा करता करता भास्कररावांनाही सुरसुरी आली आणि त्यांनी चक्क एक आतर्देशीय त्यांच्या लेकीला व जावयाला लिहिले ! आणि दुसरी गोष्ट म्हणजे नवाशहरला भर दुपारच्या उन्हात दोस्तीखातर पुण्याचे गुप्तचरअधिकारी पोस्टऑफिस हुडकण्यासाठी माझ्याबरोबर तास-दीड तास तंगले आणि त्यामुळेच असेल, तो भला माणूस त्यानंतर आम्हाला दिसला नाही, गुप्तच झाला !

दहा-साडेदहाला यथेच्छ पंजाबी भोजन उरकून चौकात टाकलेल्या खाटांवर लवंडलो. झोप कधी लागली ते कळलेच नाही. सकाळी चहा घेऊन आम्ही दहाबाराजण स्नानासाठी कालव्यावर गेलो. मनसोक्त स्नान केले. तिथेही साबण, टॉवेल्स, डोक्याला लावायला तेल वगैरे घेऊन कार्यकर्ते उभे. डोक्याला सरसूचे उग्र दर्प मारणारे तेल लावताना मोठे चमत्कारिक वाटले; पण आतिथ्याचा रेटा असा होता की, तेही माखून घेतले. ओले कपडेही हातात वागविण्यास आम्हाला मनाई होती. तेही कार्यकर्त्यांच्याच हाती. हे ठीक नाही असे वाटत होते; पण नाइलाज होता. 'जय दुर्गा'त परतलो तो न्याहारीची तयारी झालेली होती. कपडे केले, न्याहारी उरकली आणि बाहेर उभ्या असलेल्या बसमध्ये जाऊन बसलो. सभास्थानी जायचे होते. क्षिदाबादच्या घोषणा झाल्या. बस गुरगुरली आणि श्रीकांत व विजय ओरडले, 'समोर काय आहे बघा !' आम्ही पाहिले तो बसच्या समोर एक कलाबूत लावलेला लाल डगले परिधान केलेला बँडचा ताफा उभा होता. त्यांच्या नेत्याने क्लॅरोनेट सरसावले, बँड सुरू झाला आणि पुढेही सरकू लागला. नाही म्हटले तरी मी भांबावलो होतो. कसले तरी संचलनगीत वाजविले जात होते. जोशी म्हणाले, 'हे उत्तमच आहे. धुळे जिल्ह्यात असाच एकदा गावकऱ्यानी बँड लावला होता आणि बँडवाले घोळून घोळून फक्त एकच पद वाजवत होते – हमारे अंगनेमें तुम्हारा क्या काम है ... !!'

मानसा हे छोटेखानी असले तरी तालुकेवजा गाव. सभेसाठी तिथेही भव्य मंडप उभारला होता. मंडपाची व्यवस्था व कार्यक्रमाचा आराखडा खन्नाप्रमाणेच होता. स्टेजवर व सभामंडपात सारखे गार पाण्याचे ग्लास फिरत होते. उन्हाचा कार फार होता म्हणून स्टेजवरच्या प्रत्येकाला गवती पंखे देण्यात आलेले होते. अॅड. गुरमेनसिंग यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सभेला १५ हजार किसान आलेले होते. अनेक वक्ते बोलले; पण इथेही प्रधान आकर्षण शरद जोशी हेच होते. आपल्या अर्ध्या तासाच्या भाषणात जोशींनी ही सभाही जिंकली. आपल्या खास हिंदीत सोप्या नि ओघवत्या शैलीत त्यांनी शेतीमालाच्या रास्त भावाचा प्रश्न मोठ्या प्रभावीपणे मांडला आणि वाहवा मिळविली !

## नवा शहर

३१ मे ला सभा आटोपून दुपारी चार वाजता मानसा सोडले आणि नवा शहर या जालंधर जिल्ह्यातील गावाच्या रोखाने निघालो. जाताना लुधियाना शहरात शिरण्याच्या आधी तेथील सुप्रसिद्ध कृषिविद्यापीठ लागले. रस्त्यावरच त्यांचे एक मोठे दूध-विक्री-केंद्र आहे. तिथे पिण्यासाठी वाटल्यांतून गार, गोड सुगंधित दूध विकले जाते. हा एक कार्यक्रमातील आधी ठरलेला थांबा असावा. इथे प्रत्येकाला

दोन-दोन तीन-तीन बाटल्या दूध पाजण्यात आले. गेल्या दहा वर्षांत कोकणात राहायला गेल्यापासून दूध पिण्याची व पचविण्याची शक्ती मी गमावलेली आहे, याचे तिसरी बाटली संपविताना मला विशेष दुःख झाले !

सर्व आशियाखंडात प्रसिद्ध असलेल्या कृषिविद्यापीठात आम्ही शिरलो. सर्व गोष्टी पाहायला वेळ नव्हता; पण जोशी आणि भास्करराव यांचा इथे जाण्याचा फार आग्रह होता. ग्रंथालयात त्यांना काही संदर्भ मिळवायचे होते. खूप मोठ्या क्षेत्रावर पसरलेली या विद्यापीठाची वसाहत अतिशय आकर्षक व देखणी आहे. नव्या पद्धतीने बांधलेली ग्रंथालयाची इमारत तर खास प्रेक्षणीय आहे. शेतीविज्ञानाबाबतचे अतिशय अद्यायावत ग्रंथालय अशी याची सर्वदूर ख्याती आहे. तिथली व्यवस्थाही फारच चांगली दिसली. आम्हाला तिथे फार काळ रेंगाळता आले नाही; पण तेवढ्यात मी व भास्कररावांनी तिथला नियतकालिकांचा विभाग धांडोळून घेतला. तिथेच आम्हाला चंदीगढहून प्रसिद्ध होणाऱ्या 'इंडियन एक्स्प्रेस'चा अंक पाहायला मिळाला. त्याच्या पहिल्याच पानावर जनसमुदायासमोर भाषण करणाऱ्या शरद जोशींचा खूप मोठा फोटो छापला होता आणि खन्नाच्या सभेची बॅनर लाइन होती. विस्ताराने जोशींच्या भाषणाचा व पास झालेल्या ठरावाचा वृत्तान्त छापलेला होता. तेव्हढ्यात काहींनी पंजाबी व हिंदी वृत्तपत्रेही आणली. त्यात तसाच मजकूर होता. म्हणजे या भागातल्या वृत्तपत्रांना गंभीरपणे किसान चळवळीची दखल घेण्याची सुबुद्धी सुचत होती तर !

फारसा वेळ नव्हता म्हणून असे ठरविण्यात आले की, भास्करराव, विजय जावंधिया आणि श्रीकांत तराळ यांनी लुधियानाला रात्र काढायची. किसान युनियनचे एक सुसज्ज छोटेखानी ऑफिस तिथे असल्याने निवासाचा प्रश्न नव्हता. एरवी हॉटेल शोधावे लागले असते. त्या तिघांनी दुसरा दिवस ग्रंथालयात काढायचा आणि रात्री आम्हाला फिरोजपूरला गाठायचे असे ठरले. संध्याकाळी ७–७॥ ला लुधियानाच्या कार्यकर्त्यांनी पुन्हा जोर केला. केक्स, नमकिन, चहा, थम्स अप् याची पुन्हा एक जोरदार फेर झडली. हमरस्त्यावर जोरदार घोषणा दिल्या गेल्या आणि तिघांना मागे सोडून आमच्या स्वाऱ्या नवा शहरच्या रोखाने दौडू लागल्या.

रात्री १० वाजता नवा शहरला पोहचलो. तिथेही अशाच एका 'धरमसाले'त उतरायची व्यवस्था होती. किसान युनियनचे कार्यकर्ते स्वागताला उभे होते. खोल्यातून गाद्याही घालून ठेवण्यात आलेल्या होत्या ! तिथे गेल्या गेल्या चहा आला. शीतपेये आली. मग जेवण. आम्हा दोघानाही आता या गोष्टी असह्य होत्या. झोपडपट्टीच्या भाराने फुटायला आलेल्या शहरासारखी पोटांची स्थिती झाली होती. तोंडाने नि गळ्याने तर चक्क 'रास्ता रोको' आंदोलकाचा पवित्रा घेतला होता ! दोन्ही हात जोडून अतिशय काकुळतीला येऊन आम्ही नवा शहरच्या कार्यकर्त्यांच्या प्रेमळ आग्रहाला नकार दिला. अगदी सकाळी चार चार कप चहा पिण्याचे वचन दिले आणि स्वतःची सुटका करून घेतली. थोड्या वेळाने पंजाबचे प्रधान भूपेंद्रसिंग मान आणि जन. सेक्रेटरी अजमेरसिंग लाखोवाल एक तातडीचा निरोप घेऊन आले. दुसऱ्या दिवशी सकाळी चंदीगढला ८–८॥ वाजेपर्यंत शरद जोशींना पोहोचणे आवश्यक होते. 'इंडियन एक्स्प्रेस'च्या संपादकाच्या सांगण्यावरून प्रमुख वार्ताहर श्री. विनोद मिश्रा यांनी शरद जोशींची एक मुलाखत घेण्याचे ठरविले होते. श्री. बलबीरसिंग राजेवाल परस्पर चंदीगढला येणार होते. पंजाबच्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने ही अगदी पर्वणी होती. त्यांना झालेला आनंद त्यांच्या शब्दांतून जाणवत होता. ही वेळ गाठण्यासाठी सकाळी ६ वाजता नवा शहर सोडणे आवश्यक होते. त्यासाठी पहाटे पाचच्या आधी उठण्याचा त्रास जोशींना घ्यायचा होता. निघायचे ठरले आणि मंडळी पांगली. भास्करराव वगैरे काय करत असतील याविषयी बोलतानाच आम्ही दोघे झोपलो.

दुसऱ्या दिवशी पहाटे मला साडेचार वाजताच जाग आली. पाच वाजता जोशी उठले. साडेपाचला चहा आला. पावणेसहाला आम्हाला चंदीगढला नेणारी ॲम्बेसेडर आली. दाढी, स्नान वगैरे आटोपून बरोबर सव्वासहाला आम्ही सहाजणांनी नवाशहर सोडले. गुरुबचनसिंग बाखिया, भूपेंद्रसिंग मान, अजमेरसिंग लोखोवाल, मेजर ईश्वरदयाळ त्यागी, जोशी आणि मी असे हे सहाजण. निघताना असे ठरले की, बारा वाजेपर्यंत आम्ही परतायचे आणि तोवर इतरांनी सभा चालू करायची.

नवाशहर ते चंदीगढ हे अंतर ऐंशीएक मैलांचे. रस्ता अतिशय चांगला. एका मोठ्या कालव्याच्या काठाने रस्ता धावत होता. रस्त्याच्या दुतर्फा निलगिरीची झाडे, त्यांच्या चार–सहा रांगा पद्धतशीरपणे उभ्या. दोन्ही बाजूंना क्षितिजापर्यंत ओळंबा लावून रेखून घ्यावी अशी सपाटीतली समांतर जमीन. बहुतेक शेतातील गव्हाची कापणी–मळणी वगैरेची कामे संपलेली. बऱ्याच ठिकाणी पालेभाज्या आणि फळभाज्यांचे टवटवीत तांटवे. काही ठिकाणी कापलेल्या गव्हाच्या पिंजराचे व्यवस्थित रचलेले ढीग तर काही ठिकाणी शंकूच्या आकारातील सकाळचे ऊन्ह पांघरल्यामुळे अधिकच पिवळसर दिसणारे ताज्या ताज्या पंजाबी गव्हाचे ढीग. जिकडे तिकडे पसरलेली पंजाबची पांढऱ्या भुऱ्या रंगाची जमीन, त्यावर पसरलेले सकाळचे कोवळे ऊन्ह आणि साऱ्या वातावरणातच उन्मळून आलेली कसली तरी प्रसन्नता यामुळे कसे छान छान वाटायला लागले. रस्त्याने क्वचित् एखादी रेडे किंवा बैल जोडलेली गाडी सोडली तर गव्हाने किंवा गव्हाच्या पोत्यांनी लादलेल्या ट्रॉलीज जोडलेले ट्रॅक्टर्स सर्वत्र भेटत होते. त्यावर आरूढ झालेले मजबूत शीख किसान. सारे परिसर इतके सजीव, इतके देखणे होते की, न राहवून मी जोशींना म्हटले, 'आपण हिंदुस्थानात हिंडतो आहोत असे वाटत नाही !' त्यावर एकदम जोशी म्हणाले, 'हे तर मी युरोपातही अनुभवलेले नाही !' पंजाबची भूमी आणि भूमिपुत्र या दोन्ही अजब चिजाच आहेत असे त्या क्षणाला वाटून गेले.

## रंगलेली मुलाखत, धाडसी सल्ला !

भूपेंद्रसिंग व अजमेरसिंग ही दोन्ही गप्पिष्ट माणसे. निवेदनाच्या दोघांच्या पद्धतीही अलग. भूपेंद्रसिंगांना तपशिलातील बारकाव्यांचे आणि अजमेरसिंगांना तपशिलाच्या कालानुक्रमाचे भान मोठे. या दोन्ही बाजू लक्षात घेऊन मी त्यांना काहीबाही विचारीत होतो. तशा खन्नापासूनच आमच्या सतत बैठका झडत होत्या. त्याद्वारा पंजाबचा शेतकरी, त्याचे प्रश्न, किसान युनियन वगैरेबद्दलचे चित्र हळूहळू

स्पष्ट होत चालले होते.

आम्ही ८॥ च्या सुमारास चंदीगढला पोहोचलो. सरळ विनोद मिश्रांच्या घरीच गेलो काही जरुरीच्या कामामुळे 'एक्स्प्रेस'चे संपादक श्री. प्रभास जोशी यांना रात्रीच दिल्लीला जावे लागले होते, पण जाताना त्यांनी व्यवस्थित मुलाखत घेण्यासाठी विनोद मिश्रांना आवर्जून बजाविले होते. एक्सप्रेसगटाच्या मासिकासाठी ही मुलाखत घेतली जाणार असे मिश्रा म्हणाले. मुलाखतीसाठी मिश्रांच्या घरीच बसलो. प्रारंभी चहा–बिस्किटे झाली. मिश्रांचे वडील सेवानिवृत्त मेजर आहेत. ते मोठ्या अगत्याने जोशींना भेटले. त्यांच्या बोलण्यात जोशींच्या कार्याबद्दल वरचेवर गौरवोद्‌गार येत होते. अशा नमनानंतर मुलाखत सुरू झाली. मिश्राजी हा एक तिशीतला सडसडीत बांध्याचा देखणा तरुण. त्यानेही युरोप-अमेरिकेत काही काळ वास्तव्य केलेले. तिथल्या पत्रकारितेचा त्याच्यावर मोठाच संस्कार दिसत होता. एक अगदी छोटासा, पण मोठा भारी विलायती टेपरेकॉर्डर घेऊन मिश्राजी थोडक्यात अचूक व नेमके प्रश्न विचारीत होते. त्यांची जोशींनी विस्ताराने उत्तरे द्यावीत असा आग्रहही धरीत होते. अशा मुलाखतींना जोशी चांगलेच सरावलेले आहेत असे त्या वेळी जाणवले. मुलाखतीचे माध्यमही इंग्रजी भाषा असल्यामुळे प्रश्नच नव्हता. शेतीमालाच्या रास्त किमतीच्या आग्रहामागील तात्त्विक अर्थकारण त्यांनी चांगलेच स्पष्ट केले. तसेच या चळवळीचे केवळ आर्थिक स्वरूपही. छोटे शेतकरी, शेतमजूर, ग्राहक याविषयी मिश्रांनी विचारलेल्या प्रश्नांना ही द्वंद्वे भेदनीतिजन्य असल्याचे चोख उत्तर दिले. शेतकऱ्यांच्या या चळवळीचे मूळ देशाच्या दारिद्र्यात असून शेतीमालाला रास्त किमती मिळाल्याशिवाय दारिद्र्याचा प्रश्न सुटणार नाही हे पटवून दिले. शहरातील झोपडपट्ट्यांच्या वाढीचे कारणही हेच होय. ग्रामीण परिसरातील भांडवलसंचय हाच दारिद्र्याच्या दुखण्यावरील अक्सीर इलाज होय असे जोशी म्हणाले आणि उद्या किसान जर इतरांचे शोषण करू लागला तर? या प्रश्नावर जोशी म्हणाले की, मग किसानाशी लढावे लागेल आणि संघटना तशी मोर्चेबंदी करण्यास कचरणार नाही. कारण हा लढा दारिद्र्यविरोधी, शोषणविरोधी आहे.

अनेक उदाहरणे देत जोशी प्रत्येक मुद्द्याचा चिकित्सक खल करीत होते. सुमारे तासभर ही मुलाखत रंगली. दरम्यान बलबीरसिंग राजेवालही तिथे आले. शेवटी टेपरेकॉर्डरचे एक बटन दाबून तो बंद करीत मिश्रा जोशींना म्हणाले, 'काही अडचणीत टाकणारे प्रश्न विचारून तुम्हाला मी भंडावले असेल तर माफ करा. तुमचे दोन-तीन लेख मी वाचले आहेत. खन्नाचे भाषणही ऐकले आहे. खरे म्हणजे एरव्ही मी तुमचा फॅन आहे!' त्यावर सगळेचजण सुखावले व हसले. मी मिश्रांना म्हटले, 'मिश्राजी, जोशींना आणखी दोन प्रश्न विचारा— एक, त्यांच्या विचारात व गांधीजींच्या ग्रामीण परिसराबाबतच्या विचारांत काही साम्य दिसते, त्यावर जोशींनी बोलावे आणि दुसरा प्रश्न म्हणजे अखिल भारतीय किसान युनियनचे अध्यक्ष श्री. नारायणस्वामी नायडू यांनी तामिळनाडूत आपल्या संघटनेचे स्वतंत्र राजकीय पक्षात रूपांतर केले असे वृत्तआहे, तर जोशींचे याबद्दल मत काय?

यातील पहिल्या सवालाबद्दल प्रश्नच नव्हता. जोशींनी त्याचे उत्तरही व्यवस्थित दिले. गांधीजींच्या ग्रामोद्योग, अंत्योदय, स्वदेशी वगैरेबद्दलच्या विचारांचे ऋण त्यांनी कृतज्ञतापूर्वक मान्य केले; पण त्याबरोबरच स्वत:च्या विचाराची केवळ अर्थक पातळी आणि अधिक शास्त्रशुद्धता नम्रपणे सांगितली. (तो काळ लक्षात घेतला तर अपरिहार्यपणे गांधीजींच्या भूमिकेत संमिश्रता होती. राजकीय स्वातंत्र्य ते नजरेआड करू शकत नव्हते; पण तरीही त्यांनी राजकीय स्वातंत्र्य हे साध्य मानले नाही, साधनच मानले. समस्त भारतीय प्रजेची सर्वांगीण उन्नती हेच त्यांचे साध्य होते!) दुसऱ्या सवालाने मात्र त्या छोट्याशा बैठकीत छोटेसे वादळच निर्माण झाले. मेजर त्यागींनी या प्रश्नाला जोरदार आक्षेप घेतला. त्यांच्या मते मी निष्कारणच वादग्रस्त आणि आज संघटनेला अडचणीत आणणारा प्रश्न सुचवितो आहे. त्यांचे म्हणणे खरेही होते; पण गेले काही दिवस नारायणस्वामींच्या घोषणेमुळे अस्वस्थ झालेले कार्यकर्ते मी पाहात होतो, त्यांच्या शंका ऐकत होतो. त्यांच्या बंदोबस्तासाठी हा प्रश्न आवश्यक आहे असे माझे म्हणणे होते. अडचणीत आणणारे प्रश्न टाकून गुंता वाढतो असे मीही जोराने सांगितले. नाही म्हटले तरी जोशीही प्रारंभी अस्वस्थ झाले होते. त्यांना अशा प्रश्नाची अपेक्षा नसावी; पण नंतर त्यांना त्याची आवश्यकता पटलेली असावी. या प्रश्नाचे उत्तर देताना त्यांनी नारायणस्वामींच्या कार्याचा मोठा गौरव केला. त्यांच्या या निर्णयाचा नेमका तपशील ठाऊक नसल्याने त्याविषयी मतप्रदर्शन अशक्य असल्याचे सांगितले. स्वत:ची भूमिका मात्र ही चळवळ आर्थिक पातळीवरच ठेवण्याची आहे हे नि:संदिग्धपणे स्पष्ट केले. मिश्रांच्या एका उपप्रश्नाला उत्तर देताना जोशींनी एक फार महत्त्वाची व नवी कोरी अपेक्षा मांडली. शेतीमालाच्या रास्त भावाची आणि योग्य मार्गाने उत्पादनखर्च काढायची कल्पना जर शासनाने कायदा म्हणून मान्य केली तर ही संघटना व चळवळ विसर्जित करण्याचा मी सल्ला देईन!

जोशींच्या या बोलण्याने मिश्रासह सर्वजण एकदम चमकले. जोशींनाही आपल्या अशा बोलण्याच्या संभवनीय परिणामांची कल्पना असावी. कुणाकडेही न बघता त्यांनी शांतपणे सिगरेट पेटविली आणि एक झुरका घेतला. थोड्या वेळाने त्यांनी माझ्याकडे रोखून पाहिले. त्या वेळी किंवा त्यानंतरच्या प्रवासात मी प्रगट न केलेली वस्तुस्थिती मला इथे सांगायलाच हवी. जोशींचे ते उत्तर ऐकून मी पुरा हबकून गेलो होतो. प्रश्न सुचविताना असे काही ऐकायला मिळेल अशी माझी अपेक्षा नव्हती. त्यांनी दिलेल्या उत्तराचा फक्त पूर्वार्धच मी गृहीत धरला होता त्या क्षणाला मला वाटले की, हे ऐकायला किमान भास्करराव तरी हवे होते. तसे माधवराव मोरे, प्रल्हाद कराडपाटील प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे, प्रा. सुभाष जोशी, भाई धारिया इत्यादि मंडळी हवी होती; पण भास्करराव राहिले होते लुधियानामध्ये नि इतर मंडळी दूर महाराष्ट्र वा कर्नाटकात मागे राहिलेली! 'माणूस'चे श्रीभाऊ माजगांवकर असते तर त्यांना अलीकडे शरद जोशी आणि ते यांच्यात जाणवू लागलेल्या 'गॅप'मध्ये काही तरी मौलिक भरले जात आहेसे भासले असते!

जोशींचे हे म्हणणे मला प्रथम चमत्कारिक वाटले. कारण अशी विसर्जनाची भाषा करायची म्हणजे मग उभ्या केल्या जाणाऱ्या संघटनेचे, तिच्यासाठी राबणाऱ्या कार्यकर्त्यांचे काय असे वाटले; पण थोड्या विचारांती लक्षात आले की, हे वाटणे योग्य नाही. अशा वाटण्यामागची प्रेरणा अन्य हेतूचीच आहे. कारण जोशी संघटित

करीत असलेल्या चळवळीचा जीवितहेतू केवळ आर्थिक आहे नि एक कलमी आहे. शेतीमालाचा उत्पादनखर्च ठरविण्यासाठी यथायोग्य आराखड्यास मान्यता आणि त्यानुसार शेतीमालाला रास्त भाव देण्यास मान्यता या गोष्टी शासकीय पातळीवर मान्य झाल्यानंतर या चळवळीचे निर्मितिकार्य पूर्ण होणार आहे. तिच्या जीवितहेतूची पूर्तताच अशा मान्यतेत सामावलेली आहे. मग या चळवळीला वेगळे असे कोणते कार्य शिल्लक राहते? मग जे काही प्रसंगोपात् प्रश्न उभे राहतील त्यांचे स्वरूप मामुली असेल. त्यांची सोडवणूक इतर मार्गांनी करताही येईल. हे असे काही जाणवून गेले नि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस विसर्जित करा असा सल्ला देणारे महात्मा गांधीजी माझ्या नजरेसमोर उभे राहिले !

### भाषणं कमी, संगीतबाऱ्या जास्त !

मिश्राजीकडील मुलाखत आटोपून आम्ही बाहेर पडलो नि शहरात एक फेरी टाकली. ला कर्ब्युझिएं या फ्रेंच स्थापत्यविशारदाने रेखलेले हे शहर. जोशी ते प्रथमच पाहात होते. या सर्व भागात आधी खूप झाडी होती. ती साफ करून शहराची उभारणी झालेली आहे हे कळताच प्रशस्त रस्ते, मोठाल्या इमारती, रेखीव चौक इ. ची महती कुणालाच वाटेना. राखता येईल तितकी झाडी का राखली गेली नसावी हा सर्वांनाच एक प्रश्न जाणवू लागला. नाही तरी हे शहर बळेबळे सुबक शब्द जमवून, अनुप्रासाची रेलचेल उडवून नि अट्टाहासाने यमकांची बांधणी करून बनविलेल्या एखाद्या 'सुंदर' कवितेचीच जाणीव देते. सर्वांनाच त्याची लगामी लावलेली निर्जीवता जाणवत असेल काय ?

आमची परतीची तिकिटे रिझर्व व्हायची होती. त्यातही दूध-आंदोलनासाठी आठ-दहा ठिकाणी सभा घ्यायच्या म्हणून जोशी व भास्करराव जळगावला जायचे होते. विजय व श्रीकांत नागपूरला, तर कर्नाटकात गावी जायलाच हवे म्हणून मी पुण्याला असा तिकिटाचा प्रकार होता. मे. त्यागींनी ही जबाबदारी घेतली होती. ते दिल्लीच्या त्यांच्या एका स्नेह्याला फोन करणार होते. वास्तविक चंदीगढ-दिल्ली डायल फिरवून सरळ फोन होतो; पण पोस्टऑफिसातून तो होऊ शकला नाही. मग आम्ही दुसऱ्या एका ठिकाणी गेलो. ते रासायनिक खते, जंतुनाशके वगैरेचे दुकान होते. दुकानदार किसान युनियनच्या कार्यकर्त्यांना ओळखत होता. त्याने आगतस्वागत चांगले केले. तिथून फोनही लगेच लागला. मे. त्यागी व जोशी फोनवर बोलले. तिकिटांचे काम होईल असे सांगण्यात आल्याने आम्ही निश्चित झालो.

त्या दुकानदाराने फार आग्रह केला म्हणून जरासे तिथे बसलो. कॅम्पा कोला प्यायलो. हरयानातील सुंदोपसुंदीबद्दल तो माणूस बोलत होता. त्याच्या बोलण्यावरून तो जनता पार्टीचा कार्यकर्ता वाटला. जोशी मला म्हणाले, 'म्हणजे हा तुमच्या पक्षाचा दिसतोय!' त्यामुळे त्या गृहस्थांना स्फुरण चढले की काय कोणास ठाऊक, त्यांनी एक मोठी हकीकत सांगितली. परवाच्या निवडणुकात हरयाना व हिमाचल प्रदेशात भाजपचे लोक अतिशय उर्मटपणे वागत होते म्हणे ! जनतावाल्याचा तर पदोपदी अपमान. त्यामुळे जनताने उमेदवार उभे केले आणि हरयानात १४ तर हिमाचल प्रदेशात ७ असे भाजपचे उमेदवार पडले. (त्यांनीही जनताचे काही उमेदवार पाडलेच !) पण ३ ते ५ हजार मते मिळविणाऱ्या जनता उमेदवारांच्या मतदारसंघात भाजपचे उमेदवार ५०० ते १५०० मतांनी पडले आहेत. देवीलालना ही गोष्ट फारच लागली म्हणे ! एरव्ही या दोन्ही राज्यांत इंदिरा काँग्रेसचे शासन येऊच शकले नसते असे त्याने ठामपणे सांगितले.

असेल तर-भाजपचा आडमुठेपणा, लोकदलाची स्वार्थी अलिप्तता, इंदिरा काँग्रेचा संधिसाधूपणा आणि जनता पक्षाचा स्वतःचे नाक कापून इतरांना अपशकून करण्याचा उद्योग यापैकी कशातही आम्हापैकी कुणालाच स्वारस्य नव्हते. जोशीचे सोडून द्या; पण तिथे असणाऱ्या इतर प्रत्येकाचा राजकारणाशी व (विरोधी) राजकीय पक्षांशी एकदा संबंध येऊन गेलेला होता. तिथल्या गदारोळात सर्वांचेच तोंड आणि हात कमीजास्त प्रमाणात पोळलेलेही होते. शेतकऱ्यांच्या बाबतीत सारे राजकीय पक्ष सारखेच या भूमिकेपर्यंत पोहोचलेलीच सारी मंडळी होती. तेव्हा मनसोक्त हसून तो क्षण सर्वांनी साजरा केला आणि त्या सद्गृहस्थाचा निरोप घेऊन आम्ही बाहेर पडलो. एका पंजाबी 'धाब्या' (हॉटेला) वर खाणे उरकले आणि नवा शहरचा रस्ता धरला.

नवा शहरला पोहोचायला आम्हाला दुपारचा एक वाजला. सरळ सभेच्या ठिकाणी गेलो. इथल्या कार्यकर्त्यांनी लुधियानाहून एक गाणारी पार्टी कार्यक्रमासाठी आणली होती. व्याख्याने आणि मध्येच गाणी असा कार्यक्रम चालू होता. गायक व गायिका बरेच लोकप्रिय असावेत. मुख्य म्हणजे ती सारी मंडळीही जुन्या काळापासून किसान युनियनशी बांधिलकी पत्करणाऱ्यांपैकीच होती. त्या गायकाने स्वतःचा फोटो छापलेले आपले कार्ड मला दिले आणि लुधियानाला यायचे आवर्जून निमंत्रणही दिले. 'जोसीसावकोही लाना' हे वर होतेच !

सभेला १२-१५ हजाराचा जमाव उपस्थित होता. संयोजनाचा ढाचा आधीच्या सभाप्रमाणेच होता. फक्त संगीतबाऱ्या अधिक होत्या. त्याच्यामुळे आम्ही थोडेसे नाउमेदच झालो. कारण संगीत आणि संवाद यांच्या मिश्रणाने बनलेले मराठी 'संगीत' नाटक आमच्या परिचयाचे होते; पण अशी 'संगीत' सभा आम्हाला ठाऊक नव्हती; पण तिथल्या श्रोत्यांना याची सवय असावी असे दिसले. गाणी आणि व्याख्याने या दोन्हींना ते चांगलीच दाद देत होते. इथले जोशीचे चाळीसेक मिनिटांचे भाषण चांगलेच रंगले. गायक मंडळी व त्यांचे साथीदारही जोशींना काळजीपूर्वक ऐकत होते आणि योग्य वेळी दादही देत होते. सभा संपविली, उभ्या-उभ्याने जोशींनी तिथे आलेल्या काही वार्ताहरांशी बातचीत केली आणि आम्ही सर्वांचा निरोप घेऊन बसमध्ये चढलो. बस फिरोजपूरच्या रोखाने निघाली.

(क्रमशः)

# पुस्तके

## भावनांचे ' डोह '

'मनाचे डोह' ह्या गोविंद कुलकर्णी यांचा नव्याने प्रसिद्ध झालेला काव्यसंग्रह. डोह शब्द उच्चारल्यावर बालकवींच्या 'औदुंबर' कवितेची आठवण होते. मनाची गतिमानता, अस्थिरता, अनिश्चितता आणि डोहाची सारी घटनावैशिष्टचे मनाशी निगडित असणे, मन एक नाही, त्यात अनेक मनात दडलेली अनेक रहस्ये. अशा मनाच्या डोहाचे अंतर्बाह्य ढवळून निघणे आणि त्याला कारण एक अशी अवस्था जिथे देहाचा अभंग होतो. ह्या डोहांचे मूडस् अनुभवणं म्हणजे एकेका कवितेचा अनुभव घेणे. कवितेचा मूड आणि कविमनाचा मूड यांचा विचार केला तर सर्वभर पसरलेली उदासीनता,निष्फलता,अपुरेपणा, रिकामेपणा, अंतर्मुख करतो. अनुभवात सघनता येते. जगण्याच्या जाणिवेत आणि ती जाणीव शब्दांत पकडण्याच्या जाणिवेत असणारे सामर्थ्य आपले वेगळेपण स्पष्ट करणारे आहे. ह्या संग्रहातील कवितांना विषयाचे आणि आशयाचे बंधन नाही. तिला स्वतःचा खोल डोह सापडलेला आहे, जो मराठी कवितेत स्वतःचे अस्तित्व नव्याने सिद्ध करणारा ठरेल.

सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक अशा कोणत्याही तथाकथित सद्यःकालीन जाणिवेत ही कविता गुंतून पडत नाही. आपल्याच मनाच्या विमनस्क अवस्थेचा शोध आणि स्वीकार आपल्याला जाणवू लागतो. केवळ शरीराला अस्तित्व असून चालत नाही. मन आणि त्याच्या साऱ्या तऱ्हा जिवंतपणे अस्तित्वात असाव्या लागतात. एका भूमिकेतून पहाता 'मनाचे डोह' मधील कवितांचे विश्व एककेंद्री आहे. ही एककेंद्रता जशी या कवितांची मर्यादा मानता येईल त्याहीपेक्षा ती त्या कवितांची सूक्ष्मताही मानता येईल. मूडस् शब्दात पकडणं ही तशी काहीशी अवघड कला इथे व्यक्त झाली आहे. म्हणून सर्वच कविता विशेष लक्षवेधी वाटतात.

उदासीनता हा ह्या कवितांचा केंद्रबिंदू मानला तर या एका मनाच्या अवस्थेकडे कवी विविध अनुभवांतून पहातो. स्वतःच्या ठिकाणी काही तरी असते आणि जगणे पुढे पुढे जाताना जे असते ते संपत जाते. असलेला आधार तुटत जातो आणि रिकामेपणाचा अनुभव त्याला अस्वस्थ करतो. रंगहीनता येते. मनाच्या तावडीतून क्षण-आनंदाचे निसटतात. आपणच आपल्याला परके वाटू लागतो. दुःखाच्या कोशात गुरफटतो. रुक्ष आठवणीत गुंतून पडतो. कणाकणाने मन झिजत असते. अशा वेळी येणाऱ्या औदासीन्याचे मनावरचे दाट आवरण कवीला जाणवते.

मावळले ऊन, मळभ आले दाटून
ओंजळीमधली फुले गेली कोमेजून...
मावळले ऊन, आले मळभ दाटून
औदासीन्य जसे एकाकीपणातून......

स्वप्नांच्या पाऊलवाटा धुळीत मिळालेल्या असतात. जगण्याच्या प्रवासात वेगळीच दिशा येते. मनातले कल्लोळ निवळून डोह काळोखा बनत जातो. उदास होताना स्वतःच्याच मनाची तो समजूत घालू लागतो. दुःख जेव्हा संपूर्ण मनाचाच ताबा घेते अशा वेळी केव्हा तरी संपायचे असते असे म्हणून मनाची समजूत तो घालायला लागतो. पाय अस्थिर होतात. तोल सावरेनासा होतो. डोळ्यांतले दुःख निबर होते आणि आयुष्याच्या पंखावर सुखदुःखांचे व्रण उमटतात. ही जी सार्वभौम उदासीनता आहे तिचा विविधांगी संदर्भ कवितांतून उलगडत जातो. अनुभवाकडे वेगळ्या जाणीवपूर्वकतेने बघितले जाते. यातून अनुभवायला मिळणाऱ्या शब्दरूपाकडे आणखी भिन्नपणे पाहिले जाते. त्यामुळेच अनुभव आणि शब्द, त्यांच्यातला काही क्षणांचा अवधी, अनेक वेळा शब्दच सुस्त वाटत असतात. अनुभव मनाच्या मुशीतून तावूनसुलाखून निघावा लागतो आणि तशा स्थितीत तो शब्दांत पकडणे ही घटना वैशिष्टचपूर्ण असते. कारण—

" मूळ अनुभव शब्दात आणताना
आधीच
अर्धीअधिक उत्कटता
उचमळून खाली वाया जाते..."

या गोष्टीची अत्यंत महत्त्वपूर्ण जाणीव या कवीस आहे. कुठं तरी अस्पष्टसा आशावाद येतो. जगण्यातले सौंदर्य त्याला सापडते, दवबिंदूंचे सुखावणारे नृत्य तो पाहतो.

मनातल्या गहनगूढ भावनांची ही डोह-अवस्था ह्या कवितांतून सुंदरपणे व्यक्त होते. जे शब्दात सांगता येणार नाही ते मनाचे धागेदोरे, मूडस् शब्दात सांगणं हेच या कवितेचं यश आहे असे म्हणावेसे वाटते.

शेवटी एक महत्त्वाचे वैशिष्टच म्हणजे 'उपहार' ही या काव्यसंग्रहातील अठरा भागांची दीर्घ कविता. मनाचा एक आलेख कवी काढू लागतो. मानलं तर ही प्रेमकविता. प्राणांचेच प्रत्यक्ष समर्पण, भरभरून ! तिचा सहवास त्याच्या श्वासातून दरवळतो. वासनेचा अग्नी आपल्याच अश्रूंनी तो विझवतो आणि खुपत रहाते ती अबोध मनातील व्यथा. तरीही तो बांधला जातो; पण याचा सूत्रधार कोण ? वेदनेच्या तरंगात, हृदयाच्या स्पंदनात मुक्त मनाने 'पंखगीत' तो गातो. एक पूर्णपणे अंतर्मुख करत जाणारी अर्थघन कविता म्हणून ती विशेषत्वाने भावते.

—प्रतिमा केसकर

**मनाचे डोह**
कवी—गोविंद कुलकर्णी
स्वयंप्रभा प्रकाशन
किंमत १६ रुपये.

## अस्सल ग्रामीण !

श्री. संपतराव जाधव यांची 'कौल' ही पहिलीच कादंबरी. सबंध कादंबरीत एकही शहरी वळणाचा शब्द न लिहिता ग्रामीण भाषेत ग्रामीण विभागाचे विदारक चित्र ते कथानक गुंफीत असताना सांगून जातात.

कथानक छोटेसे आहे. एका लहानशा खेडेगावातल्या धनगर कुटुंबातील ही कथा, चाळीस वर्षं अत्यंत गरिबीत संसार चालविलेल्या एका स्त्रीच्या तोंडून संपतरावांनी वाचकांसमोर मांडलेली आहे.

ह्या स्त्रीच्या घरधन्याला (म्हाताऱ्याला) असाध्य रोग जडलेला असतो व डॉक्टरांनी त्याला मिरजेला न्यायला सांगितलेले असते. ह्या अडाणी, देवभोळ्या व अत्यंत गरीब कुटुंबापुढे हे एक मोठे संकटच उभे ठाकते. कशी तरी जमवाजमव करून, मनात भीती धरूनच ही वृद्ध स्त्री आपल्या घरधन्याला

मिरजेला दवाखान्यात नेते. नेतानाचे प्रवासाचे चित्रण, दवाखान्यात त्याना मिळालेली संमिश्र वागणूक व शेवटी त्या जोडप्याचा घडलेला शोकान्त ! आणि छोटीसी कादंबरी संपते.

ग्रामीण विभागातल्या दारिद्र्याची पार्श्वभूमी लेखकाने परिणामकारकरीत्या उभी केली आहे. दारिद्र्याबरोबरच अज्ञान, अंधश्रद्धा, विज्ञानाबद्दलची साशंकता यांनी घडविलेल्या ग्रामीण स्त्रीचे मनोविश्व लेखक सांगून गेला आहे.

अगदी लहान वयातच, समज आली नसतानाच होणाऱ्या बालविवाहांच्या रूढीनुसारच ह्या स्त्रीचेही लग्न होते. नंतर उभे आयुष्य दारिद्र्यात, काबाडकष्टात व संकटांनी ग्रासलेले. अज्ञानामुळे व गरिबीमुळे निर्माण झालेल्या अगतिकतेमुळे अंधश्रद्धेला बळी पडणाऱ्या समाजाचे चित्रण 'कौल'मध्ये दिसते.

ह्या कुटुंबाचे जग अगदी छोटेसे आहे. घर, शेत व कसाबसा रेटत असलेला ससार ! ह्यातच अशी लाखो कुटुंबे गाजलेली असतात की जगातल्या सुधारणा, शोध, प्रगती याकडे ही माणसे भयचकित नजरेने पहातात. त्या पहाण्यात कमालीची साशंकता असते. अशी साधीभोळी, अंधश्रद्धाळू माणसे 'कौल'-मध्ये उभी करण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

आपल्या अत्यंत खडतर जगाविषयी वाटणारी आपुलकी, जगण्याची धडपड त्यातून ते विज्ञानाने दिलेली आश्वासकता स्वीकारण्याचा प्रयत्न करताना दिसतात. ग्रामीण जीवनातील मानसिक दास्य, त्यामुळे निर्माण होणारी अगतिकता व होरपळ, एकीकडे विज्ञानाने दिलेली आश्वासकता आणि या आश्वासकतेला पराभूत करणारी जबर अंधश्रद्धा यातील द्वंद्व पकडण्याचा प्रयत्न जाधवांनी परिणामकारकरीत्या केला आहे.

ह्या दशकात ग्रामीण साहित्याला चळवळीचे स्वरूप आल्यापासून ग्रामीण साहित्याने चागलेच बाळसे धरलेले आहे. ग्रामीण साहित्य म्हणजे ग्राम्य बोलीत लिहिलेले व खेड्याची पार्श्वभूमी असलेले साहित्य अशी ग्रामीण साहित्य चळवळीची कल्पना नाही. ग्रामीण कादंबरी म्हणजे केवळ खेड्यात राहणाऱ्या माणसांच्या व्यक्तिरेखांची भाऊगर्दी नव्हे की, ग्रामीण बोलीभाषेचा कंटाळा येण्याइतपत अनिबंध व ठसठशीत वापर नव्हे. ग्रामीण भागातील अविकसितपणा, प्रचंड दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धा यांचे वास्तव चित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य. जीवघेण्या परंपरा आणि रूढींच्या चरकात सापडलेल्या ग्रामीण मनाचे अगतिकत्व ग्रामीण कादंबरीचे एक वैशिष्ट्य ठरावे. व्यक्तिविकासासाठी संधी शोधणाऱ्या किंवा जवळ येऊ इच्छिणाऱ्या विरुद्ध लिंगी दोन व्यक्तींच्या मार्गातल्या टणक भिंतीचे पदर उलगडून दाखविणारे साहित्य हे ग्रामीण साहित्य ठरावे. ग्रामीण भागातल्या रूढी, परंपरा, जातिव्यवस्था, गरिबी, अज्ञान; अंधश्रद्धा हे भारतीय व्यवस्थेने जोपासलेले एक व्यंग आहे व हे व्यंग नेमकेपणाने पकडण्याचा प्रयत्न 'कौल'मध्ये दिसतो.

'कौल'मधील व्यक्तिरेखा साध्याभोळ्या आहेत, स्वतःमध्ये हरवून जाणाऱ्या आहेत व दैवाधीन बनल्यामुळे कमालीच्या अस्वस्थ पण आहेत.

ग्रामीण विभागातील विविध अंगांची सूक्ष्म जाण आणि वास्तवाचे कमालीचे भान असलेल्या या लेखकाची ही पहिलीच कादंबरी आहे, हे वाचक क्षणभर विसरून जातो हेच या कादंबरीचे मोठे यश आहे.

—भरत अवचट

कौल
ले. संपतराव जाधव
रणजित बुक स्टॉल, कोल्हापूर
कि. १२ रु. । पृ. ७६.

---


**— नवीन दाखल झालेली पुस्तके —**

१. वपुर्झा—व. पु. काळे
२. अघोरी—( कादंबरी ) बाबुराव बागुल
३. निरामय कामजीवन—डॉ. विठ्ठल प्रभू
४. माती आणि आदेउश—वि. ज. बोरकर
५. विनोद : एक व्याख्यान—अ. वा. वर्टी

*

1. **Years of Upheaval**—(Further memoirs of the latter-day Chanakya )—Henry Kissinger
2. **The Last Days of America**—( Bestseller Financial thriller )—Paul E. Erdman
3. **Camus**—( Standard & definitive biography )—Herbest R. Lottman
4. **Maria Calla's**—( Biography of the famous singer )—Arianna Stassinopoulos

**दि फिनिक्स लायब्ररी**
७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.


---

## सर्चलाइट

# कोलंबिया आणि आपण....

अमृत पुरंदरे

कोलंबिया म्हणजे काय प्रकार आहे हे आता बहुतेक सर्वांना माहीत असेलच. हे एक प्रचंड मोठे ' विमान ' असून ते अंतराळात जाऊन सुखरूप परत येते व पुन्हा पुन्हा वापरता येते. अंतराळातून पुन्हा वातावरणात प्रवेश करताना जी प्रचंड उष्णता निर्माण होते त्या उष्णतेला टिकतील अशा काही ' टाइल्स ' या विमानाला बसवल्या आहेत. या उष्णतारोधक तर आहेतच; परंतु वजनानेसुद्धा हलक्या आहेत.

' अमेरिका तंत्रज्ञानात भारताच्या किती तरी वर्षे पुढे आहे ' किंवा 'अमेरिकेची बरोबरी करायला भारताला कधीही जमणार नाही (तंत्रज्ञानाबाबत)' असे किंवा यासारखे उद्गार आपण नेहमीच ऐकतो. अमेरिकेच्या अंतराळातल्या तसेच इतर क्षेत्रातल्या 'उड्या' बघून वरील विधाने फार चूक आहेत असेसुद्धा मी म्हणत नाही. त्यांची अचूकता, प्लॅनिंग, नवीन शोध, संशोधन याबाबत त्यांचे कौतुकच वाटते; परंतु अशा अचूक अमेरिकन लोकांनी जर काही चुका केल्या तर एक आसुरी महाराष्ट्रीय आनंद मला तरी मिळतो. म्हणजे आपणच चुकलो नाही, आपल्याबरोबर अजून कोणी आहे याचा आनंद किंवा समाधान किंवा नुसते बरे वाटणे ही एक मानवी प्रवृत्ती आहे आणि ती महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सापडते असे मला वाटते.

आपण इन्सॅट-१ सोडले पण त्याचा सौर पंखा उघडला नाही, अॅपलच्या बॅटरीमध्ये विघ्न आले, भास्करची भ्रमणकक्षा थोडी चुकली, रोहिणी अग्निबाण समुद्रात पडला इ. गोष्टी काही बरोबर घडल्या नाहीत; पण जेव्हा मी कोलंबियाच्या दुसऱ्या उड्डाणाचा वृत्तांत वाचला तेव्हा मात्र मला वर म्हटल्याप्रमाणे ' हम भी कुछ कम नही ' असे वाटले. आता तो वृत्तांत काय होता हे वाचण्याची तुम्हाला उत्सुकता लागली असेल, मी ती फार ताणत नाही.

...मुळात प्रथम ठरलेल्या वेळी कोलंबियाचे दुसरे उड्डाण होऊ शकले नाही. कारण त्याच्या पहिल्या उड्डाणाच्या वेळी ज्या ' टाइल्स ' खराब झाल्या होत्या त्या मुळात बदलल्या गेल्या नाहीत. हे काम ' ऑरबिट प्रोसेसिंग लॅब, केनेडी एअरपोर्ट ' येथे चालू होते. जवळजवळ १५०० टाइल्स बदलाव्या लागल्या. त्यामुळे १ महिना आणि १ आठवडा उशीरा कोलंबिया उड्डाणाला तयार झाले.

उड्डाणाच्या आधी म्हणजे मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात, यानाचा ' ऑरबिट फ्युएलटॅंक ', ' हायड्राझिन ' या रसायनाने एक व्हाल्व्ह बिघडला व त्यामुळे कित्येक गॅलन हायड्राझिन (हे अतिशय दाहक (करोझिव्ह) रसायन आहे) वाहून गेले. त्याच्याबरोबर काही ' टाइल्स ' पण वाहून गेल्या व उड्डाणाला पुन्हा जो विलंब झाला तो नोव्हेंबरपर्यंत.

४ नोव्हेंबरला ' काउंट डाउन ' चालू झाले व फक्त ३१ सेकंद उरलेले असताना द्रवरूप प्राणवायूच्या टाकीतले प्रेशर एकदम कमी झाल्याचे लक्षात आले. खरं म्हणजे हे कमी प्रेशरसुद्धा ५॥ दिवसांसाठी पुरेसे होते, त्यामुळे शास्त्रज्ञांनी तशी सूचना कॉम्प्युटरला देण्यासाठी घाई केली; परंतु तेवढ्यात कॉम्प्युटरने ' काउंट डाउन ' थांबवले. यानात बसलेले दोन्ही वैमानिक (बिचारे) परत बाहेर आले.

याच वेळेला हायड्रॉलिक पॉवर सप्लाय युनिटमध्ये तेलाचा दाब अचानक वाढला. हा दाब खराब प्रतीचे मेणमिश्रित तेल वापरल्यामुळे आला आहे हे लक्षात आल्यावर सर्व तेल पुन्हा बदलण्यात आले. मेणामुळे ऑइल-फिल्टर्स चोक झाली होती. ती साफ करावी लागली. एक आठवडा अजून उशीर !

निक यंत्र बिघडल्याचे लक्षात आले. हे यंत्र सर्व जमवलेली माहिती एकत्र करून पृथ्वीवर पाठवते. पुन्हा ' काउंट डाउन ' थांबले. बिचारे अंतराळवीर यानातून पुन्हा जमिनीवर परतले. सुदैवाने असेच एक जादा यंत्र तिथेच उपलब्ध होते. ते बसवण्यात आले; परंतु हे यंत्रसुद्धा काम देईना ! त्यामुळे घाईघाईने कॅलिफोर्निया येथून तिसरें यंत्र आणण्यात आले. हे यंत्र तिथे बांधत असलेल्या दुसऱ्या एका अंतराळयानातून काढण्यात आले. शेवटी नोव्हेंबर १२ या दिवशी सर्व अडचणींवर मात करून कोलंबियाने उड्डाण केले; परंतु या आनंदातून शास्त्रज्ञ स्थिर होण्याच्या आतच, यानातील तीनपैकी एक फ्युएल-सेल बिघाडला असल्याचे लक्षात आले. या सेलचा उपयोग प्राणवायू आणि हैड्रोजन एकत्र करून पाणी आणि वीज निर्माण करण्यासाठी केला जातो; याच्यामध्ये ' सोडियम हायड्रॉक्साइड ' किंवा ' कॉस्टिक सोडा ' या अल्कलीचा उपयोग केला जातो. पाणी आणि अल्कली काही कारणाने एकत्र होऊ लागल्याने यंत्राने लाल दिवा दाखवला होता. याचा परिणाम म्हणून हा सेल बंद ठेवावा लागला. तसेच प्राणवायू आणि हायड्रोजन यांचे ज्वालाग्राही मिश्रण तयार झाल्याची शक्यता निर्माण झाली. साडेपाच दिवसांचा प्रोग्राम एकदम दोन दिवसांवर आणावा लागला.

या दुसऱ्या फेरीत प्रथमच कॅनेडियन गव्हर्नमेंटने दिलेल्या ' हंड्रेड मिलियन डॉलर हुक ' (१०,०००,००,०००) रु. ची परीक्षा घेण्यात आली. ही मात्र व्यवस्थित पार पडली. हा हुक माणसाच्या हातासारखा असून त्याला खांदा, कोपर, मनगट आणि तळहाताच्या सांध्यासारखे सांधे आहेत. याची लांबी ५० फूट असून भविष्यात अंतराळात अनेक कार्यांसाठी याचा उपयोग होऊ शकेल.

...कोलंबिया उतरले तेव्हा सुद्धा हवामान खराब असल्यामुळे त्याला दोन तास उशीर झाला. (सध्या अमेरिकेत कोलंबियावर चाललेल्या प्रचंड खर्चाबद्दल जनतेकडून अतिशय तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत.)

एवढे सगळे झाल्यावर दुसऱ्यांदा 'काउंट डाउन' सुरू झाले; परंतु या वेळेला 'मल्टिप्लेक्सर डी मल्टिप्लेक्सर ' या नावाचे एक इलेक्ट्रॉ-

## पाणबुडी आणि संदेशवहन

नेहमी बदलत्या काळाबरोबर युद्धतंत्र सुद्धा बदलत जाते. ज्या बंदुका दुसऱ्या महायुद्धात वापरल्या गेल्या त्याच्याकडे हल्ली बघितले सुद्धा जात नाही. दहा वर्षांपूर्वी अत्याधुनिक म्हणून उदयाला आलेली विमाने आता निरुपयोगी ठरत आहेत. मिझाइल्सना थाबवण्यासाठी अँटीमिझाइल्स वापरले जात आहेत. हवेतील व जमिनीवरील युद्धाला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे; परंतु त्यामुळे समुद्रावरील युद्धाचे महत्त्व मात्र कमी झालेले नाही. उलट नवनवीन बोटी, अस्त्रे व पाणबुड्यामुळे समुद्रावरचे वर्चस्व कोणाकडे रहाते याला फार महत्त्व प्राप्त झाले आहे.

पाणबुडी हा प्रकार उदयाला आल्यापासून त्याला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे. एखाद्या ठिकाणी पाण्याखालून गुपचुप जाऊन अनानक हल्ला करण्यासाठी; समुद्रातल्या युद्धनौकांवर पाण्यातून हल्ला करण्यासाठी, गुप्त हालचालीसाठी त्यांचा उपयोग करण्यात येतो; परंतु पाणबुडीला कायम पाण्याखाली रहाता येत नाही. काही कारणांसाठी पाणबुडीला समुद्राच्या पृष्ठभागाजवळ यावेच लागते. उदाहरणार्थ संदेशवहनासाठी एकदा का पाणबुडी पृष्ठभागावर आली की तिचा वेध घेणे सध्या अजिबात अवघड नाही.

संदेशवहन हे सर्वसाधारणपणे रेडिओलहरींच्या रूपाने केले जाते. या रेडिओलहरी हवेतून कितीही अंतर विनासायास जाऊ शकतात; परंतु त्याचा एक दोष असा की, त्या पाण्याच्या खाली जाऊ शकत नाहीत. साध्या रेडिओलहरी त्यांची ताकद पाण्यामध्ये गमावतात. कारण त्या एका आवर्तनामध्ये (cycle) दोनदा दिशा बदलतात. त्यामुळे पाण्यातले इलेक्ट्रॉनस् कंप पावू लागतात. ही ऊर्जा पाण्यात पटकन शोषली जाते व त्यामुळे रेडिओलहरी पाण्यात तीस ते तीनशे फुटांच्या खाली जाऊ शकत नाहीत. सध्या संदेशवहनासाठी पाणबुड्या खोल समुद्रातून तरंगणारी अँटेना सोडतात. ती पृष्ठभागाजवळ आली की संदेशवहन सुकर होते; परंतु हल्लीच्या सॅटेलाइटच्या युगात ही तरंगणारी अँटेनासुद्धा पाणबुडीची नेमकी जागा दाखवू शकते. त्यामुळे शास्त्रज्ञ नवीन संदेशवहनमार्गाच्या शोधात होते. नवीन तयार झालेल्या मिझाइल्स (अॅटॉमिक) पाणबुड्यांना सतत आपल्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधून असावे लागते. कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी अतिशय वेगाने हालचाल करण्याची त्यांच्यावर जबाबदारी असते. त्यामुळे त्यांना नेहमी समुद्रपृष्ठभागावर ठेवणे हे धोक्याचे होऊन बसते. अशा परिस्थितीत काही तरी वेगळी उपाययोजना करण्याच्या मागे शास्त्रज्ञ होते. आणि...

त्याना उपाय मिळाला. तो म्हणजे E.L.F. E.L.F. म्हणजे Extreamly Low Frequency. लो फ्रीक्वेन्सी म्हणजे किती कमी तर जवळजवळ ३० ते ३००० सायकल्स सेकंद. जेवढी फ्रीक्वेन्सी कमी तेवढी लहरीची लाबी (वेव्ह् लेंग्थ) जास्त या लहरीची लाबी १५०० ते ३००० मैल एवढी प्रचंड असते! E. L. F. पाण्यात बरीच खोल जाऊ शकते. कारण तिच्यामध्ये ऊर्जा कमी असते. त्यामुळे ती शोषली जाण्याचा फारसा प्रश्नच येत नाही. तिचे हवेतून व पाण्यातून उत्तम वहन होते. त्याचप्रमाणे जर का एखादा अणुस्फोट झाला तरी त्याचा या लहरीवर काहीही परिणाम होत नाही, हा तर एक अतिशय मोठा फायदा आहे. कारण सर्वसाधारण लघुलहरी (Short waves) व मध्यमलहरी (Mediam waves) अणुउत्सर्जनामुळे तयार होणाऱ्या विद्युतभारित वातावरणातून जाऊ शकत नाहीत.

परंतु या फायद्यांबरोबरच काही तोटेसुद्धा आहेत. एक म्हणजे या लहरीद्वारे एखादा संदेश देण्यासाठी फार वेळ लागतो. उदा. एका बारा अक्षरी वाक्याच्या प्रक्षेपणाला १ तास लागतो. परंतु याच्यावर तोडगा म्हणून 'कोडवर्ड' वापरता येऊ शकतात. काही छोट्या छोट्या सांकेतिक संदेशांद्वारे महत्त्वाच्या सूचना पटकन देता येऊ शकतात. उदा. हल्ला करा, 'लपून बसा' 'खोल समुद्रात जा' इ.

दुसरी एक मोठी अडचण म्हणजे या लहरीच्या प्रक्षेपणासाठी लागणारी प्रचंड लांब अँटेना. (जवळजवळ ३००० मैल लाब) एवढी अँटेना बसवणे म्हणजे प्रचंड खर्चाचे, तसेच संरक्षणाच्या दृष्टीने जिकिरीचे काम होते. शास्त्रज्ञांनी याच्यावरसुद्धा तोडगा शोधून काढला. त्यांनी जमिनीचाच अँटेना म्हणून उपयोग केला.

अँटेना जमिनीशी जोडल्यामुळे अगदी थोड्या शक्तीच्या लहरीच्या निर्मितीसाठी प्रचंड दाबाची वीज वापरावी लागते. कारण जमिनीचा विरोध प्रचंड आहे. काही लाख वॅट शक्ती वापरून फक्त सहा वॅटएवढ्या शक्तीच्या लहरी (जी शक्ती आपल्या सर्वसाधारण रेडिओलहरीची असते) मिळू शकतात.

या योजनेला २३१ मिलियन डॉलर्स एवढा खर्च अपेक्षित आहे. अर्थात या प्रचंड खर्चासंबंधीसुद्धा अमेरिकन जनता नाराज आहे. सध्या सॅटेलाइट, जमिनीवरची केन्द्रे, सतत उडणारी संदेशवाहक विमाने, जहाजे यांच्यातर्फे संदेशवहन व्यवस्थित चालत असताना E. L. F. वरचा खर्च बेकार आहे असेच कित्येक लोकांचे मत आहे. तसेच E. L. F. चा संदेश घेण्यासाठी पाणबुडीवर सुद्धा शेपटीसारखी लांबच लांब अँटेना बसवावी लागते. त्यालासुद्धा भयंकर खर्च येतो. असो.

सध्या पाणबुडीला संदेश देण्यासाठी आणखी एक नवीन यंत्रणा उभारली जात आहे. ती म्हणजे लेसर किरणांद्वारे संदेशवहन करण्याची.

निळा किंवा हिरवा प्रकाश पाण्यात बराच खोलवर जाऊ शकतो. त्यामुळे निळ्या किंवा हिरव्या लेसर किरणाचा उपयोग करून खोल पाण्यात संदेश देणे कितपत फायदेशीर होईल याचा अभ्यास सध्या चाललेला आहे. जमिनीवरून सॅटेलाइटला लेसरच्या छोट्या छोट्या खंडित किरणानी संदेश पाठवायचा व तो संदेश सॅटेलाइटकडून परत पृथ्वीवरील इच्छित स्थळी सोडायचा अशी मूळ कल्पना आहे. ९००० फूट ढगाच्या ढिगामधून अशा प्रकारचा संदेश यशस्वीरीत्या पाठवल्याचा अमेरिकेचा दावा आहे तसेच...असो...

फार झाले...बघायचे काय काय होतेय ते!!

□

रेखा देशपांडे



# वहीदा रहमानची निरुपा रॉय होणार काय ?



काही दिवसांपूर्वीच 'सवाल' पाहिला. कोणत्याही मोठ्या निर्मात्याच्या, मोठ्या बजेटच्या आणि मल्टीस्टार चित्रपटाच्या निर्मितीच्या सुरुवातीपासून ते तो प्रदर्शित होईपर्यन्तच्या कालखंडात जी एक हवा निर्माण झालेली असते तशी हवा 'सवाल'ने ही निर्माण केलेली होतीच. संजीवकुमार, शशि कपूर, पूनम धिल्लाँ, रणधीर कपूर, एवढंच नव्हे तर वहीदा रहमान ! त्या वेळेस आशादायक वाटत असलेली स्वरूप संपत. ह्या यादीतले काही स्टार, तर काही अभिनेते विशेषतः संजीव आणि वहीदा – अभिनयातले बंदे रुपये. निर्माता यश चोप्रा आणि दिग्दर्शक रमेश तलवारने ह्यापूर्वीच्या आपल्या दोन्ही चित्रपटांतून आपल्या दिग्दर्शनकौशल्याची चुणुक दाखवलेली – 'दूसरा आदमी' आणि 'बसेरा' मधून. ह्या संपूर्ण पार्श्वभूमीवर 'सवाल'ची हवा निर्माण होण्यात गैर काहीच नव्हतं.

'सवाल'ची श्रेयनामावली पडद्यावर झळकू लागली आणि पहिलंच नाव आलं – वहीदा रहमान. दुसरं संजीवकुमार. साहजिकच वाटलं वहीदाची एखादी लाजवाब भूमिका पहायला मिळणार आता आणि सपशेल निराशा झाली. निर्मात्याने फक्त वहीदाच्या सीनिऑरिटीचा विचार करून श्रेयनामावलीत तिचं नाव पहिलं आणि तेही दणदणीत अक्षरात दिलं होतं. संपूर्ण चित्रपटात संजीवच्या पत्नीचं एक पात्र असतं, एवढंच आणि हे काम वहीदाला मिळालं होतं म्हणून ती तिथे होती इतकंच. त्या भूमिकेसाठी वहीदाची खरोखरीच काही गरज होती का? गरज नव्हतीच तर निर्माता–दिग्दर्शकाने एवढ्या मोठ्या प्रतिभेला असं वाया का दवडावं – हे प्रश्न मनात उद्भवलेच. वहीदाची हीच ट्रॅजेडी 'नमकहलाल' मध्ये देखील झालेली पाहिली.

ह्यापेक्षा वहीदा सरळ पाहुणी कलाकार म्हणून का चमकली नाही ह्या भूमिकांतून ? निदान वहीदाच्या नावाचं, लौकिकाचं थोडं justification तरी मिळालं असतं त्यातून.

अर्थात आजकाल 'गेस्ट ॲपियरन्स', 'फ्रेंडली ॲपियरन्स' आणि 'स्पेशल ॲपियरन्स' हे शब्द इतके स्वस्त आणि लवचिक झाले आहेत की त्यातूनही एखाद्या मोठ्या कलाकाराची उपस्थिती Justify होत नाही. पूर्वी एखाद्याच दृश्यात एखादा मोठा कलाकार क्षणभर दिसून जायचा – प्रेक्षकांना एक आश्चर्याचा सुखद धक्का देऊन जायचा. फार पूर्वीचं नको तरी 'कोशिश'मध्ये अचानक संजीव आणि जया फोनवर वाट्टेल तो नंबर फिरविण्याचा खेळ करीत असता अचानक चक्क दिलीपकुमारचा नंबर लागणं. 'छोटी–सी बात'मध्ये अशोककुमारकडे स्मार्ट बनायला गेलेल्या अमोलला अचानक अमिताभचं दर्शन होणं. तसंच हिचकॉकसारखं स्वतः दिग्दर्शकानं स्वतःच अचानक पडद्यावर दर्शन देणं. (आपल्याकडे बासु चॅटर्जी किंवा 'बूटपॉलिश'मध्ये जरा

आठवा – बेलू आणि भोलाला (बेबी नाझ आणि मा. रतनकुमार) लोकल गाडीत एक राज कपूरसारखा माणूस दिसतो. तो प्रत्यक्षात राजच होता.)

ह्या अशा अॅपियरन्सेसमध्ये त्या नावाचा दबदबाच इतका मोठा असायचा की त्यांचं नुसतं दिसणंदेखील मौल्यवान वाटायचं. एखादी अगदी छोटीशी पण वैशिष्ट्यपूर्ण भूमिका असली, तर ते आणखीच अप्रूप वाटायचं.

पण हल्ली जवळजवळ प्रत्येकच चित्रपटात दोन गेस्ट अॅपियरन्सेस, दोन–तीन फ्रेंडली अॅपियरन्सेस आणि तीन–चार स्पेशल अॅपियरन्सेस अशी सगळी वर्गवारी हजर असते. त्याचे रोलही अतिसामान्य असतात. ह्या दोन गोष्टींमुळे त्या मोठ्या नावाचं कौतुक कमी होतंच. शिवाय कित्येक वेळा एखादं जेमतेम परिचयाचं झालेलं नावदेखील ह्या वर्गवारीत बसलेलं आढळतं. स्टारपदासाठी अजून ज्याना खूप वाटचाल करायची आहे, किंबहुना आत्ता कुठे पहिलं पाऊल उचललं आहे अशांची नावंदेखील फ्रेंडली आणि गेस्टमध्ये येतात. अगदी ह्याच 'सवाल'मध्ये काल-परवाच दाखल झालेल्या स्वरूप संपतचा स्पेशल अॅपियरन्स आहे. परवाच एकदा गीता खन्नाने सांगितलं, अमुक एका चित्रपटात माझा गेस्ट अॅपियरन्स आहे. गीता खन्ना कोण ? – म्हणून कुणी पटकन विचारलं तर दोष विचारणाऱ्याचा मुळीच नाही.

मग ही नव्या कलाकाराला पैसे न देता रोल करून घेण्याची छान कल्पना आहे नाही ? पडद्यावर चेहरा दिसल्यामुळं तो विशिष्ट नवोदित नट प्रेक्षक–निर्माते–दिग्दर्शकांच्या, म्हणजेच अन्नदात्यांच्या नजरेसमोर राहतो, हा त्या नटाचा फायदा. पैसे न मोजता एक रोल पदरात पडला हा निर्मात्याचा फायदा व 'गेस्ट अॅपियरन्स'च्या गोंडस नावामुळं मोठा सन्मान झाल्यासारखं वाटतं, मैत्रीचे संबंध जुळतात ते वेगळंच ! पण ह्या सर्व प्रकारामुळं व्हेटेरन (veteran) कलाकारांच्या खऱ्या गेस्ट अॅपियरन्सची किंमत मात्र कमी होते.

हाडाच्या कलाकाराला चॅलेंजिंग रोल मिळत रहावेत असं वाटणं साहजिक आहे आणि तसा तो मिळाला की त्याला होणारा आनंद काही वेगळाच असतो. 'नमकीन'-मधल्या मुजरा नृत्याच्या चित्रीकरणाच्या वेळी वहीदा इतकी एक्साइट झाली होती की, तिची ही एक्साइटमेंट पाहणं हा देखील एक आनंद होता. 'गाइड' मधल्या नर्तकीची रोझीची आणि 'तीसरी कसम' मधल्या नौटंकीवाल्या हिराबाईची भूमिका ह्या तिच्या आवडत्या भूमिकांपैकी. त्यात नृत्यालाही चांगला वाव होता. कित्येक वर्षांनंतर वहीदा 'नमकीन' साठी पूर्वीच्याच जोषात मुजरा-नृत्य पेश करीत होती. पूर्वीच्याच उत्सुक उत्साहाने दोन शॉट्समधल्या रिकाम्या वेळातही सेटच्या उकाड्यातच बसून राहात होती; नृत्यदिग्दर्शक गोपीकृष्णबरोबर गप्पाटप्पा मारीत होती. प्रत्येक शॉटनंतर मेकअपरूममध्ये धाव घेण्याचा नखरा तीही करू शकली असती; पण एक तर ते स्वभावात नाही आणि 'नमकीन' मधल्या भूमिकेचंही तिला मोठं अप्रूप वाटत होतं.

## हे तिला कळत नसेल ?

'म्हाताऱ्या जुगनीबाईचा हा फ्लॅशबॅक आहे. मनापासून आवडावी अशी भूमिका आहे ही. बस, आत्ता, अ णखी काहीच सांगत नाही. आत्ता काही विचारू नकोस. प्रथम 'नमकीन' पुरा तर होऊ दे.' –एखाद्या नवख्या माणसाला वाटावी तशी उत्सुकता ओसंडत होती वहीदाच्या वागण्यातून ह्या भूमिकेविषयी. 'नमकीन' बॉक्सऑफिसवर फारसा चालला नसला तरी त्यातल्या अभिनयाला दाद मिळाल्याशिवाय राहिली नाही. वहीदाच्या अभिनयालाही दाद मिळाली. त्यामुळे ह्याच सुमारास आलेले 'नमकहलाल' आणि 'सवाल' पाहिल्यानंतर वाटलं वहीदानं दोन–तीन वर्षांतून एकच का होईना पण फक्त 'नमकीन' सारखा एखादाच छान रोल करावा. चरित्र अभिनेत्रीच्या किंवा गेस्ट अॅपियरन्सच्या नावाखाली वाट्टेल तो रोल घेऊन वहीदा रहमान ह्या नावाची किंमत एवढी कमी करू नये.

हे तिचं तिला कळत नसेल का ? की खरोखरी अर्थार्जनच आवश्यक असेल ? 'तिला काय कमी आहे'–हे आपण मध्यमवर्गीय बोलतो ते तुलनेने. आपल्या मध्यमवर्गीय तराजूत फिल्मी कलाकारांचं पारडं आपलं जडच राहणार; पण त्यांच्या स्वतःच्या तराजूत ? अर्थात आर्थिक सिक्युरिटीची ही गोष्ट वहीदा कबूल करणार नाही

पडद्यावर सतत दिसत राहण्याचं व्यसन न सुटणं–हेही कारण संभवतं. लग्नानंतर दोन–अडीच वर्षं वहीदा चित्रपटात दिसेनाशी झाली होती. त्याबद्दल बोलताना 'नमकहलाल'च्या सेटवर तिनं सांगितलं होतं, 'चित्रपटसंन्यास वगैरे मी घेतला नव्हता. त्याचबरोबर चित्रपटातून काम करण्याची गरज भासते आहे असंही नाही. लग्न, लग्नानंतर सुहेल व कश्वी या दोन मुलांचे जन्म–ह्यामुळे ही गॅप पडली. ह्यानंतर यश चोप्रांनी 'कभी कभी' मध्ये काम करणार का म्हणून विचारलं. मैत्रीचे संबंध आहेत. नाही म्हणवत नाही. आजही असेच दोस्तीमुळ रोल करीत आहे.

खरं आहे. मैत्रीमध्ये नाही म्हणणं जमत नसेलही ! पण एवढ्या मेहनतीने उभ्या केलेल्या देखण्या करिअरचा विचार ह्याच दोस्तानी नको का करायला ? त्या करिअरला शोभण्यासारखी चॅलेंजिंग भूमिका तुमच्याजवळ असेल तर जरूर बोलवा. एरवी न बोलावताही मैत्री टिकू शकते.

पण छे ! मैत्रीपेक्षा इथे व्यवहारच श्रेष्ठ ठरतो. नगण्य भूमिकेत बडा स्टार मिळत असेल, परवडत असेल आणि त्यायोगे आपल्या चित्रपटाची किंमत वाढत असेल तर निर्माता ही संधी कशाला सोडील? बडी नावं मिरवण्याच्या ह्या अहमहमिकेमुळंच जिथे छोटं नाव चालू शकतं तिथे बडे निर्माते मोठी किंमत मोजून बडं नाव आणीत असतात.

मनमोहन देसाईंनी 'देशप्रेमी' मध्ये शर्मिला टागोरच्या नावाचा असाच गैरवापर केलेला आहे. एवढंच नव्हे तर तिला कुष्ठरोगी बनवून, थोडा वेगळेपणा निर्माण करून प्रेक्षकांच्या डोळ्यात धूळफेकदेखील केलेली आहे.

सुधा चोप्रा–एक प्रतिभावान अभिनेत्री. 'घरौंदा' मध्ये तिनं छान रोल केला होता. 'त्रिशूल' मध्ये तिला आपलं उगीचच संजीवची आई बनविण्याचा खटाटोप केलाय. जो काही अभिनय त्या रोलमध्ये करायचा होता त्यासाठी सुधाला वाया दवडण्याची जरुरी होतीच का, असा प्रश्न पडतो. गीता सिद्धार्थसारख्या संवेदनाशील अभिनेत्रीलाही जेव्हा

MANOOS ( Marathi Weekly ) 1.50 Paise Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11 )

अगदी फालतू रोल दिले जातात, तेव्हाही ह्याच प्रश्न मनात येतो. सुधा ह्या प्रश्नाचं उत्तर देताना म्हणते, 'चरित्र भूमिकांसाठी बड्या निर्मात्यांना अधिक पैसा देऊन बडे कलाकार मिळत असले तर ते आम्हाला कशाला विचारतील ? मग आमच्या वाट्याला येतात त्या त्यातून उरलेल्या नगण्य भूमिका. बड्या सेटअपमध्ये राहायचं असेल तर ही तडजोड आम्हाला करावीच लागते. छोटे निर्माते त्या भूमिकांसाठी आम्हाला घेतात. कारण त्यांना बडी नावं परवडत नाहीत; पण ह्या छोट्या चित्रपटांचा म्हणावा तसा फायदा आम्हाला मिळत नाही. अर्थात बड्या निर्मात्यांना मी दोष देत नाही. त्यांना आपल्या चित्रपटाची मार्केट-व्हॅल्यू वाढवायची असतेच.'

ह्या अमुक एका भूमिकेत असं काम होतं, म्हणून तुम्ही ही भूमिका स्वीकारलीत ? ह्या प्रश्नाचं एक उत्तर 'मैत्रीचे संबंध' असतं, तर दुसरं उत्तर जे नेहमी ऐकायला मिळतं ते 'रोल प्रत्यक्ष ऐकवला होता तेव्हा खरंच छान होता. एडिटिंग टेबलवर कट होऊन हा एवढासा राहिला.'– ह्या उत्तरात बऱ्याच अंशी सत्य असतं.

आपल्या बहुसंख्य निर्मात्यांना काटकसर ठाऊक नसते. रॉ स्टॉक-वरचा खर्च ही तर विचार करण्याची बाबच नव्हे. हवी तेवढी रॉ फिल्म एक्स्पोज केली जाते. निष्काळजीपणामुळे अनेक रीटेक होत असतात, तर 'सेफ्टी' करता एकापेक्षा अधिक ओके टेक घेण्याचीही प्रथा पडली आहे. कधी दिग्दर्शकासाठी, तर कधी छायाकारासाठी आणि कधी कलाकाराच्या समाधानासाठी आणखी एक ओके टेक घेतला जात असतो. कमाल अमरोहीसारखे दिग्दर्शक तर एकाच दृश्याचे वेगवेगळ्या प्रकारे ओके टेक घेऊन ठेवतात. त्यातला हवा तो एडिटिंगमध्ये निवडायचा.

प्रत्यक्ष चित्रीकरणाच्या वेळीच दिग्दर्शकाच्या डोक्यातच एडिटिंग होणं, नेमकं हवं तेच आणि हवं तेवढंच 'शूट' करणं हा कडकडीत आदर्श पाळणारा सत्यजित रेसारखा दिग्दर्शक विरळाच !

एडिटिंगच्या ह्या प्रकारामुळे कलाकार चित्रीकरण पूर्ण होईपर्यंत गोड गैरसमजात राहतो आणि फिनिश्ड प्रॉडक्ट समोर आल्यावर हात चोळत बसतो.

ह्या परिस्थितीचा विचार करून तरी वहीदासारख्या अभिनेत्रींनी वाटेल त्या सबबीवर वाटेल तो रोल स्वीकारण्याचा मोह टाळावा. आणखी वर्ष-दोन वर्षांत वहीदा रहमानने निरुपा रॉयसारखं मिनिटा-मिनिटाला अश्रू गाळणाऱ्या आईच्या रूपात नुसतं दिसावं हे मनाला पटत नाही. अशा वेळी अगदी योग्य वेळी चित्रपटसंन्यास घेऊन आपली झगमगती इमेज कायम ठेवणाऱ्या वैजयंतीमालेचं कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही. 'क्रांती' मधील दिलीपकुमारच्या पत्नीच्या भूमिकेसाठी मनोजने सर्वप्रथम वैजयंतीचाच विचार केला होता म्हणे; पण वैजयंती आपल्या निर्णयापासून ढळली नाही नंतर निरुपा रॉयनेच ती पेटंट भूमिका करून टाकली. 'क्रांती' पाहिल्यानंतर पुन्हा एकदा वैजयंतीमालेच्या निर्णयाचं कौतुक वाटलं.

□

# एका
# पानाची
# कहाणी

वि. स. खांडेकरांची
अपुरी आत्मकहाणी.
या कहाणीला
प्रकाशक श्री. रा. ज. देशमुख यांनी
जोडलेली
शंभर पानांची पुरवणी
हा आज चर्चेचा विषय ठरावा असा !
या पुरवणीतून दर्शन घडते ते
लेखक आणि प्रकाशक यांच्यातील
संबंधांचे.
........जे नेहमीच गुंतागुंतीचे,
दोन-तीन पातळ्यांवरचे असतात.
एकीकडे दिसतो लेखक–
ध्येयवादी प्रवृत्तीचा
पण व्यवहार जपणारा.
दुसरीकडे प्रकाशक–
पूर्ण व्यावसायिक आणि
व्यवसायापलीकडची नातीही जपणारा.
या पुरवणीचे आणि
'एका पानाच्या कहाणी' चे
प्रदीर्घ आणि परखड परीक्षण...

## माणूस
## पुढील अंकी

लेखक : डॉ. भीमराव कुलकर्णी